

# इरादे कर बुलंद



अभिव्यक्ती

# इरादे कर बुलंद

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | कुटुंबसंस्था आणि स्त्रीस्वातंत्र्य | 1 |
| 2. | स्त्री जन्माला येत नाही, घडविली जाते | 9 |
| 3. | सौंदर्यस्पर्धांचा बाजार | 15 |
| 4. | स्त्रीच स्त्रीची शत्रू आहे | 23 |
| 5. | सौभाग्य लक्षणांचे वास्तव | 28 |
| 6. | स्त्रियांच्या मासिकांचे तथ्य | 33 |
| 7. | प्रसारमाध्यमांमधील स्त्रियांची प्रतिमा | 40 |
| 8. | स्वावलंबनाची गरज | 43 |
| 9. | पुरुषही घडविला जातो | 49 |
| 10. | स्त्री चळवळीची दिशा | 54 |
| | आमच्याबद्दल: अभिव्यक्ती | 65 |



- **प्रकाशक:**

  अलका जोशी, लोकायत सोशल ॲक्शन ट्रस्ट,
  सी - 2, मंत्री इस्टेट, सॅलिसबरी पार्क, पुणे – 411 037

  जी.जी. परीख, जनता साप्ताहिक, डी-15, गणेश प्रसाद,
  नौशीर भरुचा मार्ग, ग्रांट रोड (पश्चिम), मुंबई – 400 007
  022-23870097


- **मुद्रक:** आर.एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे – 411 030
- **चौथी आवृत्ती:** सप्टेंबर 2022



- **कॉपीराईट नाही**



**सहयोग मूल्य: ₹ 30**



# कुटुंबसंस्था आणि स्त्रीस्वातंत्र्य

*प्रश्नांच्या मर्यादांपलीकडे नको जाऊ गार्गी*
*नाहीतर डोकं शरीरापासून वेगळं होईल*

*– याज्ञवल्क्याने जनक राजाच्या दरबारात वादविवादात*
*विदुषी गार्गीला दिलेली धमकी*

स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल बोलायला सुरुवात केल्याबरोबर आपल्याला समाजातून हे सूर ऐकायला मिळतात, “तुम्ही तर कुटुंब तोडायला निघाला आहात”, जर “स्त्री मुक्त झाली तर मुलांचे काय होईल?”, “मग घरातील कामे कोण करणार?”, “यामुळे तर संपूर्ण समाजात अराजकता माजेल”, इ.इ.

स्त्रियांच्या स्वातंत्र्य व स्वावलंबनाच्या प्रश्नांवर समाजाची समज हीच आहे. ज्या समाजात पूर्वीपासूनच (‘न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति’ – *मनुस्मृती*) स्त्री स्वातंत्र्याला लायक नाही असेच मानले जाते, जिथे घरातून एकट्या बाहेर पडणाऱ्या स्त्रीला ‘चालू’ आणि ‘चारित्र्यहीन’ समजले जाते, तो समाज स्त्रियांच्या बाबतीत ‘मुक्ती’, किंवा

‘स्वातंत्र्य’ असे शब्द सहन तरी कसा करेल? ज्या स्त्रीला मनुने ‘ताडन के अधिकारी’ म्हटले आहे, तिची मुक्ती? ... तोबा तोबा, घोर कलियुग! हे जग कोठे चालले आहे? स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हा वादाचा विषयच नाहीये — ती वादाची सीमा आहे.

पण हे ही खरे आहे की काळ बदलला आहे. आपला समाज, बदलाच्या वेदनामय काळातून जात आहे. आता गार्गी आणि याज्ञवल्क्याचा काळ नाहीये. आज ऋषी याज्ञवल्क्याच्या फतव्याला समाजात मान्यता मिळणार नाही. स्त्रियांच्या स्वावलंबनाबद्दल आणि स्वातंत्र्याबद्दल जे वाद आहेत त्यांचा निर्णय आता *मनुस्मृतीच्या* श्लोकांच्या आधारावर होणे शक्य नाही. जुन्या जमान्यातल्या विषमता आणि अन्यायावर आधारित व्यवस्थांवर आज अनेक प्रश्न उभे आहेत. स्त्रियाही आपल्या परंपरागत चौकटीतून बाहेर पडून आपली ओळख शोधत आहेत. घराचे उंबरठे ओलांडून मोकळ्या जगात त्या सर्व प्रकारची कामे सक्षमपणे करत आहेत.

दुसऱ्या बाजूला, हा बदल घडू नये यासाठी समाजाकडून प्रयत्न होत आहेत. समाजात स्त्रीचे स्थान कितीही उच्च असो, सन्मान असो, घरातली दुनिया तिच्या त्या स्थानाला स्वीकारायला तयार नाही. उलट तिच्या घराबाहेर पडून स्वावलंबी होण्यावर अनेक प्रश्न उपस्थित केले जातात, जसे, घरातील तिच्या अनुपस्थितीत घरकाम कोण करेल, मुलांना कोण सांभाळेल, बाहेर इतर पुरुषांसोबत उठण्या–बसण्यावरून तिच्या चारित्र्यावर काय परिणाम होईल इ.इ. प्रसारमाध्यमे देखील त्यांच्या कार्यक्रमांमधून लग्न हीच बाईच्या आयुष्याची इतिकर्तव्यता आहे, स्वतंत्र बाई म्हणजे बेपर्वा आणि बेजबाबदार, नोकरी करणाऱ्या बाईचा नवरा आणि मुले तिच्या घरात नसण्यामुळे किती लाचार व असहाय्य आहेत हे दाखवून समाजातील या जुनाट विचारांना बळकटी देत आहेत.

स्त्रीस्वातंत्र्य व स्वायत्तता यांना चुकीचे व अनैतिक मानणाऱ्या मागासलेल्या विचारांना आणि जुनाट कालबाह्य मूल्यांना आव्हान देण्याची वेळ आलेली आहे. आपले पूर्वग्रह दूर सारून, असल्या सामाजिक मनोधारणा आणि शंका यांना तर्कशुद्ध निकषांवर तपासून पाहिले पाहिजे. स्त्रीसुद्धा एक माणूस आहे याची जाणीव होणे आवश्यक आहे. समाजात आपली काय भूमिका असावी हे ठरवण्याचा आणि ती निभावण्याचा तिला पूर्ण अधिकार आहे. दुर्दैवाने, आपल्या समाजाने स्त्रियांचा हा अधिकार नाकारला आहे. स्त्रियांमधील अव्यक्त गुणांचा विकास करण्याची स्वायत्तता वा स्वातंत्र्य त्यांना न दिल्यामुळे समाजाचाच विकास खुंटलेला आहे; कारण समाजातील अर्ध्या लोकसंख्येची अंगभूत प्रगल्भता आणि क्षमता यांचा विकासच समाजाने होऊ दिलेला नाही; त्यांचा वापर करणे तर दूरच.

## कुटुंबाचा पिंजरा

आपल्या समाजात स्त्रियांची भूमिका कुटुंबापुरती मर्यादित ठेवली आहे. मुलगी मोठी होत असताना तिला जर घराबाहेर जाऊन खेळायचे असेल, किंवा संगीत वा नृत्य शिकायचे असेल, तर दरडावून सांगितले जाते — स्वयंपाकघरात जाऊन मदत कर, बाहेर जाऊन खेळण्यापेक्षा तुझ्याकरता ते जास्त महत्त्वाचे आहे. मोठी झाल्यावर जेव्हा तिचे लग्न होते, तेव्हा घराबाहेरील कामांची जबाबदारी पुरुषाची असते तर घरातील सर्व कामे — स्वयंपाक, झाड-लोट, कपडे धुणे, मुलांचे संगोपन करणे वगैरे ह्या तिच्या जबाबदाऱ्या असतात. घरातील सर्व कामे सांभाळून, घराबाहेर पडून नोकरी करून जर तिला स्वावलंबी बनायचे असेल, तर सगळ्यात आधी तिला कुटुंबातच संघर्ष करावा लागतो. “आपल्या घरात काय कमी आहे की तुला नोकरी करावीशी वाटते?”, “पुरुष असताना बाई कमावणार”! तिच्या घराबाहेर पडून नोकरी करण्याला परिवार प्रतिष्ठेचा प्रश्न बनवून तिला निरुत्साही करतो.

स्त्रीला तिची स्वतंत्र ओळख नसते. ती कुणाची तरी आई, पत्नी, मुलगी, या रूपांमध्ये ओळखली जाते. सासू–सासरे, नणंद, दीर, नवरा, मुले हीच तिच्या आयुष्याची मर्यादा आहे, तेच तिचे अस्तित्व आहे. आणि ही चौकट ओलांडण्याची तिला परवानगी नाही. तिची तमाम सुखदुःखे याच परिघामध्ये फिरतात.

कुटुंबाच्या याच चौकटीत स्त्रियांवर अनंत अत्याचार होत असतात. मालक, स्वामी, भरतार वगैरे सारखे जे शब्द बायका नवऱ्यांसाठी वापरतात त्यावरूनच त्यांचे घरातील स्थान काय आहे हे समजते. ही संबोधने वस्तुस्थितीचे वर्णन करतात. घराच्या चार भिंतींमध्ये स्त्री पुरुषाची दासी असते आणि पुरुष तिच्यावर निरंकुश सत्ता गाजवणारा शासक असतो. स्त्री दासी आहे म्हणून मग तिला मारपीट करणे, आजारी असतानाही तिच्याबरोबर शरीरसंबंध ठेवणे, तिच्यावर बलात्कार करणे, काहीही कारण नसताना तिला घरातून हाकलून देणे, मनात आले तर दुसरे लग्न करणे, ह्या सगळ्याचा त्याला अधिकारच आहे. सगळे धर्मग्रंथ, धार्मिक पुस्तके पुरुषाच्या या क्रूर सत्तेला परवानगी देतात आणि पती परमेश्वराची सेवा करणे हाच स्त्रीचा धर्म आहे हे घोषित करतात. स्त्रीलिंगी गर्भपात, हुंडाबळी, मारपीट, अपमान, घराबाहेर हाकलून देणे अशा स्त्रियांवर होणाऱ्या तमाम हिंसेच्या घटना तिला नाईलाजाने तोंड दाबून सहन कराव्या लागतात. अशा प्रकारच्या अनन्वित हिंसा कुटुंबाची इज्जत, मर्यादा किंवा घराची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी सहन करण्यास तिला विवश केले जाते. हे अत्याचार वरचेवर घडताना दिसतात. समाजात ही असमानता, अत्याचार इतका सर्वमान्य झाला आहे की ह्या सरळसरळ होणाऱ्या अन्यायावर

कोणाचेही फारसे लक्षच जात नाही. यातील भयंकर गोष्ट ही की स्वतःच्या बायकोवर इतके अत्याचार आणि अन्याय करूनसुद्धा, नवऱ्याची सामाजिक प्रतिष्ठा अबाधित राहते. ह्याचे टोकाचे उदाहरण म्हणजे तरुण वधूला हुंड्यासाठी निर्घृणपणे ठार मारले तरी पूर्ण समाज गप्प राहतो आणि तो गुन्हा निर्लज्जपणे दाबून टाकण्याचे प्रयत्न केले जातात.

समाजाने स्वीकारलेल्या कुटुंबातील पुरुषाच्या ह्याच निरंकुश सत्तेमुळे कितीतरी मुलींची स्वप्ने पायदळी तुडवली जातात, त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते, हसण्याखेळण्याच्या, शिक्षणाच्या वयातच लग्न करून कुठल्या तरी अपरिचित पुरुषाच्या गळ्यात बांधले जाते. तिचे हे निर्णयही आई–वडील किंवा भाऊ घेत असल्यामुळे मुलगी ते चुपचाप सहन करते; स्वतःच्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेण्याचाही तिला अधिकार नसतो. कारण पिढ्यानपिढ्या असेच होत असल्याचे ती पाहत आलेली असते. कुटुंबाच्या चौकटीत मिळणाऱ्या सुरक्षिततेची किंमत म्हणून तिला स्वतःच्या स्वातंत्र्याची आहुती द्यावी लागते. सामाजिक मान्यतांच्या विरोधात जाऊन एखाद्या मुलीने परजातीतल्या तिच्या आवडीच्या मुलाबरोबर लग्न केले तर तिचे कुटुंबीयच तिला निर्दयपणे ठार मारतात आणि पूर्ण समाज आणि पंचायत त्या कुटुंबाच्या पाठिशी उभी राहते. अशा प्रकारच्या क्रूर गुन्हेगारांना पाठीशी घालणारी समाजाची ही मूकसंमती दिसते तेव्हा असे वाटते की कुटुंबाच्या ह्या अधिकारांना अबाधित ठेवण्याचा प्रश्न आला तर प्रसंगी समाज कुठल्याच कायद्याची पर्वा करणार नाही.

पण कुटुंबाच्या ह्या विद्यमान स्वरूपाला मान्यता द्यायची का? ह्याला आदर्श कुटुंब म्हणायचे का? अशा कुटुंबाला मान्यता देणे म्हणजे ह्यात अंगभूत असलेल्या विषमतेचे आणि निरंकुश सत्तेचे समर्थन करणे होईल. इतिहास सांगतो की कुटुंबसंस्था नेहमीच अशी नव्हती. प्राचीन मानवी समाजात, आधुनिक समाजव्यवस्था अस्तित्त्वात येण्यापूर्वी हजारो वर्षे समाज समतावादी होता, स्त्रिया कुटुंबप्रमुख होत्या आणि समुदायाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जसजशी संपत्ती आणि सत्ता पुरुषांच्या हातात केंद्रित होत गेली, तसतशा स्त्रिया सर्व सामाजिक अधिकारांपासून वंचित होऊन घरामध्ये कैद केल्या गेल्या. अशाप्रकारे कुटुंबाअंतर्गत पितृसत्तेचा उदय झाला ज्यात स्त्रिया गुलामाच्या भूमिकेत गेल्या. (हे संक्रमण कसे झाले हे सांगायचे तर विषयांतर होईल.)

## कुटुंब: समाजाचा एक महत्त्वाचा घटक

आज आपण हुकूमशाही पद्धतीने शासन करणाऱ्या राजे आणि सामंतांच्या सरंजामशाही समाजात राहत नाही. आपण प्रगत लोकशाही राष्ट्रामध्ये राहतो, जिथे शासक नियमितपणे निवडणुकांद्वारे निवडून दिले जातात आणि समाज राजाच्या लहरीवर नाही तर लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या संस्थेने लिहिलेल्या राज्यघटनेनुसार चालतो. भारतीय संविधान स्त्री–पुरुषांना समान अधिकार देते. पण डॉ. आंबेडकरांनी खूप आधीच सांगितले होते की फक्त कायदे बनवून समानता येत नाही तर त्याची सामान्य लोकांमध्ये स्वीकृती पाहिजे.

भारतात कुटुंबाची पूर्वीची सरंजामी रचना आजही तशीच आहे. कुटुंबाच्या ह्या चौकटीतून स्त्रीची मुक्ती झालीच पाहिजे, आणि त्या जागी एकमेकांबद्दल आदर, समानता आणि खरे प्रेम यावर आधारित नव्या रूपात कुटुबांची मूल्ये स्थापन करणे आवश्यक आहे. जर विवाह दोन जीवांचे मीलन असेल आणि जर प्रेम दोन माणसांमधील परस्पर सन्मान आणि विश्वासावर आधारित घनिष्ठ नाते आहे तर त्यात विषमतेला आणि निरंकुशतेला स्थान आहे कुठे?

स्त्री–पुरुषांमध्ये पूर्णपणे समानता, दोन माणसांमध्ये परस्पर सन्मान, प्रेम आणि विश्वासावर आधारित कुटुंबामध्येच एक चांगला नागरिक जन्माला येऊ शकतो. परिवार मुलीची किंवा मुलाची पहिली शाळा आहे. शाळेत जाण्यापूर्वी मुले आपल्या आई–वडिल व नातेवाईकांकडून बऱ्या–वाईट गोष्टी शिकत असतात. त्या मुलाच्या घरातील वातावरण, आई–वडिलांचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तर, त्यांची मुलांना वाढवण्याची पद्धत, लहानपणी मुलाला मिळालेले संस्कार यावर मूल मोठे होऊन कसे नागरिक बनेल हे अवलंबून असते. मुलाला/मुलीला समानता, न्याय, ईमानदारी, मेहनत, स्वाभिमान, तर्कशीलता, परोपकार आणि मानवप्रेम यांचे आदर्श शिकवणाऱ्या, त्यांना आत्मविश्वास देऊन नेतृत्व गुणांनी संपन्न करणाऱ्या, त्यांना स्वतंत्र विचारांचे नागरिक बनण्यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या कुटुंबालाच आदर्श कुटुंब म्हणता येईल. परंतु एका गुलाम आणि अशिक्षित आईकडून याची अपेक्षा करता येईल का? आणि निरंकुश सत्ता गाजवणारा एक अहंकारी बाप तरी हे करू शकतो का? निश्चितच नाही! ज्या घरात असमानता आणि पुरुषी सत्ता ही प्रतिष्ठेची गोष्ट मानली जात असेल, ज्या घरात आई गुलाम असेल, अंधश्रद्धा आणि रूढी–परंपरा मानत असेल, प्रत्येक गोष्टीत आपल्या पतीवर अवलंबून राहत असेल, जिला स्वतःचा आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची जाण नसेल, रोज नवऱ्याकडून अपमानित होत असेल आणि बाप अहंकाराची साक्षात मूर्ती असेल, ज्या घरात

समानता आणि तर्काला काही थारा नसेल, आणि निमूटपणे आदेशांचे पालन केले जात असेल — अशा कुटुंबात समानता, स्वाभिमान, न्याय आणि तर्कशुद्ध विचारांचे संस्कार कसे निर्माण होतील? केवळ एक सुशिक्षित, स्वतंत्र, आत्मविश्वासपूर्ण, सुसंस्कृत आणि स्वतःचे व्यक्तित्त्व असलेली आईच मुलीला/मुलाला चांगल्या प्रकारचे संगोपन देऊ शकते. एक सुखी आणि न्याय्य समाज तेव्हाच बनेल जेव्हा या समाजातील अर्धी लोकसंख्या म्हणजेच स्त्रिया स्वतंत्र होतील.

## धादांत खोटेपणा

परंतु दुर्दैवाने आपल्या समाजात बहुसंख्य लोक परंपरेच्या नावाखाली जुन्या समजुती आणि मूल्ये, यांना चिकटून राहून विषमता आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेचा फायदा घेऊ पाहत आहेत. अर्थातच त्यांना जुन्या कुटुंबव्यवस्थेची जागा नवीन कुटुंबव्यवस्थेने घेतलेली चालणार नाही. कोणत्याही प्रकारचा बदल त्यांना नको आहे. स्त्री स्वातंत्र्याच्या नावाने आरडाओरड करणारे हेच लोक, स्त्रियांनी कामासाठी घराबाहेर पडण्यात आपल्या प्रतिष्ठेचा कमीपणा समजतात. ते स्त्रियांना कुटुंबाची संपत्ती, घरात सजवून ठेवण्याची वस्तू, घराण्याचा वंश जन्माला घालणारे मशीन आणि केवळ पुरुषांच्या उपभोगासाठी असलेले एक शरीर ह्यापलीकडे काहीही समजत नाहीत.

अशा लोकांना काळ बदलत असल्याची आणि आजच्या लोकशाही समाजामध्ये अमर्याद पुरुषीसत्ता आणि विषमतेवर आधारित नाती फार दिवस टिकू शकत नाहीत याची जाणीवच नाहीये. भारतातही पुरुषसत्तेविरुद्ध स्त्रियानी बंड सुरू केले आहे आणि आपल्या स्वातंत्र्याची लढाई सुरू केली आहे. स्त्रियांनी जेव्हा समानतेची आणि समान हक्कांची लढाई सुरू केली तेव्हा ह्याच समाजधुरीणांनी कुटुंबसंस्था धोक्यात आल्याची, समाजाचा अधःपात होत असल्याची आरडाओरड करून स्त्रियांच्या आंदोलनाला बदनाम करायला सुरुवात केली. वास्तविक हे धादांत खोटे आहे! त्यांच्या मुख्य आरोपांचे परिक्षण करूया.

पहिला, स्त्रिया त्यांचे हक्क जेव्हा प्रस्थापित करू लागतात, तेव्हा यामुळे कुटुंब विस्कळीत होण्याच्या घटना फारच कमी आहेत. याउलट स्त्रीला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागताच, कुटुंबात सुरुवातीला जरी ताण निर्माण झाले, तरी प्रत्यक्षात कुटुंबातील नाती — पती–पत्नी, वडील–मुलगी — लोकशाही पद्धतीने निर्माण झाल्यामुळे हळूहळू जास्त दृढ होत जातात.

दुसरा, जरा खोलात जाऊन पाहिले तर लक्षात येते की, जे लोक स्त्रियांच्या

स्वतंत्र होण्याच्या इच्छेला कुटुंब तोडण्यासाठी दोषी मानतात ते लोक ह्या सत्याचा स्वीकार करायला तयार नाहीत की बहुतांशी वेळा कुटुंब तोडणारे पुरुषच असतात. मुलगा जन्माला नाही घातला तर स्त्रीचा अपमान करणे आणि तिला सोडून दुसरी बायको करणे — ह्याला घर मोडणे मानले जात नाही; वांझ किंवा मुली जन्माला घालणाऱ्या बायकोला टाकून दुसरी बायको घरात आणणे — ह्याला कुटुंब मोडणे मानले जात नाही; नशाबाज, आपल्या जबाबदाऱ्यांपासून पळून जाऊन व्यसनांच्या आहारी जाणाऱ्या, एवढेच नाही तर, दुसरी बाई (रखेल) ठेवणे — ह्याला कुटुंब मोडणे मानले जात नाही; आणि स्वतःच्या मुलांकडे न पाहणाऱ्या दारुड्या नवऱ्याच्या अत्याचारांना मुकाट्याने सहन करण्याचा उपदेश बायकोला दिला जातो — ह्याला कुटुंब मोडणे मानले जात नाही. हे सर्व सहन करून स्त्रीने ते मोडकळीस आलेले कुटुंब सावरावे आणि नवरा कधीतरी सुधारेल अशा वेड्या आशेवर जगत राहावे, असा सल्ला निर्लज्जपणे समाज देत असतो. स्त्रीने स्वतःच्या पायांवर उभे राहण्याचा आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचा विचार केला तर लगेच यांच्या कुटुंबव्यवस्थेच्या सुरक्षेला धक्का लागतो.

'सवत' किंवा 'रखेल' ह्याला पुरुषांसाठी समानार्थी असलेले शब्द आपल्या शब्दकोशातच नाहीत; कारण असले निंद्य प्रकार आपल्या समाजात पुरुषच वर्षानुवर्षे करत आलेले आहेत, आणि आजही सर्रास करत आहेत. स्त्रियांना जेव्हा समाजात समान अधिकार मिळतील आणि त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील तेव्हा समाजामध्ये अराजकता माजणार नाही किंवा कुटुंब मोडणार नाही; उलट, पुरुषांच्या स्वैराचाराला आळा बसेल. पुरुषाला आपल्या पत्नीशी एकनिष्ठ राहायला लागेल कारण आता जर तो एकनिष्ठ राहिला नाही, तर आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्यामुळे तिच्यामध्ये त्याला सोडण्याची क्षमता व आत्मविश्वास असेल. पती–पत्नीमधील नाते आता परस्पर प्रेम, आदर आणि विश्वासावर आधारित असेल. आणि हळूहळू 'सवत' किंवा 'रखेल' असे शब्दच समाजातून नामशेष होतील.

नोकरी करणाऱ्या, स्वतंत्र स्त्रिया घरकामात किंवा मुलांच्या पालनपोषणात लक्ष घालणार नाहीत, ही भीतीसुद्धा निराधार आहे. प्रत्यक्षात परिस्थिती ह्याच्या अगदी उलट आहे. आपण प्रत्यक्षात काय पाहतो? आजची एखादी विद्यार्थिनी असो किंवा नोकरी करणारी स्त्री असो, आपले शिक्षण किंवा नोकरी व्यतिरिक्त घरातील सगळी कामे, मुलांच्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पेलताना दिसते. पण तेच घरात जर एखादा बेरोजगार पुरुष असेल, तर तो मात्र घरकामामध्ये काहीच मदत करीत नाही. जे थोडेफार पुरुष घरकामात मदत करतात, त्यांची 'बायकोच्या ताटाखालचे मांजर'

अशा शब्दात टर उडवली जाते.

थोडक्यात काय, स्त्रियांचे स्वातंत्र्य किंवा स्वावलंबन याविषयी घेतल्या जाणाऱ्या शंका निराधार असून त्या पुरुषप्रधान मनोधारणेतून निर्माण झालेल्या आहेत आणि जीवनाच्या वास्तवाशी पूर्णतः विसंगत आहेत.

स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नावर समाजाने एका संतुलित दृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. आपल्याला जर असे वाटत असेल की, आपल्या देशाचे भावी नागरिक स्वावलंबी, स्वाभिमानी आणि समानतेचे संस्कार घेऊन मोठे व्हावेत; हजारो वर्षांच्या अंधश्रद्धा, कालबाह्य मूल्ये आणि बुरसटलेल्या विचारांतून बाहेर पडून आपला देश विकसित आणि सक्षम बनावा, तर निश्चितच स्त्रियांना स्वतंत्र, स्वावलंबी आणि सबल बनवून आपल्याला आपल्या कुटुंबव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करावी लागेल. त्यासाठी प्रत्येक सामाजिक टप्प्यावर स्त्रियांचा सहभाग वाढवावा लागेल, स्त्रियांना सुशिक्षित बनवावे लागेल, स्वतःच्या पायांवर उभे राहून आर्थिक स्वावलंबन मिळवण्यासाठी स्त्रियांना प्रेरित करावे लागेल, त्यांना शिक्षण व रोजगाराच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून द्याव्या लागतील. सध्या स्त्रियांवर असलेली घरकाम आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी विभागली जाऊ शकते. पुरुषांना या कामात समप्रमाणात जबाबदारी उचलण्यासाठी प्रेरित करावे लागेल. त्याचबरोबर मुलांसाठी पाळणाघरे, अंगणवाड्या, खेळाच्या माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळा, वसतिगृहे आणि कोवळ्या वयातील अर्भकांसाठी स्त्रियांच्या कामाच्या जागी पाळणाघरे (जेथे अर्भकांच्या गरजेनुसार माता त्यांची काळजी घेऊ शकतील व दूध पाजू शकतील), स्वच्छ व स्वस्त सामाजिक स्वयंपाकगृहे अशा व्यवस्था निर्माण करून स्त्रियांवर पडणाऱ्या दुहेरी जबाबदाऱ्यांमधून समाजच त्यांचा भार हलका करू शकतो. अशा प्रकारे जर संपूर्ण समाज स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्वावलंबन यांसाठी जागरूक झाला तरच वास्तवात स्त्रियांना स्वातंत्र्य मिळू शकते.

■ ■



# स्त्री जन्माला येत नाही, घडविली जाते

एखादी छोटीशी सुंदर गुटगुटीत मुलगी, तिच्या अल्लड हसण्या–खेळण्याने सगळ्यांचे मन आकर्षून घेते, संपूर्ण घराला मोहात टाकते. पण ती जसजशी मोठी होते, तसतसे तिचे नाचणे–बागडणे हळूहळू संकोचामध्ये का बदलते? लहानपणी घरामध्ये मुक्त हरिणीसारखी बागडणारी हीच मुलगी मोठी होताच लाजून, संकोचाने, बिचकत पावले का टाकू लागते? बालपणातील ती जन्मजात उन्मुक्त मुलगी मोठी होत असताना अनैसर्गिक, बुजरी आणि घाबरट व्यक्तिमत्त्वात का बदलते?

सुप्रसिद्ध फ्रेंच लेखिका आणि तत्त्ववेत्त्या सिमोन द बोऊवा यांनी लिहिले आहे:

*स्त्री जन्माला येत नाही, तर ती घडविली जाते.*

हे अगदी खरे आहे. आपली संपूर्ण समाजव्यवस्था तिला बदलवून टाकण्यास कारणीभूत आहे.

आपल्याला माहीत आहे की, जन्माला येणारे कोणतेही मूल — मुलगी असो किंवा मुलगा — केवळ एक बालक असते. लैंगिक अवयवांव्यतिरिक्त त्यांच्यात काहीच फरक नसतो. त्यांच्या बालसुलभ क्रिया — रडणे, खाणे–पिणे — यात काहीच फरक नसतो. लहान मुलांमधील लैंगिक फरक हा नैसर्गिक असतो. ह्याच नैसर्गिक भिन्नतेमुळे स्त्री–पुरुष परस्परांना पूरक असतात. ते जर एकमेकांना पूरक

असतील तर हीच लैंगिक भिन्नता त्या दोघांमधील भेदभावाला कारणीभूत कशी ठरते? आणि ह्या भेदभावाची बळी स्त्रीच कशी होते? समाजामध्ये स्त्रीला दुय्यम स्थान का दिले जाते? खरेतर नैसर्गिक भिन्नतेमुळे नाही तर सामाजिक आणि मनोधारणेतील पूर्वग्रहांमुळे मुलगा आणि मुलगी हा भेदभाव करून मुलीला तुच्छ लेखले जाते.

मूल जन्माला आल्याबरोबर त्याच्यावर कुटुंबाचा आणि समाजाचा प्रभाव पडायला सुरुवात होते. मुलीला तिच्या स्त्रीपणाची आणि दुय्यमत्वाची जाणीव करून द्यायला सुरुवात होते, तर मुलाला त्याच्या पुरुषत्वाची आणि तो श्रेष्ठ असल्याची जाणीव करून द्यायला सुरुवात होते. बहुतांश घरांमधून खाणे-पिणे, कपडे-लत्ते, शिक्षण, इत्यादींबाबत मुलांना प्राधान्य दिले जाते. हा भेदभाव आपल्या समाजात इतका भिनलेला आहे की, आपल्याला त्यामध्ये काहीच गैर वाटत नाही किंवा आपण त्याबद्दल कधी बोलतही नाही. मुलीला मात्र तिच्याविषयीच्या भेदभावाबद्दल जाणीव असते, आणि त्यामुळे तिचे व्यक्तिमत्व बुजरे आणि कमकुवत बनत जाते.

जन्मापासूनच मुलगा आणि मुलगी यांच्यामधील पालनपोषणाच्या पद्धतीमध्ये फरक दिसायला लागतो. मुलाला खेळण्यासाठी कार, बंदूक, विमान, सायकल, घोडा अशी खेळणी मिळतात, तर मुलीला स्त्रीसुलभ बाहुली, भातुकली अशी घरकामाशी निगडीत असलेली खेळणी दिली जातात. त्याशिवाय मुलीला सतत घरकामामध्ये रस घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाते, आणि मुलाला घराबाहेरील उपक्रमांमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहन दिले जाते. मुले जात्याच मोठ्यांचे अनुकरण करत असतात. मुलीला तिची आई सकाळपासून रात्रीपर्यंत घरकामाच्या घाण्याला जुंपलेली दिसते. ती तिच्या आईचे अनुकरण करण्यास साहजिकपणे प्रवृत्त होते. मुलगा मात्र स्त्रियांच्या त्या विश्वापासून चटकन दूर होताना दिसतो; त्याला सतत जाणीव करून दिली जाते की, ‘तो मुलगा आहे म्हणून मुलींपेक्षा श्रेष्ठ आहे.’ कुटुंबातील अशा भेदभावामुळे लहानपणापासूनच मुलींचे वैचारिक जग संकुचित होऊन घरकाम आणि स्वयंपाकापुरते मर्यादित होत जाते. अशा प्रकारे मुलीची हळूहळू स्त्री ‘घडत’ जाते.

किशोरावस्थेत, वय वर्षे आठ ते अठरा, मुलांच्या शरीरात होणारे बदल नैसर्गिक असतात; होर्मोन्समुळे तसे बदल होणे स्वाभाविकच असते. मुलाच्या शरीरातील बदल कुटुंबाला अभिमानास्पद वाटतात, तर मुलीच्या शरीरातील बदल मात्र कुटुंबासाठी चिंतेचा विषय बनतात. अचानक तिच्यावर अगणित बंधने लादली जातात. प्रत्येक बाबतीत होणारी अडवणूक आणि सल्ले तिला गोंधळात टाकतात; तिचा धीर खचतो. त्याच वेळी, आता तिच्या शरीराकडे पाहणाऱ्या लोकांच्या विचित्र

नजरांमुळे ती भयभीत होते. परिणामी मुलगी बुजरी, भित्री, कमालीची सहनशील आणि संकोची स्वभावाची बनत जाते आणि स्वतःचा आत्मविश्वास गमावून बसते.

त्याउलट, आई–वडील आणि कुटुंबातील सर्वजण मुलाच्या उज्ज्वल भविष्याची अनेक स्वप्ने रंगवू लागतात. आपल्या ऐपतीनुसार मुलाला जास्तीतजास्त चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. मुलाने आयुष्यात प्रगती करावी यासाठी पडेल ती मदत करायची कुटुंबाची तयारी असते. त्याच्या जीवनात त्याला जे बनायचे आहे त्यासाठी स्वातंत्र्य मिळते. पण मुलीच्या आयुष्याचे लक्ष्य मात्र तिच्या जन्मापासूनच ठरलेले असते. लग्न करून मुलीला नवऱ्याच्या घरी जायचे आहे, त्याचे घर-दार सांभाळायचे आहे, मुलांना जन्म देऊन त्यांचे संगोपन करायचे आहे — ही गोष्ट समाजात पूर्वापार पक्की रुजलेली आहे. मोठी झाल्यावर ती एक यशस्वी गृहिणी, आदर्श पत्नी, सून, आणि आई बनावी हेच लक्ष्य समोर ठेऊन मुलीला शिक्षण दिले जाते. मुलीच्या आई–वडिलांनी तिला कितीही शिकविले तरी तिच्यापेक्षा जास्त शिकलेल्या आणि जास्त कमावणाऱ्या नवऱ्याबरोबर तिचे लग्न व्हावे हाच उद्देश डोळ्यासमोर असतो.

मुलीला तिच्या आयुष्यात काय बनायची इच्छा आहे? तिला कोणत्या विषयात रुची आहे? तिला कोणत्या विषयाचे शिक्षण घ्यायचे आहे? तिला नोकरी करायची आहे का? तिला लग्न केव्हा आणि कोणाशी करायचे आहे? तिला मुले केव्हा आणि किती हवी आहेत? असे तिच्या आयुष्याशी निगडीत असलेले निर्णय घेण्याचा तिला अधिकार नसतो. एवढेच काय, तिने घराबाहेर कधी आणि कोठे जावे ह्यासारखा अगदी साधा निर्णय घेण्याचासुद्धा तिला अधिकार नसतो. समाजाने स्त्रियांसाठी घालून दिलेल्या चौकटीत तिच्या व्यक्तिमत्वात असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्याचा काही प्रश्नच येत नाही. अशा नियंत्रित वातावरणात मुलीचे एक ढब्बू, संकुचित, परावलंबी, अंतर्मुख, आत्मविश्वास नसलेले आणि मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तिमत्त्वच बनवले जाऊ शकते. पण आपला समाज तिला असेच घडवू इच्छितो.

पूर्वापार चालत आलेल्या रूढी आणि परंपरा आईच्या मानसिकतेत इतक्या घट्ट रुतलेल्या असतात की, स्वतःच्या परिस्थितीत दुःखी असूनही ती आपल्या मुलीला अशाच पद्धतीने मोठे करण्याच्या प्रयत्नात असते की, समाज तिला एक परिपूर्ण स्त्री म्हणून स्वीकारेल. आजूबाजूला सर्वत्र हेच चित्र दिसत असल्यामुळे, ह्यापेक्षा वेगळा विचार ती करूच शकत नाही. तिला माहीत असलेल्या सर्व स्त्रिया त्यांच्या मुलींना अशाच पद्धतीने वाढवत असतात. स्वयंपाक, शिवणकाम, विणकाम ह्यासारख्या घरकामां व्यतिरिक्त तिला विनयशील आणि सहनशील बनण्यास

शिकवले जाते. तिला नेहमी हीच शिकवण दिली जाते की तिला आपल्या नवऱ्याचे आणि सासरच्यांचे मन जिंकून घेण्यासाठी त्यांची सेवा केली पाहिजे. यासाठी तिला कितीही कष्ट झाले तरी चालतील. नवऱ्यानी आणि सासरच्यांनी कितीही त्रास दिला, कितीही छळले तरी तिने मात्र त्यांच्यावर प्रेमच करत राहायला हवे मग भले तिला सर्वस्व पणाला लावावे लागले तरी चालेल. या गोष्टींमुळे तिची तर्कसंगत विचार करण्याची शक्ती संपून जाते, आत्मविश्वास नष्ट होतो. आणि हळूहळू ती एक पाळीव प्राणी बनते.

मुग्ध व अल्लड बालिकेची एक स्त्री म्हणून घडवणूक होताना तिच्या अगणित आकांक्षांचा चुराडा होतो. तिच्या स्वप्नांना तिलांजली दिली जाते. जुनाट चालीरिती, अंधश्रद्धा व रूढींना धरून राहणाऱ्या मुलीचे समाजामध्ये कौतुक होते आणि तिला आदर्श गृहिणीचा मान मिळतो. याउलट परंपरेच्या नावाखाली अशा बुरसटलेल्या समजुतींना मुकाट्याने धरून न राहता, तिने स्वतंत्र विचाराने काही करण्याचा प्रयत्न केला तर समाज तिची नाचक्की करून तिला अपमानित करतो, तिचा विद्रोह क्रुरपणे मोडून काढला जातो. अशा प्रकारे सर्व बाजूंनी गळचेपी झाल्यावर हताश होऊन जुनाट चालीरीती, अंधश्रद्धा व रूढींना निमूटपणे चिकटून राहणाऱ्या स्त्रीमध्ये तिचे रूपांतर होते.

अनेक संशोधने व अभ्यासातून ही गोष्ट सिद्ध झाली आहे की, समाजामध्ये स्त्रियांचे दुय्यम स्थान पूर्वीपासून नव्हते. मानवी समाजाच्या विकासातील सुरुवातीच्या काळात आणि माणूस जेव्हापासून पृथ्वीवर आहे त्याच्या 90% पेक्षा जास्त वेळ समाजात स्त्रीचे वर्चस्व होते किंवा मातृप्रधान समाजव्यवस्था होती (पण मातृसत्ताक म्हणजे पितृसत्ताकच्या उलट अर्थ नव्हे). स्त्री कुटुंबप्रमुख असे. स्त्री–पुरुषांमध्ये कोणताही भेदभाव नव्हता. दोघांचाही घरकामांमध्ये आणि बाहेरील कामांमध्ये सहभाग असायचा. नंतरच्या काळात संपत्तीच्या मालकीचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर स्त्रीला सामाजिक कामातून काढून घरातील कामांमध्ये अडकवले गेले. पुरुष प्राधान्याने बाहेरील कामे करू लागले आणि स्त्रीला घराबाहेरील कामांमधून काढून घरकामांमध्ये अडकवले गेले. स्त्री घरात दिवसरात्र काम करायची पण ती कुठल्याही प्रकारचे उत्पादन करत नव्हती की ज्यामुळे संपत्ती निर्माण होईल. म्हणून हळूहळू तिच्या कामाचे महत्त्व कमी होत गेले. उलट उत्पादनाचे कोणतही काम करत नसतानाही तिचे खाणे-पिणे, राहणे, तिचा संभाळ करून पुरुष तिच्यावर उपकारच करत आहे अशी भावना निर्माण केली गेली.

स्त्रीने ह्या असमान परिस्थितीबद्दल कोणताही जाब विचारू नये म्हणून रूढी-

परंपरा, रिती-रिवाज तयार करण्यात आले, त्याच्या समर्थनार्थ साहित्याची निर्मिती करण्यात आली. स्त्रीचा दुय्यम दर्जा हा तिच्यावर अन्याय नसून तिच्या पूर्व जन्मीच्या कर्मांचे फळ आहे, असे धर्माच्या आधारे तिच्यावर बिंबविण्यात आले. फक्त स्वतःच्या परिस्थितीचा विचार न करता तिने इतरांसाठी आपले जीवन समर्पित करावे ह्यासाठी आदर्श स्त्रीला ममताळू, त्यागाची आणि सहनशीलतेची मूर्ती, पतिव्रता अशा विशेषणांनी परिभाषित केले गेले. ह्या स्त्री विरोधी परंपरा हळूहळू समाजात इतक्या रुजल्या आणि इतक्या सहज स्वीकारल्या गेल्या की त्यात काही चुकीचे आहे असे आजही कोणाला वाटत नाही आणि म्हणूनच या मूल्यव्यवस्थेला आणि या परंपरांना फारसा विरोधच उरला नाही.

या सगळ्यामुळे स्त्रीला माणूस बनण्याऐवजी ‘स्त्री’ बनायला भाग पाडले, जी शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक पातळीवर पूर्णपणे पुरुषावर अवलंबून राहील. शोकांतिका ही आहे की ह्या प्रक्रियेत पुरुषही माणूस बनू शकला नाही तर फक्त एक पुरुष बनून राहिला.

तेव्हापासून आतापर्यंत काळ बदलला, समाजही अविरतपणे बदलत राहिला, पण स्त्रियांबद्दलच्या भेदभावाच्या दृष्टीकोनात कोणताही बदल झाला नाही. आज मुली घराच्या चार भिंतींना ओलांडून बाहेर पडल्या आहेत. शिकून सवरून स्वतःच्या पायावर उभ्याही राहत आहेत — जे बेड्या तोडण्यासाठीचे पहिले पाऊल आहे. त्या पुरुषांपेक्षा कोठेही कमी नाहीत हे त्यांनी सिद्ध केले आहे. उदा. एस.एस.सी. आणि बोर्डाच्या परीक्षांमध्ये मुली मुलांइतक्याच, किंबहुना त्यांच्यापेक्षा जास्त, गुणवत्तेच्या दिसतात. घराबाहेर पडून अनेक स्त्रिया नोकऱ्या करत आहेत. अनेक स्त्रियांनी व्यवसायामध्येही उत्तम यश मिळविले आहे. असे असूनही समाज आणि कुटुंबामध्ये अजूनही स्त्रीचे स्थान दुय्यमच आहे. स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित करण्याचे ध्येय अद्याप बरेच दूर आहे.

समाजात स्त्रीला समान स्थान मिळणे ही सोपी गोष्ट नाही; त्यासाठी तिला सतत आणि मोठा संघर्ष करावा लागणार आहे. स्त्रियांना त्यांच्या स्वातंत्र्याची लढाई स्वतःच लढायला लागणार आहे. दुसरा कोणीतरी येऊन तिला मुक्त नाही करणार. या लढ्यामध्ये यश मिळविण्याकरता, मुलींना स्वतःच्या परिस्थितीचा तर्कशुद्ध व सखोल विचार करायला लागेल. एका मुलीची स्त्रीऐवजी माणूस बनण्याची स्थिती तेव्हाच येऊ शकते जेव्हा ती स्वतःच्या अस्मितेच्या बाबतीत सजग असेल आणि आपल्या दुय्यम मानसिकतेला पुष्टी देणाऱ्या अंधविश्वास, जुनाट रूढी-परंपरा आणि स्वतःचा न्यूनगंड तोडून समाजापुढे ठामपणे उभी राहील, तेव्हाच तिला त्या

लढ्यामध्ये यश मिळेल.


स्त्री–पुरुष समानतेसाठीचा संघर्ष हा अनिवार्यपणे न्याय्य आणि समतापूर्ण समाजासाठीचा संघर्ष असेल; जेव्हा खऱ्या अर्थाने न्याय्य आणि समानतेवर आधारित आदर्श समाज निर्माण होईल तेव्हाच स्त्रियांच्या समानतेचा पाया घातला जाईल. स्त्रियांना सक्रियपणे ह्या संघर्षात सहभागी व्हायला लागेल. दुसऱ्या बाजूने पाहायचे झाले तर न्यायासाठी केलेल्या कोणत्याही लढ्यांमध्ये ज्यात समाजातील अर्धी लोकसंख्या सामील नाही तो लढा अर्धाच राहील.

त्यासाठी एका अशा समाजाची स्थापना व्हायला हवी की ज्यात स्त्रियांच्या घरकामाला महत्त्व दिले जाईल, घरकामासारख्या ‘अनुत्पादक’ कामाला बाहेरच्या ‘उत्पादक’ कामाचा दर्जा मिळेल, मुले जन्माला घालण्याच्या तिच्या नैसर्गिक विशेषतेला समाजात उत्पादनाचे एक अनिवार्य काम म्हणून सन्मान व मान्यता मिळेल. असा समाज निर्माण होण्यासाठी लांब आणि प्रदीर्घ संघर्षाची गरज आहे ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीमध्ये ही मूल्यव्यवस्था रुजवली जाईल. तेव्हा समाजात कुठलाच भेदभाव राहणार नाही. तेव्हाच स्त्री केवळ स्त्री राहाणार नाही आणि पुरुष केवळ पुरुष राहाणार नाही. ते दोघेही खऱ्या अर्थाने ‘माणूस’ बनतील आणि समाजाला उन्नतीच्या शिखरावर नेऊन पोचवतील.

■ ■

*ि ए र ा ै ं ी ा ि मख़ ि षृ ी ै ं ु ह ी ु*
*ई ख़ ख़्म ों ा र फख़ृ झ्न ि ी ै ं ी*
*ों ि म ि ृ फ ृ ि ु ृ ख़ ि ी ख़*
*औं ड़ौं ु फ्रै ी म ई ों ि ृ ि ों ख़ा*
*झ्न ट ख़ें ै ं न ि ि ी ु*
*ि ए ी व ि ों ख़ई ों ि ड़ौं म*
*ै ं ि ी ख़ृ ु फिं ा*
*ि ख़र फ ों ी शु ल ि ख़ा*
*ि ख़र फ ों*

*ा ु र*



3

# सौंदर्यस्पर्धांचा बाजार

गेल्या काही वर्षांषपासून कधी जागरूक असल्यामुळे किंवा कधी परिस्थितीमुळे स्त्रिया घराबाहेर पडायला लागल्या आहेत. नोकऱ्यांच्या शोधात आहेत. सध्या देशात दुर्दैवाने पुरेसे रोजगार उपलब्ध नाहीत. देशाची सध्याची आर्थिक तथा सामाजिक व्यवस्था स्त्रियांना ना धड शिक्षण देऊ शकत, ना रोजगार, ना सुरक्षित घरे, ना अन्य काही सुविधा. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन मोठमोठ्या नफेखोर कंपन्या स्त्रियांना स्वस्तात काम करायला भाग पाडतात एवढेच नाही तर त्यांचे वेगवेगळ्या पद्धतींनी शोषण करतात. ह्यातलीच एक पद्धत आहे आपले उत्पादन विकण्यासाठी स्त्रियांच्या चेहेऱ्याचा आणि शरीराचा वापर. महिलाही कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांच्या जाहिरातींसाठी आपल्या शरीराचा वापर करून देण्यास तयार आहेत कारण आज *'मॉडेलिंग'* हा अतिशय आकर्षक व्यवसाय झाला आहे. या नफेखोर कंपन्यांनी *'मॉडेलिंग'* आणि 'सौंदर्यस्पर्धा' या भोवती एक आकर्षक वलय तयार केले आहे. आणि अनेक तरुण मुली ह्या ग्लॅमर आणि चकचकीतपणाकडे आकर्षित होत आहेत.

अत्यंत रूढीप्रिय आणि पुराणमतवादी भारतीय समाजामध्ये मॉडेलिंगसारख्या कामाला अचानक मानाचे स्थान कसे काय मिळू लागले?

वास्तविक हा बदल गेल्या तीन दशकांपासून दिसू लागला. याची सुरुवात 1990च्या दशकात झाली, जेव्हा अचानक जागतिक सौंदर्यस्पर्धांमध्ये भारतीय मुलींनी 'जगत-सुंदरी,' 'विश्व-सुंदरी' या स्पर्धा जिंकल्या. अर्थातच, भारतीय मुली अचानक सुंदर होऊ लागल्या असे तर नाही झाले. तर मग 1990च्या दशकात

सौंदर्यस्पर्धांमध्ये भारतीय सुंदऱ्या आंतरराष्ट्रीय सौंदर्यवती म्हणून जिंकून कशा आल्या?

## सौंदर्यस्पर्धा आणि बहुराष्ट्रीय कंपन्या

गेल्या काही वर्षांमध्ये निवडून आलेल्यांपैकी अनेक सुंदऱ्या भारतातील आहेत, हे काही सहज घडलेले नाही. पाश्चात्य देशांतील मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बाजारविषयक धोरणाची (*मार्केटिंग स्ट्रॅटेजी*) ती एक विचारपूर्वक खेळलेली चाल आहे. नफा आणि फक्त नफा कमावणे, आणि तोच नफा पुन्हा व्यवसायात गुंतवून अजून प्रचंड नफा कमावणे हे एकमेव ध्येय ह्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे असते. पण हा प्रचंड नफा कमावण्यासाठी त्यांनी उत्पादन केलेल्या वस्तू विकल्या जाण्याची गरज असते. बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या बेफाट उत्पादन क्षमता असलेल्या महाकाय कंपन्या आहेत. नफा, आणखीन नफा हे चक्र अतिउत्पादनाच्या अवस्थेला येऊन ठेपते. विकसित देशातील बाजार त्यांच्या उत्पादनाने पूर्ण भरल्यामुळे ते तिसऱ्या जगातील आशिया, अफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांकडे वळले. विकसित देशातील वस्तू व भांडवलासाठी अविकसित देशांचा बाजार उपलब्ध करून देण्यास भाग पाडण्यात ते यशस्वी झाले. [ह्यालाच जागतिकीकरण (ग्लोबलायझेशन) म्हटले जाते.] म्हणूनच गेल्या काही दशकांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणात तिसऱ्या जगातील देशांच्या बाजारात प्रवेश करून आपला माल विकून नफा कमावत आहेत. तथापी तिसऱ्या जगातील या देशांमधल्या प्रचंड गरिबीमुळे तेथील बाजार मर्यादित आहेत. लोकांनी आपला माल जास्तीत जास्त विकत घ्यावा म्हणून, बहुराष्ट्रीय कंपन्या सर्व प्रकारची विपणन तंत्रे (*मार्केटिंग टेक्निक्स*) व क्लृप्त्या वापरतात. त्यांनी विकसित केलेले यशस्वी विक्री तंत्र म्हणजे त्याच देशातील एक शरीर 'सुंदरी'च्या रूपात निवडायचे. मग मीडियाच्या माध्यमातून ह्या चेहेऱ्याला म्हणजेच शरीराला इतकी प्रसिद्धी द्यायची की 5 वर्षापासून ते 95 वर्षापर्यंतची कुठलीही व्यक्ती त्यामुळे प्रभावित झाल्याशिवाय राहणार नाही. आणि मग ते शरीर चेहऱ्यावर खोटे हास्य आणून जाहिरातींच्या होर्डिंग्ज पासून टीव्हीवरील जाहिरातींपर्यंत जिकडे तिकडे ह्या कंपन्यांचे हे नाही तर ते उत्पादन विकत घेण्यासाठी आग्रह करताना दिसतात.

## भारतातील सौंदर्यस्पर्धा

भारतातून मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स, मिस आशिया–पॅसिफिक, इत्यादींसारख्या जागतिक सौंदर्यस्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी पाठवण्यात येणाऱ्या स्पर्धकांची राष्ट्रीय सौंदर्यस्पर्धा *'फेमिना'* मासिकाच्या वतीने चालवली जाते.

1990च्या दशकाच्या सुरुवातीला सुश्मिता सेन (मिस युनिव्हर्स, 1994) आणि ऐश्वर्या राय (मिस वर्ल्ड, 1994) या भारतीय सुंदरींनी जागतिक किताब मिळविल्यानंतर या सौंदर्यस्पर्धा फार लोकप्रिय झाल्या. 1991 साली भारताने बहुराष्ट्रीय कंपन्यांना देशाची बाजारपेठ मुक्त केल्यावर, चार वर्षात भारतात विजेत्यांचा महापूरच सुरू झाला, हा काही निव्वळ योगायोग नव्हता. सौंदर्य उत्पादने, कपडे, फॅशन उत्पादने बनवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या स्पर्धेच्या प्रायोजक असतात आणि त्यांच्या मालाच्या विक्रीकरता अशा सौंदर्यस्पर्धांच्या उपयुक्ततेची त्यांना पूर्ण कल्पना आहे. सात वर्षांमध्ये सहा भारतीय सुंदरींनी जागतिक सौंदर्यस्पर्धा जिंकल्यामुळे आपल्या देशात ह्या स्पर्धांची लोकप्रियता आकाशाला जाऊन भिडली.

'फेमिना मिस इंडिया' सौंदर्यस्पर्धा दरवर्षी भरवल्या जातात. या सौंदर्यस्पर्धांमध्ये देशातील कानाकोपऱ्यातून आलेल्या शेकडो तरुणींच्या शरीराचे मोजमाप केले जाते. ज्या तिघींना विजेते घोषित केले जाते, त्याव्यतिरिक्त मिस सुंदर कातडी, मिस सुंदर केस, मिस सुंदर स्मित, मिस उत्साही, मिस जलपरी, इ. नावांखाली अनेक सुंदर व सुडौल शरीरांची निवड केली जाते. सौंदर्यस्पर्धेला बुद्धिचातुर्याची किनार लावण्यासाठी शेवटच्या फेरीमधील सर्व सुंदरींना प्रश्न विचारला जातो. काय दर्जाचे प्रश्न विचारले जातात यासाठी 2014 च्या सौंदर्यस्पर्धेचे उदाहरणच पाहूया. अंतिम फेरीतील स्पर्धकांना हा प्रश्न विचारला गेला की "ह्या सौंदर्यस्पर्धेतून तुम्ही काय घेऊन जाणार आहात?" त्याला विजेत्या सुंदरीचे उत्तर होते, "सर्व स्पर्धकांकडून मी खूप शिकले." दुसऱ्या क्रमांकावरील सुंदरीचे उत्तर होते, "सर्व स्पर्धकांकडून मी खूप शिकले, विशेषतः शांत आणि संयमी राहण्यास शिकले." तिसऱ्या क्रमांकावरील सुंदरीचे उत्तर होते, "सर्व स्पर्धकांकडून मी खूप शिकले, विशेषतः साधेपणा." वा, काय महान बुद्धिचातुर्य! सुडौल शरीरांचे नजरांनी आकंठ सौंदर्यपान करणाऱ्या प्रेक्षकांनी त्या चतुर(?) उत्तरांवर अर्थातच टाळ्यांचा कडकडाट केला.

विजयी देह निवडून झाल्यानंतर त्यांच्यावर बक्षिसांचा आणि पैशाचा पाऊस पडला. लगेचच, त्यांना जाहिरातींसाठी फोटो प्रदर्शन करायला बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्वरित आपल्या ताब्यात घेतले.

लोकप्रियता, संपत्तीचा पाऊस, बाजाराची टपकणारी लाळ ... कोणत्या स्त्रीला वाटणार नाही की हा पाऊस तिच्या शरीरावर पडावा म्हणून. तिच्या शरीरावर पडला तर तो देशावर पण पडणार! सुश्मिता सेन आणि ऐश्वर्या राय ह्या 1994 च्या जागतिक सौंदर्यस्पर्धेमध्ये विजेत्या झाल्याबरोबर माध्यमांनी जाहीर केले की "त्यांनी भारताची

मान गर्वाने उंच केली.” आजच्या बाजारू अर्थव्यवस्थेमध्ये देशाभिमानाची व्याख्या इतक्या निकृष्ट दर्जाला नेऊन पोहोचविली आहे! त्यात शरीराची काळजी घेणे, कमी खाणे, नाजूक कंबर ठेवणे, लांब सडक केळीच्या खांबासारखे पाय ठेवणे, 36–24–36 ची फिगर राखणे, संतुलित हसणे–बोलणे, आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे असे कपडे घालणे ज्यातून शरीर व्यवस्थित दिसेल ह्या सगळ्याचा समावेश आहे ... सगळं देशासाठी! वा! गरिबीने ग्रासलेल्या, बेरोजगारीने पिडलेल्या देशाला हेच तर पाहिजे ... एक सुंदर व सुडौल शरीर, जिच्या मधुर हास्यामुळे भुकेकंगाल आणि कामधंदा नसलेल्यांची दुःखे क्षणभर का होईना विसरली जातील.

प्रत्येक स्त्रीमध्ये तिचे स्वतःचे एक अद्वितीय सौंदर्य असते. आपण वेगवेगळ्या प्रकारच्या सौंदर्यांची तुलना कशी करू शकू? एका कृष्णवर्णिय युवतीच्या सौंदर्याची तुलना श्वेतवर्णिय युवतीच्या सौंदर्याशी कशी होऊ शकेल? डोंगरांवर रोज चढ-उतार करणाऱ्या एका पहाडी काटक युवतीच्या सौंदर्याची तुलना उंच व सुदृढ पंजाबी युवतीच्या सौंदर्याशी कशी होऊ शकेल? दिवसभर शेतात काम करताना स्वतःची निगा न राखू शकलेल्या युवतीच्या सौंदर्याची तुलना हाता–केसांची उत्तम निगा राखलेल्या शहरी कॉलेज-कुमारीच्या सौंदर्याशी कशी करू शकू? सगळ्याजणी आपापल्या परीने सुंदर असतात.

## सौंदर्यस्पर्धा: विपर्यस्त विकृती

सौंदर्यस्पर्धा ही भांडवलशाही समाजातील एक विकृती आहे. भांडवली समाजामध्ये पैसा, अधिक पैसा आणि आणखीन पैसा हेच महत्त्वाचे सूत्र आहे. कुठल्याही गोष्टीची उपयुक्तता आर्थिक मूल्यावरच ठरवली जाते; सर्व गोष्टी पैशातच रूपांतरित केल्या जातात. मानवी मूल्ये, सहकार, एकमेकांची काळजी घेणे, येणाऱ्या पिढ्यांसाठी पर्यावरणाचे रक्षण करणे, मुलांच्या संगोपनातून मानवी मूल्यांची शिकवण देणे, ज्ञानाचा समाजाच्या भल्यासाठी वापर करणे — अशा प्रकारच्या भावना आणि चिंता भांडवलशाहीमध्ये निरर्थक ठरतात. आणि म्हणूनच, भांडवली व्यवस्थेमध्ये वस्तूंच्या विक्रीसाठी स्त्रीदेहाचा विकृत वापर करणे हे योग्यच मानले जाते. ह्या पार्श्वभूमीवर झगमगते भव्य व्यासपीठ, जवळ जवळ पारदर्शक, कमीत कमी वस्त्रे धारण करून कॅटवॉक करत येणाऱ्या तरुणी आपल्या शरीर सौष्ठवाचे अधिक लोभस दर्शन देण्यासाठी अलगद पावलांनी गिरक्या घेत प्रदर्शन करताना झगमगीत पडद्यांवर दिसतात — ह्या वर्षी स्पर्धेमधून कार्स, कपडे, सौंदर्य प्रसाधने, चड्ड्या-बॉड्या, चॉकलेट्स, इ. विकण्यासाठी कोणते शरीर निवडायचे ह्यासाठी. हे पुरेसे नाही म्हणून की काय, ह्याचा *‘लाइव्ह टेलिकास्ट’* (थेट प्रक्षेपण) करून जगाच्या कानाकोपऱ्यात ते

दाखवले जाते. सौंदर्यस्पर्धांचे आयोजक त्यांच्या प्रसारणाचे हक्क विकून अमाप पैसा कमावतात आणि प्रसारमाध्यमेही त्याचे प्रसारण व जाहिरातबाजी करून प्रचंड नफा मिळवितात. म्हणूनच सौंदर्यस्पर्धा सन्माननीय कार्यक्रम बनला आहे. आणि मॉडेलिंग एक प्रतिष्ठित व्यवसाय बनला आहे. या सौंदर्यस्पर्धांमध्ये कोट्यवधी डॉलर्सची उलाढाल होत असते आणि म्हणूनच स्त्रियांच्या मादक शरीरांच्या उत्तान प्रदर्शनाभोवती डोळे दिपवून टाकणारे *'ग्लॅमर'* निर्माण केले आहे.

अरे, आपण त्वरित निष्कर्षावर तर पोहोचत नाही आहोत ना? स्त्री देहांच्या मोजमापाव्यतिरिक्त विजेत्या स्पर्धकांचा बुद्धिमत्तेचासुद्धा कस लागतो ना? खोलात जाऊन पाहिल्यावर लक्षात येईल की, सौंदर्यस्पर्धेचे वास्तविक स्वरूप झाकण्यासाठी आयोजकांनी केलेली ती एक युक्ती आहे. हे खरे आहे की शरीराची मोजमाप पूर्णपणे घेऊन झाल्यानंतर आणि शक्य असेल त्या सर्व बाजूंनी त्या शरीराचे प्रदर्शन झाल्यानंतर शेवटच्या फेरीमध्ये स्पर्धकांना प्रश्नही विचारले जातात. परंतु ते प्रश्न साचेबद्ध असतात. उदा. खऱ्या सौंदर्याचा अर्थ काय? आणि त्याचे ठरलेले साचेबद्ध उत्तर येते — खऱ्या सौंदर्याचा अर्थ मनाचे सौंदर्य. कधीकधी समाजिक दृष्टीकोनातून प्रश्न विचारले जातात, जसे — "आपल्या देशासाठी काय करणार?" पुन्हा त्याचेही ठराविक उत्तर मिळते — "अनाथ मुले आणि वृद्धांसाठी काहीतरी करणार." आदर्श व्यक्तीबद्दल विचारल्यावर सगळ्यांचे प्रिय उत्तर असते — "मदर तेरेसा." अनाथ मुले, लाचार वृद्ध ... आणि मदर तेरेसा. जी यांचा अधिक चांगला आणि बाजारू वापर करेल ती अंतिम विजेती. अर्थात शंभरएक स्पर्धकांच्या शरीर प्रदर्शनातून निवडलेल्या 4/5 'सुंदर' शरीरांना बुद्धीमत्ता चाचणीचा हा खेळ खेळायला देतात. आम्ही फक्त देहाचे प्रदर्शन करत नाही तर बुद्धिमत्तेचे ... आणि सामाजिक बांधिलकीचेही प्रदर्शन करतो हेच त्यातून दाखवायचे असते.

1994 मध्ये मिस युनिव्हर्स व मिस वर्ल्ड या सौंदर्यस्पर्धेमध्ये अनुक्रमे सुश्मिता सेन आणि ऐश्वर्या राय जेव्हा निवडून आल्या तेव्हा भारताच्या विश्वसुंदरींचा मोठा बोलबाला झाला. भपकेदार छायाचित्रे, सनसनाटी मथळे देऊन प्रसारमाध्यमांनी त्यांच्या अभूतपूर्व यशाचे कौतुक केले. त्यातून स्त्रीचे स्त्रीत्व 'सुंदरी' बनण्यात आहे असा भडीमार देशभरातल्या तरुणींवर केला गेला. सौंदर्यवती बनणे हेच त्यांचे ध्येय बनले, दोघीही देशभरातल्या लाखो तरुणींचा आदर्श बनल्या. सौंदर्यस्पर्धा फक्त शहरांपुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत, तर त्या गल्ली-बोळांत आणि शाळा–कॉलेजेसमध्येही पोहोचल्या. शेकडो मुली अशा स्पर्धांमधून भाग घेऊ लागल्या. त्याचवेळी सौंदर्य प्रसाधने आणि फॅशन कंपन्यांच्या बाजाराला बहार आला. पावडरी,

सौंदर्य-लेप, सुगंधी द्रव्ये आणि सौंदर्य प्रसाधनांच्या उत्पादनांच्या बाजारात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढ झाली; गल्लोगल्ली आणि गावोगावी 'ब्युटीपार्लर्स' उघडली गेली. ब्यूटीपार्लरमध्ये जाऊन केशरचना करणे, भुवया कोरणे, हाता–पायांवरील केस काढणे, महागडे *'डिझाईनर'* कपडे वापरणे, इ. कृत्रिम गोष्टी मुली आणि स्त्रिया 'सुंदर' दिसण्यासाठी मोठ्या प्रमाणात करू लागल्या.

कुटुंबामध्ये आणि समाजामध्ये ज्यापद्धतीने वाढवले जाते, त्यामुळे स्त्रिया स्वतःला अबला, पुरुषांपेक्षा दुय्यम समजतात. स्त्रीच्या शरीरावर लक्ष केंद्रित करणे, आणि विशिष्ट प्रकारचे शरीर आणि आकर्षक दिसणे म्हणजेच सौंदर्य अशा प्रतिमेमुळे स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाला आणखी विकृत केले गेले आहे. पुढील उदाहरण पाहण्यासारखे आहे:

काही वर्षांपूर्वी वर्तमानपत्रात एक बातमी छापून आली होती, दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमधील एका हुशार विद्यार्थिनीने आत्महत्या केली. कारण काय तर स्वतःच्या चेहऱ्यावरील पुटकुळ्यांच्या व्रणांमुळे आपण सुंदर दिसत नाही, अशी तिची धारणा झाली होती. आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये तिने नमूद केले होते की कुरूप दिसत असल्यामुळे ती आत्महत्या करीत आहे. तिच्या बुद्धिमत्तेमुळे तिच्याकडून लोकांना फार अपेक्षा होत्या, पण रंगरूप जे केवळ बाह्य सौंदर्य आहे, तेच आयुष्यभरासाठी इतके महत्त्वपूर्ण ठरले की त्याच्याशिवाय आयुष्य काढणे ही कल्पनाच तिला अशक्य वाटली, तिचे बुद्धिमान असणे गौण ठरले गेले. सौंदर्याची कुरूपता दाखवणाऱ्या स्पर्धेचा परिणाम हाच असणार.

## स्त्रियांच्या शरीरासाठी संघर्ष

1991 मध्ये भारताने खुले आर्थिक धोरण स्वीकारले आणि देशामध्ये जागतिकीकरणास सुरुवात झाली. विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतामध्ये मोठ्या प्रमाणात सौंदर्यस्पर्धा भरविण्यास आरंभ केला.

भारतात विश्वसुंदरी स्पर्धेचे आयोजन सुरू असताना आमची भारतीय संस्कृती धोक्यात येईल हे कारण सांगून काही संस्था ह्या स्पर्धेला विरोध करत होत्या. दोन महत्त्वपूर्ण कारणांमुळे लोकांचा ह्या विरोधाला फारसा पाठिंबा मिळाला नाही. एक म्हणजे ते उदात्तीकरण करत असलेली प्राचीन भारतीय संस्कृती स्त्रियांना घरात बंदिस्त करत होती, स्त्रियांचा शिक्षणाचा हक्क नाकारत होती आणि नवऱ्याच्या मृत्यूनंतर बायकोला सती जाण्यास भाग पाडत होती. उघडपणे भारतीय संस्कृतीचे

उदात्तीकरण करणे म्हणजे ह्या जुनाट रूढींना पाठिंबा देणे. दुसरे म्हणजे सौंदर्यस्पर्धांना विरोध करणाऱ्या ह्या संस्थांचा विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भारतामध्ये होणाऱ्या प्रवेशाला विरोध नव्हता. त्यामुळे सौंदर्यस्पर्धांना असलेल्या त्यांच्या विरोधाला काहीही अर्थ नव्हता कारण सौंदर्यस्पर्धा ह्या विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी भारतीय बाजारपेठेत त्यांचा माल विकण्याचे केवळ एक साधन आहेत. आंतरराष्ट्रीय सौंदर्यस्पर्धेमध्ये भारतीय मुलींना विजेत्यांचे मुकुट चढवले गेले म्हणजे मग त्यांचे चेहेरे विक्री तंत्र म्हणून उपयोगात येतील. सौंदर्यस्पर्धांचे विरोधकही आहेत आणि समर्थकही. खरे तर, सौंदर्यस्पर्धांचे तावातावाने समर्थन करणारे अनेक बुद्धिवादी आहेत. समर्थकांच्या मते सौंदर्यस्पर्धा स्त्री स्वातंत्र्याला मदतच करतात. या दोन विचार प्रवाहांमध्ये असलेला एक महत्त्वपूर्ण वाद तपासून पाहूया.

विरोधक म्हणतात सौंदर्यस्पर्धेमुळे भारतीय परंपरा आणि संस्कृती बिघडत आहे. आत्तापर्यंत साडीत झाकलेले शरीर स्विमिंग सूटमध्ये आले ते अश्लील आहे. तर समर्थकांचा प्रतिप्रश्न — पोहायला जाताना मुली स्विमिंग सूट घालतात तेव्हा का नाही विरोध करत. विरोधकांना भीती आहे स्त्रियांनी शरीरप्रदर्शन करणारे पाश्चात्य पोषाख घातले तर संस्कृती बुडेल (बाईचा पदर ढळला की लगेच संस्कृती बुडते ना), भारतीय पोशाख नाहीसे होतील वगैरे. समर्थकांचे म्हणणे की स्त्रियांचे शरीर कपड्यात पूर्णपणे झाकलेले असेल तर आपल्या देशाची प्रतिमा प्रतिगामी आणि मागासलेली समजली जाईल. काही लोक संस्कृती वाचवत आहेत तर काही देश. पण दोघेही स्त्रीला फक्त देहातच बांधून ठेवत आहेत.

स्त्रीचं शरीर! धर्म वाचवायचा असेल तर स्त्रियांवरच बलात्कार केले जातात; कौटुंबिक सन्मानाचा प्रश्न असेल तर स्त्रियांना मारूनच टाकले जाते; तर कधी संस्कृती धोक्यात असेल आणि तिचे संरक्षण करायचे असेल, तर स्त्रियांचीच नग्न धिंड काढली जाते. शेकडो वर्षे आम्ही स्त्रीला फक्त 'शरीर' बनवून ठेवल्यानंतर आता ते इतके सुडौल झाले आहे की आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकते. आमचे इतर कुठलेही उत्पादन दुसऱ्या देशांशी टक्कर देण्याच्या स्थितीत असो की नसो, आम्ही स्त्री-देह असे पारखून ठेवले आहेत की ते आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्की टक्कर देऊ शकतील. स्त्री-विरोधी दोन्ही विचार समोरासमोर उभे आहेत — लढाई फक्त ह्याचीच आहे की स्त्रीचे शरीर कुठे, किती, कसे आणि कुठपर्यंत वापरायचे. आमच्या संस्कृतीत स्त्री एक 'शरीर' म्हणूनच राहिली आणि आजच्या अर्थव्यवस्थेत पण ती एक शरीरच आहे.

स्त्रीचे शरीर इतके मौल्यवान आहे की त्याचे रक्षण कसे करायचे ह्यावर

सौंदर्यस्पर्धांचे विरोधक आणि समर्थक परस्परांशी वाद घालत असतात. विरोधकांच्या मते स्त्रीचे शरीर झाकले तर लाज राखली जाते, आपली 'भारतीय परंपरा' वाचते; तर समर्थकांच्या मते स्त्रीचे शरीर उघडे पाडले तर परकीय भांडवल देशात येते, उद्योग-धंदे लावले जातात, माल विकला जातो, देशाचा विकास होतो.

स्त्री म्हणजे शरीर असे म्हणून घराच्या चार भिंतीत पूर्ण कपड्यांमध्ये बंदिस्त करून तिला गुलाम मानणारे आणि तिच्या स्वातंत्र्याचा ढोल बडवत तिला बाजारात उभी करणारे ह्यांच्यात फारसा फरक नाहीये. आपल्या इशाऱ्यांवर नाचवणाऱ्या स्त्रीला तेवढेच स्वातंत्र दिले जाते जेवढे समाजाला अपेक्षित आहे. आज बाजाराला मॉडेल पाहिजे. स्त्री जर घरातून बाहेर पडली नाही तर मॉडेल कशी बनेल? ती बाहेर पडली की बाजारातच पोहोचेल ह्याची पूर्ण व्यवस्था करून ठेवलेली आहे.

एक शरीर झाकतो, दुसरा उघडे पाडतो. एक गुलामीचे रक्षण करतो, दुसरा स्वातंत्र्य खरेदी करतो.

आता अलीकडे तर स्वतःच्या शरीराचे प्रदर्शन करण्याच्या स्त्रीच्या हक्काचा युक्तिवाद समर्थकांनी आणखी पुढे नेऊन त्याला इथे पोचवले आहे की स्त्रीला आपल्या मर्जीने शरीर विक्रय करता आला पाहिजे आणि म्हणून शरीर विक्रय करणाऱ्या वेश्यांना *'सेक्स वर्कर्स'* असे म्हणावे. त्यासाठी कायदे बनवण्याचीही मागणी करण्यात आली आहे. आश्चर्य म्हणजे, स्त्रीला आपल्या मर्जीने आपला जीवनसाथी निवडण्याच्या, आपल्या मर्जीने शरीरसंबंध ठेवण्याच्या हक्कासाठी कधी तरफदारी करण्यात आली नाही, पण आपल्या मर्जीने शरीर विक्री करता यावी ह्याची तरफदारी मात्र होऊ लागली! घरातून बाहेर पडणाऱ्या स्त्रीला एकच रस्ता असतो — बाजाराचा. मग तिथे तिने आपले शरीर वापरून सामान विकावे अथवा आपले शरीरच विकावे.

भारतासारख्या देशामध्ये स्त्रीचे सामाजिक स्थान सर्वथा कनिष्ठ आहे. 'माणूस' म्हणून तिला स्थानच नाही. आता तर तिला भोगवस्तू म्हणून वापरायची जाहिरातच होत आहे. सौंदर्यस्पर्धांनी तर तिला उपभोग्य वस्तू बनवले आहे. तेव्हा सौंदर्यबाजाराची ही नशा आणि त्यातले धोके हे स्त्रीचे माणूस म्हणून असलेले स्थान, तिचा सुरक्षित वावर आणि समाजस्वास्थ्य ह्या दृष्टीने लक्षात घेणे आवश्यक आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या लोभस जाहिराती आणि त्यांतून प्रोत्साहित केले जात असलेले 'विकृत आदर्श' यांना झिडकारून, सौंदर्यस्पर्धांसारख्या स्त्रीदेहाच्या बाजाराला ठामपणे विरोध करण्याची गरज आहे. त्या बंद पाडल्या पाहिजेत. स्त्री–पुरुष ताठ मानेने उभे राहतील असा समाज निर्माण करण्याची जबाबदारी आपली आहे.

■ ■



4

# स्त्रीच स्त्रीची शत्रू आहे

गेल्या काही वर्षांत अनेक महाविद्यालांतून स्त्रियांच्या प्रश्नांवर 'अभिव्यक्ती' ने बरेच कार्यक्रम केले. व्याख्याने दिली, कार्यशाळा आयोजित केल्या, माहितीपट दाखविले, *'मुलगी झाली हो,'* हे नाटक केले. प्रत्येक वेळी मुलांकडून हमखास येणारा प्रश्न म्हणजे "अहो खरंतर बाईच बाईची शत्रू असते", "सासूच नाही का सुनेला छळत?" "नणंदा–भावजयांचे किंवा जावा–जावांचे पटलेले कधी पाहिले आहे का?" आणि "नळावर भांडणाऱ्या बायका तर एकमेकींच्या झिंज्या उपटत असतात" ... बोलाणाऱ्यांचा उद्देश हाच असतो की, स्त्रियांचे जे काही प्रश्न असतात ते स्त्रियांमुळेच आहेत आणि त्याला पुरुष जबाबदार नाहीत. त्या आपापसात सामंजस्याने वागल्या तर कशाला होईल त्यांच्यावर अत्याचार, कशाला होईल छळ?

अशा प्रकारच्या प्रतिक्रिया फक्त मुलांकडूनच नव्हे तर बायकांकडून, मुलींकडूनही आल्या आणि फक्त महाविद्यालयांतून नव्हे तर ऑफीसेसमधून, घरांमधून व इतरही ठिकाणी बोलताना पुढे आल्या. जेव्हा जेव्हा आम्ही बायकांच्या एकतेच्या आणि त्यांच्या संघटित होण्याच्या गोष्टी बोलतो तेव्हा अनेक लोक — बायका आणि पुरुष — हेच सांगतात की बाईच बाईची शत्रू आहे, तेव्हा त्या एकत्र येणे शक्य नाही. हे बोलताना काही लोक परत परत सासवा–सुना, नणंदा–भावजया, जावा–जावा ह्यांच्या भांडणाची उदाहरणे देतात तर काही आपल्या ऑफिसमधील महिला अधिकाऱ्यांच्या छळवादी वर्तणुकीची उदाहरणे देतात.

वरवर पाहता बाईच बाईची शत्रू असते हा युक्तिवाद अगदी खरा वाटणारा आहे. पण थोडा खोलात जाऊन विचार केला तर आपल्याला समजेल की याची पाळेमुळे पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये आहेत.

## पितृसत्ताक समाज

आपला समाज हा पितृसत्ताक समाज आहे. म्हणजे पुरुष हा कुटुंब-प्रमुख आहे. ह्या नात्याने कुटुंबावर त्याची सत्ता असते. घरातील सत्ता, संपत्ती, साधने व सदस्य यांच्यावर मालकी व नियंत्रण पुरुषाचेच असते. त्याच्याच नावाने कुटुंब ओळखले जाते व तोच कुटुंबासाठी निर्णय घेतो. एका पुरुषानंतर घरातील सत्ता, कर्तेपण, हे दुसऱ्या पुरुषाच्या हातात सोपवले जाते. त्या अर्थाने मुलगा हा वंशाचा दिवा मानला जातो कारण तो कुटुंबाचा उत्तराधिकारी असतो.

पितृसत्ताक समाजामध्ये पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ मानला जातो आणि कुटुंबांतर्गत त्याचे स्त्रीवर नियंत्रण असते. केवळ स्त्रीच नाही तर तिचे शरीर, मन, व्यवहार यांवरही पुरुषाचे नियंत्रण असते. येथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की पुरुषाचे स्त्रीवरील प्रभुत्व हे तो पिता, पती किंवा पुत्र असल्यामुळे नसून तो 'पुरुष' आहे म्हणून असते. आपला समाज हा लोकतांत्रिक नसून श्रेणीबद्ध समाज आहे. त्यात अनेक सत्ताकेंद्रे आहेत आणि कुटुंबातील सत्ताकेंद्र पुरुष आहे.

स्त्रियांवरील पुरुषांच्या प्रभुत्वाचे मूळ त्यांच्या आर्थिक बळामध्ये आहे. म्हणूनच पुरुष कुटुंबप्रमुख आहे आणि स्त्री त्याच्यावर अवलंबून आहे. हजारो वर्षे ह्याच परिस्थितीत राहिल्यामुळे नम्रपणे तिने समाजातील आपली दुय्यम भूमिका मान्य केली आहे, म्हणून ती पुरुषाची गुलामी सहन करते आणि त्यालाच आपले नशीब मानू लागते. पिढ्यानपिढ्या चालत आलेला हा विचार पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही आत्मसात केलेला आहे. स्त्रियांनी ही विचारसरणी खरोखरच इतकी स्वीकारली आहे की सर्व गोष्टींकडे त्या पुरुषवादी मानसिकतेतून पाहतात. तिला तिचा स्वतंत्र विचार नसतो. वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या आपली आई वागली त्याप्रमाणे आपण वागायचे आणि आपल्या मुलीनेही आपल्याप्रमाणेच वागले पाहिजे असा तिचा आग्रह असतो.

हाच पितृसत्ताक समाज स्त्रियांमधील वादाला कारणीभूत आहे.

## स्त्री विरुद्ध स्त्री का ?

बाईच बाईची शत्रू असण्याचे अत्यंत प्रचलित उदाहरण सासू–सुनेचे दिले जाते. घरात जेव्हा सून येते तेव्हा सासूसुद्धा फक्त बाई असत नाही. ती पण त्याच पितृसत्ताक मानसिकतेत असल्यामुळे ती फक्त 'स्त्री' राहत नाही तर एक सत्ता बनते. समानता आणि लोकशाही मूल्ये नसलेल्या श्रेणीबद्ध कुटुंबामध्ये वाढलेल्या सासूच्या मनात पितृसत्ताक मनोधारणा इतकी रुजलेली असते की ती स्वतःला सुनेपेक्षा श्रेष्ठ समजते. म्हणून सुनेवर सत्ता गाजवते कारण आयुष्यभर कमजोर व महत्त्वहीन व्यक्ती

म्हणून ती जगत असते आणि पहिल्यांदाच कुणावरतरी सत्ता गाजवण्याच्या स्थितीत येते. दुसरीकडे जी मुलगी घरात सून म्हणून येते, तिला तिच्या वडिलांचे घरही आपलेसे वाटत नाही कारत ती सतत ऐकत आलेली असते की 'तू परक्याचे धन आहेस'; लग्नानंतर तिला सासरीही परकीच समजतात. पण हळूहळू जेव्हा ती सासरचे घर आपलेसे करू लागते तेव्हा सासूला आपल्या अधिकारांवर गदा आल्यासारखे वाटू लागते आणि घरातील तणावाला सुरुवात होते. म्हणजेच सासू–सुनेतील या तणावाचे कारण पितृसत्ताक कुटुंबात असलेले स्त्रियांचे दुय्यम स्थान हे आहे.

सासू सुनेतील एका नेहमीच्या संघर्षाकडे नजर टाकूया. स्त्रियांची स्वतःची व्यक्तिगत संपत्ती नसते. ज्या स्त्रिया नोकरी करतात त्यापैकी बहुतांश जणींचा आपल्या कमाईवर अधिकार नसतो. त्यावर तिच्या नवऱ्याचे नियंत्रण असते. तिचा पगार किंवा मिळकत कशी खर्च करायची हे तिचा नवरा ठरवतो. तिच्या ह्या परावलंबी अवस्थेमुळे नवऱ्याच्या संपत्तीला ती स्वतःची समजू लागते. आणि आपल्या नवऱ्याच्या संपत्तीवर कोणी अधिकार गाजवत असेल तर त्याला ती विरोधक समजते. हे फक्त सासू–सुनेच्याच नव्हे तर नणंदा–भावजया, किंवा जावा–जावांमधील भांडणाचे एक महत्त्वाचे कारण आहे. ह्या भांडणांना स्त्रियांमधील भांडणे समजणे योग्य नाही. इथे भांडणाचे मूळ कारण संपत्तीच असते. प्रत्यक्षात संपत्तीमुळे होणारी भांडणे ही स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये अधिक होतात पण शत्रू होण्याचे खापर मात्र स्त्रियांवर फोडले जाते. अजून एक महत्त्वाचा मुद्दा असा की स्त्रियांना मिळकतीमध्ये हक्कच नसल्यामुळे, मालमत्तेवरून त्या कशा भांडू शकतील? या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे, कुटुंबाच्या मालमत्तेवर पुरुषांचीच सत्ता असल्यामुळे, मालमत्तेवरून होत असलेले स्त्रियांचे भांडण हा मालमत्तेवरून पुरुषांच्या परस्परांमधील चालू असलेल्या भांडणाचा विस्तारित भाग असतो. परंतु पुरुषांमधील भांडण मागे पडून, भांडखोर व परस्परांच्या शत्रू म्हणून स्त्रिया बदनाम होत राहतात.

मुलगी जेव्हा लग्न होऊन प्रथम सासरी जाते, तेव्हा सासरच्या सर्व चालीरीती आणि नियम यांचे शिक्षण तिला सासूकडून मिळते. घरातील पुरुषांचा त्यामध्ये काहीही वाटा नसतो. त्यांना सुनेच्या वर्तणुकीमध्ये जर काही चूक आढळली, तर ते दुसऱ्या स्त्रियांद्वारे सुनेला सांगतात. त्यामुळे वरवर पाहता असे दिसते की, घरातील स्त्रियाच सुनेला छळत आहेत. पण प्रत्यक्षात ते पितृसत्ताक कुटुंबातील पुरुषांचे नवीन लग्न झालेल्या सुनेवरील नियंत्रण असते. कुटुंबातील सर्व नियम पुरुषांनी बनविलेले असून ते केवळ स्त्रियांसाठी असतात; पुरुषांवर काहीही बंधने नसतात. पुरुष काहीही करण्यास मुखत्यार असतात. कुटुंबाचे सर्व नियम अंमलात आणण्याची जबाबदारी

कुटुंबातील वयाने मोठ्या असलेल्या स्त्रियांची असून त्या सर्व चालीरीती आणि नियम काटेकोरपणे अंमलात आणतात; कारण त्या स्वतःच कुटुंबाच्या गुलाम असतात.

स्त्रिया ह्या परस्परांच्या शत्रू असल्याचे अजून एक दिले जाणारे उदाहरण म्हणजे हुंड्यासाठी सासू/नणंदेकडून होणारा सुनेचा छळ किंवा खून. हा संघर्षसुद्धा स्त्री–स्त्रीमधील संघर्ष नसून, पैशाच्या हव्यासामुळे निर्माण झालेला संघर्ष असतो. प्रत्येकाला कुठल्याही मार्गाने पैसा मिळवून एकदम श्रीमंत व्हावयाचे असते. भाऊ–भाऊ इस्टेटीसाठी भांडतात, त्यासाठी कधी कधी एकमेकांचा खूनही पाडतात. इस्टेटीसाठी मुलगा वडिलांच्या पाठीत खंजीर खुपसण्यास तयार होतो. पैशापुढे सर्व नाती पोकळ ठरतात. डॉक्टर–पेशंट हे नाते पवित्र मानले जाते, परंतु आजच्या जगामध्ये पैसा हेच सर्वस्व आहे; ऑपरेशनची फी देण्याची ऐपत नसल्यास, पेशंट मेला तरी डॉक्टर त्याची पर्वा करत नाही. पैशाभोवती फिरत असलेल्या अशा विश्वामध्ये पुरेसा हुंडा न आणल्यामुळे सुनेला दिल्या जाणाऱ्या त्रासाबद्दल फक्त सासूलाच का दोष द्यावा? खरेतर, सुनेच्या छळाला तिचा सासरा आणि पतीही सासूइतकेच जबाबदार असतात, किंबहुना ते जास्त जबाबदार असतात कारण त्यांच्या परवानगीशिवाय घरामधील पानही हलत नसते. घरामध्ये शिजवले जाणारे अन्नसुद्धा त्यांच्याच आवडीचे बनत असते. अशा परिस्थितीत घरातील पुरुषांच्या परवानगीशिवाय एक सासू सुनेचा छळ कसा करू शकेल? हुंड्याच्या नावाने सुनेचा केलेला छळ हा दोन स्त्रियांमधील संघर्ष नसतोच, तर तो पैशाच्या लोभातून केलेला गुन्हा असतो.

सासू–सुनेमधील भांडणाचे इतरही अनेक पैलू आहेत, त्यांपैकी एक म्हणजे दोन पिढ्यातील अंतरामुळे निर्माण झालेला तणाव. तरुण पिढीतील मुले व मुली नवनवीन कल्पना, नवविचार, रहाणीमान, सुधारणा त्वरित आत्मसात करतात. तर जुन्या पिढीतील लोक बदलांना विरोध करतात, नवीन कल्पना आणि बदल सहजासहजी मान्य करत नाहीत. अशा वातावरणात दोन पिढ्यांमधील संघर्ष विकोपाला जातो. पण असा संघर्ष केवळ सासू–सुनांमध्येच असतो असे नाही, तर वडील–मुलांमध्येही असतो. म्हणून अशा संघर्षाला स्त्री विरुद्ध स्त्री संघर्ष समजणे चुकीचे आहे.

शेवटी सार्वजनिक नळांवर पाण्यावरून होणाऱ्या स्त्रियांच्या नेहमीच्या भांडणाकडे पाहू. पाण्याची कमतरता हे ह्या भांडणांचे मूळ कारण आहे. जेथे कमतरता असते, तेथे जास्त हिस्सा पदरात पडून घेण्याकरता भांडणे होतातच. फक्त बायका पाणी भरायला जातात म्हणून त्या एकमेकींच्या झिंज्या ओढतात; पुरुष जर पाणी भरायला गेले असते तर तेथे रक्तपात झाला असता!

## आपण स्वत:ला अपमानित करणे थांबवू या

निष्कर्ष काढायचा तर तो म्हणजे ‘स्त्री हीच स्त्रीची शत्रू आहे’ ह्या मनोधारणेच्या मुळाशी वास्तवात पितृसत्ताक आणि संपत्ती केंद्रित समाज आहे. कुठलीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची मित्र किंवा शत्रू असू शकते. खरे म्हणजे स्त्रिया ह्या परस्परांच्या अतिशय जवळच्या मैत्रिणी असतात, त्यांच्यामध्ये दृढ भावनिक जवळीक असते; कारण त्यांची सुख-दुःखे समान असतात. त्यांना परस्परांच्या वेदनांबद्दल सहानुभूती असते. अडचणींच्या वेळी स्त्रिया एकमेकींना आधार देऊन पुरुषांपेक्षा जास्त मदत करतात.

मैत्रिणींनो, आपण स्त्रियासुद्धा आपल्या गुलामी मानसिकतेमुळे आणि पितृसत्ताक मनोधारणा मनोमन मान्य केल्यामुळे ‘स्त्रीच स्त्रीची शत्रू आहे’ यावर विश्वास ठेवायला लागलो आहोत. ताकदवान हा नेहमीच दुर्बलांवर कुरघोडी करीत असतो. स्त्री हा समाजाचा सगळ्यात हळवा व दुर्बल घटक असल्यामुळे तिचा अनेक प्रकारांनी अपमान होत असतो. म्हणूनच शिव्यासुद्धा आयाबहिणींवरून असतात. सर्व नकारात्मक गोष्टी आणि असंख्य विनोद हे स्त्रियांच्या दुर्बलतेवर असतात. ‘स्त्री हीच स्त्रीची शत्रू आहे,’ असे म्हणणे हे त्यापैकीच एक.

आपण महिलांनी मनात रुजवलेल्या पितृसत्ताक समाजाची शिकवण प्रथम झुगारून दिली पाहिजे. आत्तापर्यंत स्त्रियांनी मिळविलेले सर्व हक्क आपण एकोप्याने लढल्यामुळे मिळवलेले आहेत. स्त्रिया जर खरोखरीच परस्परांच्या शत्रू असत्या तर आपण एकोप्याने हक्कांसाठी लढा दिलाच नसता. आपली सुख-दुःखे, आपल्या अडचणी, आपल्यावर आलेली संकटे आणि समाजाने आपल्यावर घातलेली बंधने ह्या सर्वांमधील एका समान धाग्यामुळे आपण स्त्रिया एकत्र गुंफलेल्या आहोत.

महागाई, गरिबी, बेरोजगारी, कुपोषण, हुंडा-बळी, स्त्रियांवरील हिंसा आणि अत्याचार यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. आजच्या ‘विकसित’ समजल्या जाणाऱ्या आपल्या समाजामध्ये स्त्रियांची सर्रास खरेदी-विक्री होते, रस्त्यावरून त्यांची नग्न धिंड काढली जाते, क्रूरपणे बलात्कार केले जातात. एकेकट्या राहून ह्या अडचणींना तोंड देणे अशक्य आहे याची जाणीव आपल्याला होणे आवश्यक आहे. आपल्याला एकत्र आलेच पाहिजे.

स्त्रियांमध्ये फूट पाडून त्यांना कमजोर करणाऱ्या वाक्प्रचारांना झटकून टाकावे लागेल. स्त्रियांनी एकत्र येऊन आपल्या मूलभूत समस्यांवर विचार करायला लागेल, त्यांचे विश्लेषण करायला लागेल. माणूस म्हणून जगण्यासाठी एका न्याय्य समाजाची उभारणी करायल लागेल. चला, एकत्र येऊन सिद्ध करूया की आपण स्त्रिया परस्परांच्या शत्रू नसून मैत्रिणी आहोत, अगदी जवळच्या घनिष्ठ मैत्रिणी आहोत! ■ ■

# 5



## सौभाग्य लक्षणांचे वास्तव

मी विवाहित आहे पण माझा वैवाहिक दर्जा समजण्यासाठी मी केसात सिंदूर घालत नाही. एवढेच नाही तर मी कुंकू लावत नाही, गळ्यात घालत नाही, कानात घालत नाही, मंगळसूत्र घालत नाही. मला अनेक प्रश्न विचारले जातात. मलाच नाही तर ज्या बायका विवाहानंतर सौभाग्य अलंकारांचा वापर करत नाहीत त्यांना नेहमीच विचारले जाते की “तुम्ही मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या वगैरे का वापरत नाही?”

विवाहित स्त्रीने लग्नानंतर सौभाग्य अलंकार — कुंकू, मंगळसूत्र, जोडवी, बांगड्या इ. — घातलेच पाहिजेत हा विचार वर्षानुवर्षे समाजात भिनलेला आहे. एखादी बाई जेव्हा हे सर्व नाकारते, तेव्हा लोकांना ते भारतीय परंपरेचे उल्लंघन आहे असे वाटते.

सौभाग्य अलंकार घातल्यामुळे आपले वैवाहिक आयुष्य सुखी होते का याचा आपल्याला गंभीरपणे विचार करायला लागेल. ह्या निर्जीव सौभाग्य अलंकारांची पती–पत्नीच्या सजीव संबंधांना अधिक चांगले बनवण्यात काही भूमिका आहे का? उलट आपण कधीकधी असेही बघतो की सौभाग्य अलंकार वापरण्यात अजिबात कसूर न करणाऱ्या बायकांचे दांपत्यजीवन काही फार सुखाचे असतेच असे नाही.

### सौभाग्य अलंकारांचा इतिहास

सौभाग्य अलंकार हे वास्तविक जुन्या रूढी परंपरांचे सुरू ठेवलेले विस्तारित

रूप आहे. हे घालण्यामध्ये काहीही तर्क नाहीये. जगातल्या अनेक देशांमध्ये, अनेक समाजांमध्ये आपला वैवाहिक दर्जा दाखविण्यासाठी स्त्रिया सौभाग्य अलंकार घालत नाहीत, वैवाहिक दर्जा दाखविण्यासाठी ते आवश्यकही मानले गेले नाहीये. आपल्या देशातल्या सुद्धा काही भागांमध्ये सौभाग्य अलंकारांचा वापर कुठे कमी होतो तर कुठे जास्त, तर कुठे होतच नाही. उत्तरप्रदेश, बंगाल, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान सारख्या मागासलेल्या भागांमध्ये ह्याचा आग्रह जास्त प्रमाणात दिसतो. केरळ, कर्नाटक व पूर्वोत्तर राज्यांमध्ये फारच कमी किंवा दिसतच नाही. ख्रिश्चन, शीख आणि इतर काही समुदायांमध्ये तर विवाहाची अशी काही चिन्हे असलीच पाहिजेत असे नाहीये.

ह्या प्रथांमधल्या फरकांची कारणे आपण इतिहासातून समजून घेऊ शकतो. प्राचीन काळामध्ये आधुनिक मानवाच्या उदयानंतर हजारो वर्षे समाजामध्ये मातृप्रधान कुटुंबव्यवस्था होती आणि कुटुंब प्रमुख स्त्री होती. तिची स्वतःची एक ओळख होती; त्यावेळी कोणाची तरी बायको म्हणून वेगळ्या ओळखीची तिला आवश्यकता नव्हती. कर्नाटक, केरळ आणि पूर्वोत्तर राज्यांमध्ये आजही त्या समाजाचे काही अवशेष सापडतात. इथे सौभाग्य अलंकारांचे विशेष महत्त्व नाहीये. उत्तर प्रदेश व बिहारसारख्या भागांमध्ये दोन हजार वर्षांपूर्वी सरंजामशाही व पितृसत्ताक व्यवस्था अस्तित्वात आली होती, तिथे स्त्रीला खाजगी मालमत्ता म्हणून समजले जायचे. तिला वेगळी ओळख नव्हती. मालक आपली संपत्ती जाहीर करताना त्यांच्या गुलामांच्या आणि जनावरांच्या अंगावर खूणा उमटवायचे. त्याचप्रकारे स्त्रीला (बायकोला) आपल्या मालकासाठी (नवऱ्यासाठी) काही चिन्हे धारण करावी लागायची. अशाप्रकारे सुरुवातीच्या काळात ह्या चिन्हांचा उपयोग गुलामीचे प्रतीक म्हणून सुरू झाला आणि अजूनपर्यंत तो चालूच आहे.

तेव्हापासून आपला समाज प्रगत झाला, सरंजामशाही संपून आधुनिक लोकशाही आली तरी पितृसत्ता आपल्या रूढी-परंपरांसह समाजात अस्तित्वात आहे. सौभाग्य अलंकार त्यापैकीच एक. आजही, स्त्रीला तिच्या नवऱ्याशिवाय वेगळे अस्तित्व नाही. आजही समाजामध्ये पत्नीची पतीपेक्षा वेगळी ओळख नसते. विवाहानंतरची पारंपरिक चिन्ह म्हणजेच सौभाग्य अलंकार न घालणारी स्त्री अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा समजली जाते. ह्यापैकी कुणीच नसेल, म्हणजे विवाहित असूनही सौभाग्य अलंकार नाकारत असेल तर तिला छछोल, चंचल, अनितीमान समजले जाते.

साज-श्रृंगार आणि दागदागिने ह्यामागे आणखी एक तर्क आहे तो म्हणजे

सौंदर्यबोध. लोक नेहमी हे म्हणतात की ह्यामुळे बायकांचे सौंदर्य खुलून दिसते. एक क्षणभर आपण असे गृहित धरू की त्याने सौंदर्य वाढते, तर मग पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीचा सुंदर दिसण्याचा अधिकार हिरावून का घेतला जातो? हा फक्त सौंदर्यबोधाचा मामला निश्चितच नाहीये; तर ती मध्ययुगीन सरंजामशाही पितृसत्ताक समाजव्यवस्थेची एक जुनाट रूढी आहे.

## आधुनिक काळातील बदल

सौंदर्याबाबतचा दृष्टीकोन स्थळ-काळानुसार बदलत असतो. तसेच समाजाच्या त्या त्या वेळेच्या गरजांनुसारही बदलत असतो. राजे-महाराजांच्या काळात डोकावून पाहिले तर त्या काळी स्त्री–पुरुष दोघेही दागदागिने घालत. आजही त्यांची दागदागिने घातलेली चित्रे उपलब्ध आहेत. म्हणजेच त्या काळात पुरुषांनी अंगावर दागिने घालणे रास्त समजले जायचे; ती त्या काळातील फॅशन होती. आधुनिक काळाच्या सुरुवातीला पुरुष जसजसे उत्पादनात जास्त सक्रिय व्हायला लागले तसतसे त्यांनी आपले दागिने काढून टाकले, धोतरासारखी वस्त्रे जाऊन पँट–शर्ट किंवा कुडता–पायजमा यांसारखी काम करताना सुटसुटीत असणारी वस्त्रे घालणे सुरू केले. आधुनिक काळाच्या सुरुवातीला युरोपमध्येही बायका लांब गाऊन किंवा लांब फ्रॉक घालत असत, विविध प्रकारच्या केशभूषा करत असत. पण औद्योगिक क्रांतीच्या वादळात हे सगळे बदलले गेले. मोठ्या प्रमाणात स्त्रिया घराबाहेर पडून कारखान्यांमध्ये कामाला जाऊ लागल्या. त्यांच्या गाऊनची जागा पँट–शर्ट किंवा स्कर्टने घेतली. आर्थिक स्वावलंबनाने त्यांचे व्यक्तिमत्त्व बदलून गेले.

असाच बदल आपल्या देशातही गेल्या सत्तर वर्षांमध्ये झाला आहे. पूर्वी जेव्हा स्त्रिया मुख्यत्वे घरामध्ये होत्या तेव्हा सुंदर दिसण्यासाठी कपडे, दागिने व सौंदर्य प्रसाधनांनी स्वतःला नटविण्याकडे त्यांचा कल होता. समाजामध्ये जसजसा बदल होत गेला, तसतशा स्त्रिया घराबाहेर पडल्या आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन समाजामध्ये स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करू लागल्या. पारंपरिक वस्त्रे, अलंकार व सौभाग्य लक्षणे वापरण्याबाबत त्यांचा दृष्टीकोन साहजिकच बदलत गेला. दोन पिढ्यांपूर्वी आपल्या आजीच्या काळी घातले जाणारे नथ, दंड-वाक्या, बोरमाळ, ठुशी, तन्मणी यांसारखे दागिने आज प्रचलित राहिलेले नाहीत. शहरे तर सोडाच, खेड्यांतसुद्धा आता तसे दागिने कोणी युवती घालत नाही. हा बदल घडवून आणण्यासाठी कुठलेही आंदोलन चालवले गेले नाही, तर सामाजिक गतीबरोबरच हा बदल घडला.

शहरांमध्ये आणि औद्योगिक वसाहतींमध्ये जिथे स्त्रियांचा उत्पादनात सहभाग जास्त आहे, तिथे स्त्रियांनी आपल्या सोयीनुसार बदल केलेले जाणवतात. विशेषतः पोशाखांमधील बदल. म्हणजेच साडीवरून त्या सुटसुटीत अशा पँट–शर्ट आणि सलवार कुडत्याकडे वळल्या आहेत. डॉक्टर्स, इंजिनियर्स, नर्सेस व शिक्षक यांसारख्या नोकरपेशा स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात दागिन्यांचे ओझेही अंगावरून उतरवले. घर ते ऑफिस आणि ऑफिस ते घर ह्या धावपळीत त्यांना साजश्रृंगार करायला किती वेळ मिळत असेल? एवढेच नाही तर कष्टकरी कामगार स्त्रिया सुद्धा जास्त साज-श्रृंगार करत नाहीत. खरेतर, दैनंदिन धकाधकीच्या जीवनात घर ते ऑफिस आणि ऑफिस ते घर ह्या धावपळीत बऱ्याच कार्यरत स्त्रियांना सौंदर्य प्रसाधानांकडे लक्ष देण्यास वेळच नाही.

ह्या बदलांबरोबरच 'वैवाहिक दर्जा दाखवण्यासाठी सौभाग्य अलंकार घालण्याची गरज काय' असा प्रश्न स्त्रिया आता विचारू लागल्या आहेत. अर्थात असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या स्त्रियांची संख्या आत्ता जरी कमी असली तरी हळूहळू वाढत आहे.

## बाह्य सौंदर्य विरुद्ध आंतरिक सौंदर्य

ह्या वादातील आणखी एक महत्त्वाचा पैलू विचारात घेणे आवश्यक आहे: स्त्रीच्या सौंदर्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन. बाहुलीसारखी सजली-सवरलेली, लाजरी-बुजरी, संकोचणारी स्त्रीच सुंदर समजली जाते. ह्याचा अर्थ स्त्रीच्या बाह्य सौंदर्यालाच जास्त महत्त्व दिले जाते. पण सौंदर्याचा एक दुसरा दृष्टीकोनही आहे. आणि तो आहे आंतरिक सौंदर्याचा. एक अशी स्त्री जी स्वावलंबी आहे, जिच्यात आत्मविश्वास आहे, जी समाजाला पुढे नेण्यासाठी आपले योगदान देत असेल तिच्यात दिसणारे सौंदर्य ते आंतरिक सौंदर्य. जसे — महादेवी वर्मा. महादेवी वर्मा लौकिकार्थाने दिसायला सुंदर नव्हत्या, पण इतिहास कधी त्यांचे साहित्याच्या क्षेत्रातले योगदान विसरू शकेल का? आणखी एक अशीच सुंदर महिला म्हणजे महाश्वेता देवी. आजही साहित्य क्षेत्रात त्या उच्च स्थानावर आहेत. त्याचप्रकारे कॅप्टन लक्ष्मी सहगल ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सुभाष चंद्र बोस यांच्याबरोबर नेतृत्व केले. या आणि अशा अनेक महिला बाह्य सौंदर्यासाठी नाही तर आपल्या कार्यामुळे आठवणीत आहेत. ह्याच्या उलट प्रचलित सौंदर्यासाठी आपल्या समोर ऐश्वर्या राय, लारा दत्ता सारख्या महिलाही आहेत. आता आपल्याला ठरवायचे आहे की कुठला दृष्टीकोन आपल्यासाठी जास्त योग्य आहे आणि आज कोणत्या

दृष्टीकोनाला समाजमान्यता मिळाली पाहिजे. सध्याच्या काळात बहुसंख्य जनतेसाठी बाई म्हणजे फक्त 'शरीर', म्हणून त्यांच्यासाठी सुंदर स्त्री म्हणजे आकर्षक बाह्य सौंदर्य असलेली.


बहुराष्ट्रीय कंपन्यांनाही हेच हवे आहे. तेव्हाच तर सौंदर्यप्रसाधने आणि उत्पादने विकण्याचा त्यांचा धंदा जोरात चालेल. म्हणूनच त्यांच्या सर्व जाहिराती स्त्रीच्या केवळ बाह्य सौंदर्याचाच उदो-उदो करतात. इलेक्ट्रॉनिक किंवा छापिल प्रसारमाध्यमेसुद्धा — जी अधिकतम बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नियंत्रणात आहेत — ह्याच प्रबळ विचारसरणीला बळकट करतात. टीव्हीवरच्या सिरियल्समधून स्त्रियांचे चित्रण भारी भारी साड्या, कुंकू, सिंदूर, बिंदी (जी खरेतर आज कोणीच लावत नाही), मंगळसूत्र, आणि भरमसाठ दागिने अशा पेहरावात केले जाते.

एका वेगळ्या पद्धतीने मूलतत्त्ववाद्यांचा सुद्धा ही विचारसरणी बळकट करण्यामध्ये हात आहे. त्यांच्यासाठी स्त्री ही फक्त शरीर, घरातील गुलाम आणि मुले जन्माला घालून त्यांचे संगोपन करणारे यंत्र आहे. म्हणूनच वारंवार ते स्त्रियांसाठी जीन्स व शर्ट–पँटवर बंदी आणणे, स्त्रियांनी बुरखा/साडी घातली पाहिजे असे फतवे काढत असतात.

असे असूनही जसजसा समाज हळूहळू बदलत जातो तसतशा अधिकाधिक स्वतंत्र विचारांच्या आणि धाडसी स्त्रिया घराबाहेर पडून सर्व प्रकारची कामे करीत आहेत. सौंदर्याच्या सामान्य कल्पनांना तिलांजली देऊन बाह्य सौंदर्याला प्राधान्य न देता आंतरिक सौंदर्याला उजाळा देऊन स्त्रिया स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करत आहेत. सध्या त्यांची संख्या कमी असली तरी ती हळूहळू वाढत आहे. जसजसे स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढेल, त्यांच्या जाणीवा विकसित होतील, त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील, स्वतःला माणूस समजू लागतील तसतसे सौंदर्याचे जुने मापदंड आपोआप मागे पडतील. पुरातन काळातील दागदागिने आणि पोषाखाप्रमाणेच वर्तमानकाळातील दागदागिने आणि पोषाख म्युझियममध्येच पहायला मिळतील. सौंदर्याचे मापदंड बदलत आले आहेत आणि पुढेही बदलतील.

■ ■

6



# स्त्रियांच्या मासिकांचे तथ्य

'स्त्रियांची नियतकालिके' ह्या नावावर बाजारात उपलब्ध असलेल्या नियतकालिकांबाबत आपण परिचित आहोतच. नियमितपणे नाही पण कधीतरी रेल्वेस्टेशनवर बरेच 'सुशिक्षित' अशी नियतकालिके चाळत असतात. आपणापैकी बरेच जण अशा मासिकांचे वर्गणीदार असतात आणि आपण ती वाचण्यासाठी वेळही देतो. 25–50 रुपयांच्या ह्या नियतकालिकांमध्ये, साप्ताहिके, पाक्षिके किंवा मासिके आहेत, म्हणजेच महिन्याला 50–200 रुपये आपण यावर खर्च करतो. पण ही नियतकालिके आपल्याला काय देतात ह्याचा आपण विचार केला आहे का?

स्त्रियांची नियतकालिके असल्यामुळे त्यामध्ये अशी काय विशेषता आहे की जी सामान्य नियतकालिकांमध्ये नाही किंवा स्त्रियांबद्दल त्यांचा दृष्टीकोन काय आहे? या नियतकालिकांच्या प्रकाशनाच्या मागे कोणता विचार आहे?

ही नियतकालिके *'वुमन ऑफ सबस्टन्स'* (महिलांचा कणा), 'महिलांची संपूर्ण पत्रिका', आणि आजच्या आधुनिक स्त्रियांसाठी असल्याचे दावे करतात. आदर्श महिलेची त्यांची परिभाषा काय आहे? मध्यमवर्गीय महिला त्याच्या उत्साही वाचक आहेत; त्या महिलांना ही नियतकालिके काय मूल्ये देतात? आणि त्यांच्या मनात काय बिंबवतात? महिलांच्या कुठल्या समस्या ते महत्त्वाच्या समजतात? महिलांच्या या नियतकालिकांमध्ये राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक आणि आर्थिक विषयांवर लेख असतात का? की त्यांच्या मते हे विषय महिलांसाठी महत्त्वाचे नाहीतच? महिलांच्या ह्या नियतकालिकांच्या मते 'कालची महिला' आणि 'आजची महिला' यामध्ये फरक काय आहे आणि काय असायला हवा? याला जोडूनच हा ही प्रश्न की 'उद्याची महिला' ते कशी पाहतात?

या प्रश्नाचे उत्तर आपल्याला त्यांच्या अनुक्रमणिकेवर नजर टाकल्याबरोबर मिळते. अनुक्रमणिकेच्या पानावर साधारणपणे 'आयुर्वेदिक प्रसाधनांमध्ये सावधगिरी बाळगा', 'सौंदर्याच्या सर्वसाधारण समस्या', 'टॅटिंग लेस ने भरलेली नाइटी'. 'मुलांच्या पुलओव्हरवर उंट विणा', 'या वर्षी थंडीत काहीतरी नवीन', 'उन्हाळ्यासाठी 15 थंडगार सरबते' अशाच प्रकारचे लेख दिसतात. या व्यतिरिक्त स्त्रियांच्याच नियतकालिकांमध्ये राशी-भविष्य, सिनेमा, बाजारातील नवीन सामान इ. गोष्टी असतात. तर कधी कधी चक्क स्त्रियांचीच चेष्टा करणारे विनोदही असतात. सर्व महिला नियतकालिकांमध्ये सर्वसाधारणपणे हाच मजकूर असतो जो सतत वेगवेगळ्या पद्धतीने सांगितला जातो. याव्यतिरिक्त या नियतकालिकांमध्ये क्रीम, लिपस्टीक, पर्सेस, दागिने पासून ते वॉशिंग मशीन पर्यंतच्या उपभोग्य वस्तूंच्या प्रचंड जाहिराती असतात.

खरेतर अत्यंत स्पष्टपणे ह्या मूलगामी, रूढीवादी नियतकालिकांना स्त्रियांच्या प्रस्थापित सामाजिक चौकटीला तोडण्याची इच्छाच नाहीये. ती शिकवतात की पती हेच जीवन आहे, पती हाच मोक्ष आहे, त्याला प्राप्त करण्याची दोन साधने आहेत — स्वयंपाकघर आणि शरीर. अर्धावेळ स्वयंपाकघरात स्वादिष्ट पदार्थ आणि पकवान्न करण्यात घालवा आणि उरलेला वेळ दागिने अणि क्रीमबरोबर घालवा, कारण तेच तर तुमच्या व्यक्तिमत्वाचे उद्दिष्ट आहे. हे फक्त तुमच्यासाठीच चांगले आहे असे नाही तर बाजारपेठेसाठीही चांगले आहे — म्हणजेच सौंदर्यप्रसाधने / फॅशन / कपडे

उद्योगांच्या कंपन्या ज्या ह्या नियतकालिकांच्या प्रायोजक आहेत.

महिलांसाठी असलेल्या ह्या वैशिष्ट्यपूर्ण मासिकांमध्ये 'आधुनिक' स्त्री आता बादली, टब आणि धोपाटण्या ऐवजी वॉशिंग मशीनमध्ये कपडे धूते. पोलपाट-लाटणे, तवा, चिमटा यांची सुट्टी करून रोटीमेकर वापरून पोळ्या करते, पाट्या-वरवंट्यावर वाटण्याऐवजी मिक्सरवर वाटते आणि व्हॅक्यूम क्लीनरने फरशी स्वच्छ करते. यामुळे तिच्या भूमिकेत आणि दर्जात काहीच बदल झाला नाही ना? झाले इतकेच की आता नवीन उपकरणांनी सज्ज स्त्री अधिक चटपटीतपणे आणि चाणाक्षपणे काम करू लागली. तिच्या पूर्वीचीच्याच घर-कामांमधून वाचलेल्या वेळात ती सजावट करणे, रसदार सरबते बनवणे, नाश्ता केल्यानंतर रात्रीच्या जेवणासाठी नवीन पदार्थ तयार करणे, सकाळी रोज नवीन नवीन पदार्थ डब्यासाठी तयार करणे, घर आवरणे, स्वतःला टापटीप ठेवणे आणि त्याचबरोबर वेळेला अनुरूप कपडे आणि मग त्या कपडयांना अनुरूप दागिने आणि मेकअप करू शकते म्हणजे मग ती पार्टीमध्ये *'सेंट्रल फिगर'* बनू शकते.

ह्या नियतकालिकांना जर केवळ गृहिणींच्याच गोष्टी दाखवायच्या असतील, तर त्यामध्ये डोंगरदऱ्यांमध्ये राहणाऱ्या त्या लढाऊ स्त्रियांबाबत काहीच का येत नाही ज्या डोंगराळ प्रदेशातील जीवनाची धुरा वाहत आहेत. स्वयंपाक करणे, लाकूडफाटा आणणे, कमावणे, पाणी भरणे, शिवणकाम करणे आणि मुलांना सांभाळणे या व्यतिरिक्त शेतात काम करणे अशी खूप कामे त्या करत आहेत. वाळवंटातील त्या स्त्रियांबद्दल ज्या तप्त वातावरणात घरच्यांची तहान भागवण्यासाठी वर्षानुवर्षे दूर दूर जाऊन पाणी भरत आहेत त्यांचा उल्लेखही का येत नाही? का येत नाही त्या स्त्रियांबद्दल ज्या आपल्या दमदार खांद्यावर विटांचा महाल उभा करत आहेत? त्यांच्या मेहनतीचे चित्र या नियतकालिकांमध्ये का येत नाही? त्यासुद्धा मजुरीची कामे करूनही घराकडे आणि मुलांकडे पाहतात. अशा स्त्रियांच्या गोष्टी देण्यासाठी ह्या नियतकालिकांच्या चकचकीत पानांवर जागा नसते का? की त्यांच्या दृष्टीने या महिला नाहीतच? ह्या प्रश्नाचे उत्तर अगदी साधे आहे. त्यांच्यामध्ये तथाकथित स्त्रीत्व नाही. अशा प्रकारच्या स्त्रिया नियतकालिकांना अपेक्षित असलेल्या नाजूक व कोमल स्त्रिया नसतात. पितृसत्ताक समाजव्यवस्थेला मान्य असलेल्या पारंपरिक स्त्रीचीच प्रतिमा ही नियतकालिके समाजापुढे ठेवू इच्छितात.

स्त्रियांच्या म्हटल्या जाणाऱ्या या तथाकथित नियतकालिकांमध्ये एक महत्त्वपूर्ण विषय असतो — सौंदर्य आणि आरोग्य. बऱ्याच पत्रिकांमध्ये तर आरोग्य आणि सौंदर्यसंबंधी समस्या एकाच कॉलममध्ये छापल्या जातात, जणूकाही आरोग्य आणि

सौंदर्य ही एकच गोष्ट आहे. सौंदर्याबद्दल टिपा देण्याव्यतिरिक्त आरोग्याच्या बाबतीत पौष्टिक आहार किंवा कुपोषणाची जी काही चर्चा होते तीही बहुदा गर्भवती महिलांसाठी आरोग्यदायी आहार या संदर्भात असते. जणुकाही ती गर्भवती नसताना तिला पोषक आहाराची गरज नाही. एक स्त्री म्हणून आरोग्य, चांगले अन्न हा जणू तिचा अधिकारच नाही, तिची गरजच नाही. नाहीतरी स्त्री एक गुलामच असते; तिचे पालन पोषण पण यासाठीच झाले पाहिजे की ती एका बाळाला जन्म देवू शकली पाहिजे, आणि तोही मुलगाच.

आपण हा विचार कधी केला आहे का की दुल्हन विशेषांक, सौंदर्य विशेषांक, मातृत्व विशेषांक असे अंक छापणारी ही नियतकालिके त्यांच्या नियतकालिकाची किती पाने किंवा किती अंक स्त्रियांचे करियर, त्यांचे स्वावलंबन ह्याला देतात? जगभरात सगळ्यात जास्त मेहनत स्त्रिया करतात, आणि जगभरात कुटुंबाला आर्थिक आधारही स्त्रियाच देतात हे सत्य मांडायला हे का घाबरत आहेत? आणि तरीही स्त्रियांना सर्वत्र दुय्यम स्थानावर ठेवण्यात आले आहे. या सर्व विषयांवर ही नियतकालिके चर्चा करताना आपण कधी पाहिली आहेत का?

जर कधी या नियतकालिकांमध्ये स्त्रियांच्या करियरच्या संदर्भात माहिती दिलीच तर त्यात स्त्रियांच्या विद्वत्तेनुसार किंवा योग्यतेनुसार माहिती देत नाहीत तर सुंदर आणि तरतरीत स्त्रियांची आवश्यकता असलेल्या, एयरहोस्टेस, रिसेप्शनिस्ट, मॉडेलिंग सारख्या नोकऱ्यांबद्दल माहिती देतात. म्हणजेच हा जो तथाकथित करिअर गाइडन्स मिळतो, तो ही समाजातील स्त्रीची पारंपरिक प्रतिमा आणि भूमिका मजबूत करणाराच असतो. जर कधी चुकून माकून जीवनाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या महिलांना ह्या नियतकालिकांमध्ये स्थान मिळाले तरी त्यांचे संघर्ष, त्यांची जीवनमूल्ये, त्यांचे विचार, यांना मुळीच महत्त्व दिले जात नाही. उदा. एखाद्या राजकीय महिलेला राजकारणातील प्रश्न विचारण्याऐवजी, संगीतज्ञ महिलेला संगीतातील प्रश्न विचारण्याऐवजी, लेखिकेला साहित्यातील प्रश्न विचारण्याऐवजी त्यांना असे प्रश्न विचारले जातात की ज्यामधून त्यांची 'गृहिणी'ची प्रतिमाच पुढे येईल: जसे उदाहरणच द्यायचे झाले तर असे विचारले जाते की तुम्ही दोन्ही क्षेत्रं कशी सांभाळत आहात? तुम्ही तुमच्या पतीला स्वतःच्या हाताने जेवण बनवून देता का? स्वयंपाकघर कोण सांभाळते? जेवणामध्ये काय-काय पसंत आहे? कपडे कुठले आवडतात? मुलांना आईची कमी तर जाणवत नाही? वगैरे वगैरे. अशा स्त्रियांना एक प्रश्न हमखास विचारला जातो की जर कधी घर आणि कारकिर्द यामध्ये निवड करायची वेळ आली तर तुम्ही काय निवडाल? आणि उत्तर तर परिचित आहे,

म्हणजेच निष्कर्ष ठरवूनच चर्चेची सुरुवात. आम्ही हा मुद्दा मांडायचा प्रयत्न करतोय की, ही नियतकालिके प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जरी एखादी महिला कमावती असेल, ती तिच्या कारकिर्दीत कितीही यशस्वी झालेली असेल तरी स्त्रियांच्या आयुष्यामध्ये घराचे महत्त्व किंवा त्याचे स्थान किती उच्च आहे हेच सिद्ध करण्याचा जीवतोड प्रयत्न करताना दिसतात.

स्त्रियांकडे पाहण्याच्या समाजाच्या दृष्टीकोनाला आव्हान देणाऱ्या पुरोगामी महिलांसाठी जे चिंतेचे मुद्दे आहेत, त्यावर ही नियतकालिके एकही लेख छापत नाहीत. स्त्रियांना आसपासच्या जगातील आयुष्यात रस निर्माण होईल यासाठी उत्तेजित करणे, कसेबसे जीवन जगणाऱ्या स्त्रियांना आयुष्य परिपूर्णपणे जगण्याची हिंमत देणे, सामाजिक–आर्थिक–सांस्कृतिक समस्यांचे विश्लेषण करून त्यावर उपाय शोधणे ह्याबद्दल एक चकार शब्दही न काढता त्यांना निष्क्रिय आणि उदासिन बनवण्याकडे ह्या नियतकालिकांचा कल असतो. स्त्रियांमधील वैज्ञानिक जाणीवा वाढवण्याऐवजी; त्यांना अधिकाधिक दैववादी बनवत आहेत. ही नियतकालिके आताच्या परिस्थितीबद्दल स्त्रियांमध्ये चीड निर्माण करत नाहीत, उलट ती थंड करण्याचा प्रयत्न करतात.

ह्या मुद्यावर त्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष करण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पुरुषांच्या कुटुंबातील आणि समाजातील पारंपरिक श्रेष्ठ दर्जावर आणि अधिकारांवर प्रश्न उभे राहू शकतात. परिणामी महिला त्यांच्या सध्याच्या दुय्यमत्वाला आव्हान देऊ शकतात. असे झाले तर स्त्रिया स्वावलंबी होतील व त्यांच्यात विश्वास निर्माण होईल आणि समाजातल्या सुंदरतेच्या कल्पनेलाही त्या आव्हान देतील. मग सौंदर्यप्रसाधने बनवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची सौंदर्य प्रसाधने, कपडे, फॅशन, इ. उत्पादनांच्या विक्रीचे काय होईल? ह्या कंपन्यांसाठी (आणि पर्यायाने ते प्रायोजित करत असलेल्या नियतकालिकांसाठी) पावडर, लिपस्टिक, क्रिम ह्यांच्या विक्रीचे काय? स्त्रियांची अस्मिता काही बाजारापेठेपेक्षा मोठी नाही. त्यामुळे स्त्रियांची नियतकालिके आणि त्यांच्या पुरस्कर्त्या कंपन्यांना स्त्रियांची हजारो वर्षांपूर्वीची चौकट नुसती तशीच ठेवायची नाही तर त्यावर चाणाक्षपणे मुलामा चढवायचा आहे.

अगदी अलीकडे एका प्रमुख इंग्रजी नियतकालिकासोबत 34 पानांची पुरवणी फुकट दिली होती ज्यामध्ये फक्त वेगवेगळ्या वस्तूंच्या जाहिराती होत्या. गंमत म्हणजे *रेनेसॉ वीमेन* (जागृत महिला) असे नाव असलेल्या पुरवणीमध्ये वॉशिंग मशीन, फ्रीज, भिंतींसाठी नवीन पेंटस, हेअर रिमूव्हरबद्दल काही गोष्टी होत्या आणि आणखी आश्चर्याची गोष्ट म्हणजे 162 पानांच्या या पत्रिकेमध्ये 44 पाने जाहिरातींची,

14 पाने वेगवेगळ्या ड्रेसच्या डिझाईन्सची, 3 पाने विश्वसुंदरीच्या भारत आगमनाच्या पार्टीची आणि 3–4 पाने पुरुषांच्या स्टाईल्स बद्दल होती. अर्थात ह्या गोष्टी सतत दाखवून, नियतकालिकांमधून आणि दूरदर्शनवरून सतत ह्या जाहिरातींचा भडिमार करून प्रथम आपल्या गरजा निर्माण केल्या जातात आणि त्यानंतर या वस्तू आपल्या समोर प्रस्तूत करतात. आता फक्त उठा आणि मॉलमध्ये जाऊन उभे रहा.

बाकी समस्या किंवा असे म्हणूया की ज्या समस्या समाजातून निर्माण झालेल्या आहेत किंवा पुरुषसत्ताक मानसिकतेतून निर्माण झालेल्या आहेत त्याचे काय? उदा. हुंडाबळी, बलात्कार, छेडछाड, कौटुंबिक हिंसा, दुहेरी भूमिका बजावणे इ. याबद्दल बोलणे कटाक्षाने टाळले जाते. या समस्यांमुळे प्रभावित होणारा गट तर महिलांचाच आहे. प्रत्येक दिवस एका दहशतीमध्ये जगणाऱ्या, आयुष्यभर एका दुर्घटनेच्या भितीमध्ये राहणाऱ्या, कसेबसे जीवन जगणाऱ्या स्त्रियांना आयुष्य परिपूर्णपणे जगण्याची हिंमत देण्यासाठी ही महिलांची नियतकालिके पुढाकार का घेत नाहीत? जर बलात्कार किंवा छेडछाडीवर काही छापले गेलेच तर त्या लेखांमध्ये स्त्रियांना बचावाचे (सामना न करण्याचे) उपाय सुचवले जातात ज्यामुळे खरेतर त्यांच्या मनात अजूनच भीती निर्माण होईल. त्याचप्रमाणे, ही नियतकालिके दुहेरी जबाबदारी (घर आणि ऑफिस) सांभाळणाऱ्या कष्टकरी स्त्रियांच्या समस्यांवर चर्चाही करत नाहीत आणि विश्लेषणही करत नाहीत. ह्या प्रश्नावर महिलांमध्ये चर्चा व्हावी ह्यात त्यांना काहीही स्वारस्य नाही.

आता बघूया नियतकालिकांमध्ये साहित्याच्या नावावर छापल्या जाणाऱ्या टुकार कथांबद्दल. ह्यातील लेखांमध्ये समाजामध्ये नेतृत्व करणाऱ्या स्त्रिया, कठीण परिस्थितीत आत्मविश्वासाने निर्णय घेणाऱ्या स्त्रिया, एकट्याने मुलांना वाढविणाऱ्या स्त्रिया असे विषय कधीच नसतात. या कथांमधील महिला नेहमीच आजच्या पितृसत्ताक समाजाने घालून दिलेल्या चौकटीतीलच असते. विषयही ठरावीक असतात — जसे पती–पत्नीचे संबंध, पती, पत्नी और वो, सासवा–सुनांची भांडणे वगैरे. कथांचे विषयही तेच ते, घासून गुळगुळीत झालेले — पतीचे विवाहपूर्व किंवा विवाहानंतरचे प्रेमसंबंध ज्यामध्ये पत्नी त्याग आणि ममतेची मूर्ती असते. त्यात नालायक पतीचे बूट ती जागेवर नेऊन ठेवते, त्याच्या आवडीचा स्वंयपाक करते आणि रात्र रात्र त्याची वाट पाहत घालवते. मग तिच्या तपस्येवर प्रसन्न होऊन कधीतरी पती घरी परत येतो. गोष्टींचा एक प्रकार असाही असतो की पती–पत्नीचे भांडण किंवा काही गंभीर समस्यांमुळे पत्नी जी शिकलेली असते, माहेरी जाते, भावजयीच्या शिव्या खाते, वडिलांचा अपमान झेलते, पण स्वावलंबी होण्यासाठी

प्रयत्न करत नाही आणि मग शेवटी कोणी समजूतदार मैत्रीण किंवा समजूतदार कामवाली हे बोलून तिचे डोळे उघडते की ‘आपला पुरुष आपला असतो, कितीही मारले तरी प्रेम पण करतो’.

याचाच अर्थ साहित्य पण आपल्या विचारांमधून हेच सिद्ध करते की बायकांचे जग हे पतीच्या घरापुरते आणि त्यातही स्वयंपाकघरापुरते मर्यादित आहे. स्त्रियांनी लिपस्टीक, काजळ, आयलायनर, डिजायनर दागिने, कपडे या व्यतिरिक्त काही विचारच करायची गरज नाही; त्यांनी सामाजिक आणि राजकीय समस्यांवर चिंता करायचे कारण नाही ही नियतकालिके अत्यंत कुशलतेने आणि गोड पद्धतीने ‘महिलांची गुलामी’ आणि ‘गुलाम महिलांची’ स्तुती करत आहेत. गुलामी स्वयंपाकघराची, गुलामी सौंदर्याची.

ही नियतकालिके वाचणाऱ्या पुरुषांची संख्या स्त्रियांएवढीच आहे हे ही विचारात घेतले पाहिजे. स्त्रियांचे जीवन फक्त त्यांची मुले आणि त्यांचे घर-कुटुंब यांच्यासाठीच असले पाहिजे ह्या पुरुषांच्या डोक्यातील विचारांना ही नियतकालिके अजूनच पुष्टी देतात.

खरेतर आपल्याला अशा नियतकालिकांची काही गरज नाही. आजच्या स्त्रीसाठी ही पुराणपंथी मासिके कचराच आहेत. आपल्याला जगाशी जोडून घेणारे, सामाजिक परिस्थिती आणि वास्तव समजावणारे, आपल्या जगण्याच्या दुर्दम्य इच्छेला रेखांकित करणारे साहित्य हवे आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये जगत असूनही स्त्रियांमधील चैतन्य वाखाणण्याजोगे आहे. त्या आपल्या हक्कांसाठी लढत आहेत, जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये संघर्ष करत आहेत. या स्त्रियांबद्दल सगळ्यांना सांगण्याची गरज आहे की त्या का लढत आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, सर्वप्रथम गरज आहे हे समजून घेण्याची की स्त्री होण्याआधी आपण एक माणूस आहोत अणि आम्हाला आमच्या न्यायासाठी व समान हक्कांसाठी लढा देऊन ते प्राप्त करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या साहित्याची आवश्यकता आहे.

■■





# प्रसारमाध्यमांमधील स्त्रियांची प्रतिमा

प्रसारमाध्यमांना — म्हणजे सिनेमा, टेलीव्हिजन, वृत्तपत्रे, नियतकालिके, इ. — समाजाचा आरसा समजले जाते. म्हणजेच असे समजले जाते की समाजात जे घडतंय त्याची जशीच्या तशी तसबीर मीडिया लोकांसमोर आणते. आजचे सगळ्यात प्रभावी माध्यम आहे टेलीव्हिजन, कारण एकतर हे दृक्-श्राव्य माध्यम आहे आणि घराघरापर्यंत पोहोचले आहे. चला तर मग आपण ह्या आरशात स्त्रियांचे प्रतिबिंब पाहूया.

या लेखामध्ये आपण वारंवार टेलीव्हिजनवर दाखवल्या जाणाऱ्या मुख्यत्वे तीन प्रतिमांबद्दल चर्चा करूया: पहिली — मॉडेल असलेल्या कार्यक्रमांमध्ये *'कॅटवॉक'* करणाऱ्या मॉडेलची किंवा ऐश्वर्या राय आणि प्रियांका चोपडा यांच्या सौंदर्याचे रहस्य सांगणाऱ्या सुंदऱ्यांची; दुसरी — दोन्ही खांद्यांवरून पदर लपेटून घेणाऱ्या किंवा डोक्यावरून पदर घेणाऱ्या पतिव्रता स्त्रीची किंवा कुटुंबाला सुखी ठेवण्यासाठी स्वतःच्या स्वप्नांना तिलांजली देणाऱ्या, आदर्श पत्नीची, पतीच्या अनुपस्थितीत त्याच्या व्यवसायातील सर्व व्यवहार कुशलतेने पाहणाऱ्या पतिव्रता स्त्रीची; आणि तिसरी — स्वतःच्या अस्तित्वासाठी, स्वावलंबनासाठी नोकरी करणाऱ्या, पण घराच्या सुखासाठी किंवा लग्नात अडथळा येत असेल तर कितीही मोठ्या पदावर असली तरी कुठल्याही क्षणी नोकरी सोडून द्यायला तयार असणाऱ्या आदर्श पत्नीची.

पहिली प्रतिमा आहे कुठले तरी उत्पादन विकणारी किंवा कॅटवॉक करत येणाऱ्या मॉडेलची, जिच्याकडे बघितल्याबरोबर ती मुळी आपल्या समाजातील मुलगी आहे असे वाटतच नाही. मॉडेल असल्यामुळे जरी ती सतत घराच्या बाहेर

असली, रात्री उशीरापर्यंत पार्ट्या करत असली तरी ती सुरक्षित असते कारण तिच्याभोवती सुरक्षारक्षकांचे संरक्षण असते. सामान्य स्त्रियांना भेडसावणाऱ्या छेडछाड, बलात्कार वगैरे कुठल्याही समस्या तिला भेडसावत नाहीत. स्वतःला अधिक सुंदर कसे बनवायचे ही तिची खरी समस्या आहे. तिच्या समस्येत आणि आपल्या समस्येत कुठलेच साम्य नाही. जणू काही ती दुसऱ्याच कुठल्यातरी दुनियेतून आली आहे. म्हणूनच ही आपली प्रतिमा होऊच शकत नाही. मात्र अशा सडपातळ आणि सुंदर दिसणाऱ्या, आकर्षक पेहरावातल्या मॉडेल्स टेलीव्हिजनवर सतत पाहून सडपातळ, सुंदर आणि आकर्षक शरीर ठेवणे हीच आदर्श स्त्रीची प्रतिमा समाजात तयार करण्यात त्यामुळे मदत झाली आहे. ह्याने स्त्रियांना आणि विशेषतः मुलींना स्वतःचे शरीर आणि बाह्य सौंदर्याचे वेड लावण्याची महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

दुसरी प्रतिमा आहे हजारो वर्षांपूर्वीची, पण तिला आज खूपच रंग भरून दाखवले जात आहे. ती आहे एका पतिव्रता स्त्रीची. विश्वासू पत्नी, आज्ञाधारक सून, त्यागमयी आईची ही प्रतिमा धार्मिक–कौटुंबिक धारावाहिकांच्या माध्यमातून दाखवली जाते. ह्या स्त्रियांसाठी कुटुंब हेच सर्वकाही असते, आणि आपल्या सर्व गरजांसाठी त्या घरातील पुरुषांच्या तोंडाकडे पाहतात. बहुतांशी महिला दर्शक स्वतःला ह्या दुसऱ्या प्रतिमेशी जोडून घेतात कारण ती त्यांच्या जीवनाशी मिळती जुळती वाटते. ह्या प्रतिमेचा उदोउदो करण्याचा उद्देशच हा आहे की ती प्रतिगामी वृत्ती मजबूत करते. स्त्रियांना आहे त्याच परिस्थितीत राहण्याची प्रेरणा देते. दुसरीकडे वस्तुस्थिती ही आहे की स्त्रिया भलेही स्वतःला घराच्या चार भिंतीत कोंडून घेत असतील पण स्वतःच्या आणि समाजाच्या विकासासाठी स्त्रिया मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडून शिक्षण आणि नोकरी करू लागल्या आहेत; त्यांना पारंपरिक जीवन जगायच नाहीये; त्या आपल्या अस्मितेसाठी आणि अस्तित्वासाठी आता सजग आहेत आणि पारंपरिक समाजाने त्यांना ज्या मर्यादांमध्ये बांधून ठेवले आहे त्या सीमा ओलांडून बाहेर पडण्याची त्या खटपट करत आहेत. आणि मीडिया मात्र परत एकदा त्यांना घराच्या चार भिंतीत कोंडून घालण्याचा प्रयत्न करत आहे.

तिसरी प्रतिमा आहे ‘नोकरी करणाऱ्या आधुनिक स्त्री’ची. ही प्रतिमा पाहायला फारच मोहक आहे. तिला पाहिल्यावर वाटते की जगातील सर्व स्त्रिया शिकल्या सवरलेल्या आणि स्वावलंबी आहेत. सिरियलमधून ह्या स्त्रियांना एवढे कार्यक्षम दाखवले जाते की त्या जराही न थकता, कसलीही चिडचिड किंवा राग न येऊ देता ऑफिस आणि घर दोन्ही अत्यंत सफाईने सांभाळतात. त्यांचे हे चित्र पाहून खरेतर आश्चर्यच वाटते की कोणताही माणूस एवढा कार्यक्षम कसा काय असू शकतो.

त्याचबरोबर त्यांना अत्यंत त्यागी दाखवले जाते; त्यांच्यासाठी त्यांचे घर हे प्राधान्य आहे, आणि गरज पडेल तेव्हा मागेपुढे न पाहता कुटुंबासाठी नोकरीवर लाथ मारण्यास त्या कायम तयार असतात. ह्या प्रतिमेतून कुठे ना कुठेतरी त्यांना हे स्पष्ट जाणवून द्यायचे आहे की स्त्रिया कितीही शिकल्या, उच्चपदावर गेल्या तरी घरच्या जबाबदाऱ्या हे त्यांचे प्रथम प्राधान्य असेल. विज्ञान-तंत्रज्ञानाची झेप कुठेही पोहचू दे, घरकामाची जबाबदारी तिचीच. ती आणि तिचा पती दोघेही ऑफिसमधून एकाच वेळी घरी परतले तरी घरी आलेल्या पाहुण्यांचे चहापाणी करणे, कुटुंबासाठी जेवण बनवणे आणि हसतमुखाने त्यांना जेवायला वाढणे, मुलांना झोपवणे इत्यादीची जबाबदारी तिचीच. तिच्याजवळ खरेदी करण्याची क्षमता असेल तर ती पाट्या-वरवंट्यावर वाटण्याऐवजी मिक्सरवर वाटेल, हाताने कपडे धुण्याऐवजी वॉशिंग मशीन मधून धुवून काढेल आणि घराची साफसफाई व्हॅक्यूम क्लीनर ने करेल. परंतु कामाची मूळ जबाबदारी तिचीच.

टी.व्ही. वर दाखवल्या जाणाऱ्या या प्रतिमेतील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहेत, स्वावलंबी आहेत, पण मानसिकदृष्ट्या त्या आपल्या पिता, पुत्र, पती ह्यांच्यावरच अवलंबून आहेत. ह्या स्त्रिया पुरुषप्रधानतेच्या साखळ्या तोडण्याचा प्रयत्न तर करतात, पण अखेरीस तडजोड करतात, आणि सगळ्यात वाईट हे की त्या स्वखुशीने तडजोड करताना दाखवतात. त्यांच्या तडजोडीची कहाणी इतक्या खुबीने दाखवली जाते की स्त्रिया निसर्गतःच अशा आहेत असे वाटेल. ही प्रतिमा स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी अधिकच हानिकारक आहे, कारण आपल्यावर जेव्हा अशी परिस्थिती येईल तेव्हा आपणही कुटुंबासाठी आपली स्वप्न आणि कारकीर्द आनंदाने सोडून द्यायला तयार असले पाहिजे हे मूल्य रुजवते.

ह्या तीनही प्रतिमांचा खोलात जाऊन विचार केला तर लक्षात येईल की ह्या तीनही प्रतिमा स्त्री विरोधी आणि पुरुषप्रधान मानसिकतेला पोषकच आहेत. पहिली प्रतिमा स्त्रीला शरीर किंवा वस्तू म्हणून दाखवते, दुसरी पुरुषाच्या गुलामीच्या रूपात तर तिसरी कुटुंबासाठी कुठल्याही तडजोडी कधीही करायला तयार असणारी.

ह्या तीनही प्रतिमा स्त्रियांची छळवणूक, पिळवणूक दाखवणाऱ्या प्रतिमा आहेत. आपल्याला ह्या फसव्या भूमिका तोडून आपली स्वतःची एक नवी प्रतिमा तयार करायला लागेल. अशी प्रतिमा ज्यात स्त्री ह्या सडलेल्या, मागासलेल्या समाजाच्या मूल्यांबरोबर संघर्ष करत असेल आणि तिच्या चेहेऱ्यावर केलेल्या संघर्षाचे तेज असेल — त्या संघर्षाचे तेज ज्यामुळे तिने अनेक हक्क आणि अधिकार मिळवले आहेत, आणि भविष्यात आणखी यश मिळेल याची खात्री आहे. तीच तिची खरी प्रतिमा असेल.

■ ■

8



# स्वावलंबनाची गरज

स्वावलंबी असण्याबद्दल मुली काय विचार करतात, यासंबंधी त्या किती सजग आहेत आणि त्यांच्या स्वावलंबी होण्यामध्ये काय समस्या आहेत, हे समजून घेण्यासाठी काही महाविद्यालयीन विद्यार्थिनींशी आम्ही चर्चा केली. त्या चर्चेमधून हे समजले की, स्वावलंबी असण्याची इच्छा जवळजवळ सर्वच मुलींची आहे पण त्यासाठी त्या खूप प्रयत्नशील आहेत असे नाही. चांगली नोकरी मिळाल्यास ती करण्याची इच्छा सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त मुलींनी दर्शवली. परंतु नवऱ्याने विरोध केला तर काय कराल? ह्या प्रश्नावर त्यांचे उत्तर आले की नोकरी सोडून देऊ. कुठल्याही परिस्थितीत स्वावलंबी होणारच हे सांगणाऱ्या फक्त 5 टक्केच मुली होत्या ज्या म्हणाल्या की स्वावलंबनासाठी सर्व प्रयत्न करू. नवऱ्याला आणि कुटुंबाला समजावून सांगू, गरज पडल्यास थोडा संघर्षही करू. पण त्या पुढे हे ही म्हणाल्या की नाती तुटण्यापर्यंत परिस्थिती आली तर माघार घेऊ. या सर्वेक्षणातून असे लक्षात आले की, बहुसंख्य मुली स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा विचार जरूर करतात पण त्यांना स्वातंत्र्याचा खरा अर्थ आणि स्वावलंबनाचे खरे महत्त्व समजलेले नाही.

या सर्वेक्षणातून आणखी एक महत्त्वाची गोष्ट समोर आली ती म्हणजे सर्व मुली

असे मानतात की कुटुंब आणि समाज हे त्यांच्या स्वावलंबी होण्यामधील सर्वात मोठा अडसर आहेत.

भारत झपाट्याने एक आधुनिक विकसित समाज बनतोय असा दावा जरी आपण करत असलो तरी स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दलच्या सामाजिक दृष्टीकोनामध्ये फारसा फरक झालेला नाही हे एक कठोर वास्तव आहे. काही ठिकाणी काही बदल झालेले असले तरी ते अत्यंत वरवरचे आहेत आणि त्यातही मोठ्या शहरांमध्ये थोडाफार बदल झालेला जाणवतो पण ग्रामीण भागात आणि छोट्या शहरांमध्ये आजही शेकडो वर्षांपासूनचे बुरसटलेले विचार चालत आले आहेत. स्त्री स्वातंत्र्याला लायक नाही, तिला प्रथम वडिलांवर, मग पतीवर आणि म्हातारपणी मुलावर अवलंबून राहिले पाहिजे, वेदात सांगितलेला हा दृष्टीकोन आजही प्रबळ आहे. याच प्रचलित मानसिकतेमुळे समाजात स्त्रियांना भेदभावाची वागणूक मिळते. त्यांच्यावर अबला, निराधार असल्याचा शिक्कामोर्तब केले जाते. याच कारणांमुळे कधी स्त्रियांना सुरक्षेच्या नावाखाली चार भिंतीत डांबून ठेवले जाते; एकटे बाहेर जाऊ दिले जात नाही; अबला म्हणून घाबरवले जाते; तर कधी नाजूक म्हणून सांभाळले जाते; त्यांना हे ही सांगितले जाते की त्या त्यांच्या स्वातंत्र्यावर ठाम राहिल्या तर कुटुंब व मुले उद्ध्वस्त होतील.

समाजातल्या फैलावलेल्या या विचारांबरोबरच मुली मोठ्या होत असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्वावलंबनाची जाणीवच निर्माण होत नाही. मुलीच्या आयुष्याच्या उद्देशाबद्दल आईवडिलांचा विचारही लग्नापुरताच मर्यादित असतो. हा दृष्टीकोन समाजामध्ये इतका दृढ झाला आहे की, त्याविरुद्ध बोलणेसुद्धा मुलींना अवघड जाते. वर्षानुवर्षे समाजाने बनवलेल्या ह्या प्रभावी मूल्यांनुसारच त्या स्वतःला घडवत जातात आणि त्यांनासुद्धा लग्न हीच आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता आहे आणि पतीची आणि सासरच्या लोकांची सेवा करण्यामध्ये आयुष्याचे सार्थक आहे असे वाटू लागते.

याच कारणांमुळे स्त्री स्वतःला दुबळी आणि कमजोर समजू लागते. तिचा आत्मविश्वास कमी होतो. बाहेरच्या जगातील धावपळ आणि आव्हानांना घाबरून घराबाहेर पडायला तिला भीती वाटू लागते. तिचा स्वाभिमान नाहिसा होतो. नवऱ्याने आणि सासरच्यांनी केलेले सर्व अपमान ती सहन करते. घरातल्या सर्वांनी पोटभर खाऊन जे उरेल ते अन्न पोटात घालणे यालाच ती आपले जगणे समजू लागते.

काही लोक स्त्रियांच्या स्वावलंबी असण्याला विरोध करत नाहीत, पण त्यांचा दृष्टीकोन संकुचित आहे. त्यांच्यासाठी स्त्रियांच्या स्वावलंबनाचा अर्थ तिने घराबाहेर

जाऊन काम करणे म्हणजे केवळ पैसे कमावणे एवढेच ते मानतात, खरोखरीच स्वावलंबी होणे नव्हे. तिच्या मिळकतीवर नवऱ्याचे नियंत्रण असते, तो ठरवतो की पैसे कुठे आणि कसे खर्च करायचे. घरकामाची पूर्ण जबाबदारी स्त्रीवरच राहते, आणि घर चालवण्याची मुख्य जबाबदारी पुरुषाची राहते. नवरा भरपूर कमावत असल्यामुळे तिच्या कमाईची कुटुंबाला आता गरज नाही असे सांगून, तर कधी कामासाठी ती बाहेर देत असलेल्या वेळेच्या प्रमाणात तिची मिळकत अल्प आहे असे सांगून, किंवा कधी त्यांना वाटते की आता तिची नोकरी पुरे, तिने घरी बसावे व घरसंसार सांभाळावा अशी विविध कारणे देऊन तिच्या नवऱ्याला आणि सासरच्या लोकांना तिला नोकरी सोड म्हणून सांगण्याचा पूर्ण अधिकार असतो.

## आर्थिक स्वातंत्र्याचे महत्त्व

स्त्रीला जर आत्मनिर्भर व स्वतंत्र व्हायचे असेल तर त्याची पहिली पायरी आर्थिक स्वावलंबन आहे. हे पहिले पाऊल उचलणे — घराबाहेर पडून छोटीशी का असेना नोकरी करणे — हीच तिच्यासाठी एक मोठी झेप आहे. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वामध्ये निर्णायक बदल होतात. कमावत असल्यामुळे आता ती स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकते. आपल्या कामाच्या ठिकाणी अनेक लोकांना भेटते, त्यांच्याशी बोलते, त्यातून तिला जगाकडे पाहण्याची आणि जग कसे चालते ते समजून घेण्याची दृष्टी मिळते. तिला काही मित्रमैत्रिणी मिळतात, काही तिचे हितचिंतक बनतात जे तिच्या सुख-दुःखांमध्येही सहभागी होतात. त्यातून तिचे एक सामाजिक वर्तुळ बनते आणि सामाजिक संबंधही वाढतात. सामाजिक उत्पादनात तिची भूमिका निश्चित होते आणि ती योगदानही देते.

एकदा घराबाहेर पडून नोकरी करायचे ठरवले की बाहेरच्या जगातील आव्हानांना तोंड द्यायला आपोआपच ती मानसिकरित्या तयार होते. आणि एकदा घराबाहेर पडली की बाहेरच्या जगातील आव्हाने धीटपणे पेलण्याची क्षमता तिच्यामध्ये निर्माण होते. तिची ही मानसिक तयारीच तिचा आत्मविश्वास वाढवते. त्यामुळेच ती रस्त्यात होणारी छेडछाड किंवा गैरवर्तन यावर आवाज उठवते, त्यातून स्वतःला योग्यप्रकारे वाचवणे आणि प्रसंगी त्यासाठी संघर्ष करणे यासारख्या गोष्टी शिकते.

हळूहळू एक माणूस म्हणून आणि समाजाचा जबाबदार घटक म्हणून स्त्रीला स्वतःची ओळख समजू लागते. नवनवीन माहिती जाणून घेण्याची तिच्यात जिज्ञासा वाढायला लागते. वर्तमानपत्रे वाचणे, मासिके वाचणे, टेलिव्हिजनवरील बातम्या

ऐकणे ह्यामध्ये तिची रुची निर्माण होते कारण रोज बदलणारी धोरणे किंवा राजकीय घटनांबद्दल माहिती घेणे हे आता तिच्या जीवनाशी प्रत्यक्ष जोडले जाते. ह्या उलट गृहिणीला ते थेट प्रभावित करत नसल्यामुळे याची फार आवश्यकता नसते. त्यामुळे वृत्तपत्रे व नियतकालिके वाचण्यामध्ये गृहिणीला फारसा रस नसतो, मासिके वाचली तरी स्त्रियांची मासिके ती उत्सुकतेने चाळते.

सामाजिक उत्पादनाच्या प्रक्रियेत सामील झाल्यामुळे समाजात तिची स्वतंत्र ओळख निर्माण होते जी पूर्वी कोणाची तरी आई, बहिण, पत्नी, मुलगी अशी असते त्यापेक्षा वेगळी असते. ती करत असलेल्या तिच्या कामाच्या आधारावर लोक तिला ओळखू लागतात. आता ती कमावत असल्यामुळे तिला हवा तिथे ती खर्च करू शकते. आता तिला तिचे छंद, कौशल्य, मग ते संगीत वा नृत्य शिकणे असो, पुस्तके वाचणे असो किंवा नाटक–सिनेमा पाहणे असो ते सुरू करणे शक्य होते. अशा अनेक स्त्रिया आहेत की ज्यांना चित्रकला, संगीत, नृत्य या सारख्या विषयांमध्ये गती असते. पण कधी कुटुंबावर आर्थिक भार पडेल म्हणून तर कधी कुटुंबाने प्रोत्साहन न दिल्यामुळे आपल्या प्रतिभांचा विकास त्या करू शकत नाहीत. आर्थिकदृष्ट्या सक्षम असणारी स्त्री इतरांनाही मदत करू शकते. अशा कितीतरी स्त्रिया स्वकमाईतून आपल्या लहान भावाबहिणींच्या शिक्षणासाठी मदत करताना दिसतात.

बहुतांश लोक स्त्रियांनी नोकरी करण्याच्या विरोधात असतात कारण त्यांना वाटते की कुटुंबाची घडी विस्कटेल. त्यांचे म्हणणे — घरातील कामे कोण करणार? प्रथम हा प्रश्न उपस्थित करण्याची गरज आहे की, घरकाम ही फक्त स्त्रीची जबाबदारी आहे का? त्यात नवऱ्यानेसुद्धा भागीदारी करावयास नको का? ज्या घरातील स्त्री नोकरी करणारी आहे आणि नवराही घरकामात सहभागी असतो, त्यांची मुले लवकर स्वावलंबी होतात. लहानपणापासूनच ती छोटी-मोठी कामे करायला शिकतात.

दुसरे, आपल्या आसपासची नोकरी करणाऱ्या स्त्रियांची कुटुंबे पाहिल्यावर ती व्यवस्थित चाललेली दिसतात. नोकरी करणारी स्त्री घरकाम आणि बाहेरील काम या दोन्हीला चांगल्याप्रकारे न्याय देते. एवढेच नाही तर तिच्या कमाईमुळे घर आर्थिकदृष्ट्या बळकटच होते. तिच्या वेळेचा सदुपयोग व कामाची विभागणी ती अतिशय नेटकेपणाने करते.

तिसरे, जिथे पती–पत्नी दोघेही नोकरी करतात, त्या घरातील वातावरण गृहिणींच्या कुटुंबांपेक्षा फार वेगळे असते. दोघेही काम करत असलेल्या पती–पत्नीचे नातेही मैत्रीपूर्ण होते. दोघेही आपापल्या कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्यांबाबत एकमेकांशी चर्चा करून एकमेकांचा सल्ला घेतात. दोघांमध्ये विविध सामाजिक–

राजकीय विषयांवर गप्पा होतात, कारण स्त्रीच्या सामाजिक कामातील सहभागामुळे तिला बाहेरच्या जगाबद्दल माहिती होते. घरातील असे मनमोकळे वातावरण मुलांवर चांगले संस्कार रुजविण्यास मदत करते. एखाद्या गृहिणीला — जरी ती सुशिक्षित असली तरी — तिचा पती आपल्या कामातील अडचणी सांगत असला तरी तिला ते ऐकण्यात फारसा रस नसतो. घराबाहेरील जगाशी तिचा फारसा संबंध येत नसल्यामुळे, पतीच्या कामावरील समस्यांवर ती बोलू शकत नाही किंवा बौद्धिक चर्चाही करू शकत नाही.

अखेरचे आणि सर्वात महत्त्वाचे, काही कारणांमुळे नवऱ्याबरोबरचे संबंध बिघडले किंवा त्याचा आकस्मिक मृत्यू झाला तर आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेली स्त्री आपले आणि आपल्या मुलांचे पालनपोषण स्वाभिमानाने करू शकते तर घरात राहणारी स्त्री सासर आणि माहेर या दोन्हींवर ओझे बनते; आणि पुढील आयुष्यामध्ये अपमानित जिणे जगावे लागते.

अनेक स्त्रिया असा विचार करतात की आपले आयुष्य तर कसेबसे व्यतीत झाले आता आपल्या मुलीचा विचार करायला पाहिजे. पण आपणच जर आपली बंधने तोडू शकलो नाही तर पुढच्या पिढीला देण्यासाठी आपल्याकडे काहीच असणार नाही. म्हणजेच जी सुरुवात आपण करायला हवी होती ती आपण आपल्या मुलीच्या खांद्यावर टाकून मोकळे. परंतु आव्हानांना घाबरून जीवनातून माघार घेऊन पळून जाण्याचा हा प्रकार आहे. अशी आशा निष्फळ असते, कारण स्वतःची बंधनेच जर आपण धैर्याने तोडू शकलो नाही, तर पुढच्या पिढीला आपण ते धैर्य कोठून देणार?

स्त्रियांच्या स्वावलंबनाचा आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू हा ही आहे की जोपर्यंत समाजातील अर्ध्या लोकसंख्येचा — स्त्रियांचा — सामाजिक उत्पादनात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग होत नाही तोपर्यंत कोणत्याही समाजाचा खऱ्या अर्थाने विकास शक्य नाही.

स्त्रियांना पितृसत्ताक गुलामीतून मुक्त होण्यासाठी घराबाहेर पडून नोकरी करून, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे हे पहिले पाऊल असेल. पण आज चांगली नोकरी मिळणे हे अत्यंत अवघड झाले आहे. गेल्या दोन दशकात खाजगीकरण, उदारीकरणाच्या या काळात देशातील अनेक उद्योगधंदे बंद पडत आहेत. आपल्या देशातील नेते मोठमोठ्या कॉर्पोरेशन्सचा नफा वाढवण्यासाठीच देश चालवत आहेत. या महाकाय कंपन्यांना नफा आणि फक्त नफा कमावण्यातच स्वारस्य आहे. जास्तीतजास्त नफा मिळविण्यासाठी कॉर्पोरेशन्स कमीतकमी कामगारांना किमान


वेतनावर ठेवतात. काही मूठभर चांगल्या पगाराच्या नोकऱ्या सोडल्या तर बाकी सर्वसाधारण नोकऱ्या कमी पगारांच्या आणि असंघटित क्षेत्रात आहेत. आणि म्हणूनच आज महिलांच्या स्वातंत्र्याचा आणि मुक्तीचा संघर्ष पुढे घेऊन जायचा असेल तर त्यांना रोजगार मिळवण्यासाठी लढा देणाऱ्या लोकांच्या संघर्षात सामील व्हायला लागेल आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची मागणी करायला लागेल. कंत्राटी रोजगार बंद करून कायमस्वरुपी रोजगाराची मागणी करायला लागेल. स्त्री संघटनांसह सर्व जनआंदोलनांना एक नवसमाज निर्माण करायचा आहे की ज्यात प्रत्येकाला कामाचा जन्मसिद्ध अधिकार असेल, स्थिर उत्पन्न, निवारा, आरोग्यसुविधा तसेच वृद्धापकाळातील सुविधा या गोष्टींना प्राधान्य असेल आणि यावरच भर दिला जाईल. तो समाज खरोखरच मुक्त आणि लोकशाहीवादी असेल.

हा अर्थातच दीर्घकालीन संघर्ष आहे. पण, तोपर्यंत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी कमी पगाराची का असेना पण मिळेल ती रोजगाराची संधी स्वीकारणे महत्त्वाचे आहे. आपण जेव्हा घराबाहेर पडू आणि मुक्त होऊ तेव्हाच असा समाज निर्माण करू शकतो जिथे सर्वांना रोजगारासाठी प्राधान्य दिले जाईल. स्त्री–पुरुष समानता असलेल्या समाजासाठी ते पहिले पाऊल आहे.

■ ■

*ै ख़सिझ्ममढसृ ु े ृ हा*
*ख़ ख़ढृ षृ ई हलृ ु ाि ह*
*ई ि सिड़ों ड़ं ृ हु े*
*ढृ ष ृ फ़्ख़ख़*
*ु ैहा ै ि ु र ैमृ फ़्ख़*
*झ्ै समन ि औं ख़*
*नं ख़बख़ा ों िएड़ि फ्रि*

*ि फ्ै*



# पुरुषही घडविला जातो

या आधीच्या सर्व लेखांमधून आपण पितृसत्तेमध्ये स्त्रियांची काय परिस्थिती असते याची चर्चा केली. या पितृसत्ताक व्यवस्थेचा पुरुषांवर काय परिणाम झाला आहे यावर या लेखात चर्चा करत आहोत. जसे ‘स्त्री जन्माला येत नाही, घडवली जाते’ तसेच ‘पुरुषही जन्माला येत नाही, घडवला जातो’. पितृसत्ताक व्यवस्था ही स्त्रीमध्ये स्त्रीत्वाची भावना जागृत करते तर पुरुषामध्ये पितृसत्तेला पोसण्याचे काम ‘मर्दानगी’ करते. पितृसत्ताक व्यवस्था स्त्रियांमध्ये दुय्यमत्वाची भावना निर्माण करते तर पुरुषांमध्ये श्रेष्ठत्वाची भावना निर्माण करते. ही श्रेष्ठतेची भावना आणि यातून निर्माण होणाऱ्या मूल्यांना व व्यवहारांना मर्दानगी म्हणतात.

निसर्गाने स्त्री आणि पुरुष यांच्यात फक्त 2–3 फरक केले आहेत, आणि ते ही पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेसाठी. लिंगाव्यतिरिक्त बाई मुलाला जन्म देऊ शकते म्हणून तिला गर्भाशय आहे आणि मुलाचे पालनपोषण करण्यासाठी छाती. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की निसर्गाने भेद निर्माण केला आहे, भेदभाव नाही. पुनरुत्पादनासाठी सहकार्याची गरज आहे, हिंसेची नाही, श्रेष्ठ–कनिष्ठ असण्याची गरज नाही. पण

आपण त्याला असमानतेशी जोडले आणि स्त्री–पुरुषांमध्ये भेदभाव सुरू केला. या असमानतेनेच पुरुषप्रधानतेला जन्म दिला आणि पुढे जाऊन ती पितृसत्ताक व्यवस्था बनली ज्यामध्ये संसाधने, निर्णय घेणे आणि विचारधारेवर पुरुषांचे नियंत्रण आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोवर पुरुषभानाचे (मर्दानगी समजून घेतानाचे) कार्यक्रम करत असताना आम्ही मुलांना खरा मर्द असण्याची लक्षणे कोणती हा प्रश्न विचारला. गरज असेल तेव्हा स्त्रियांचे रक्षण करणारा, धीट, मेहेनती, कर्तबगार, ताकदवार, समजदार, आक्रमक, दबंग, कधी न रडणारा, तगडा, बहादूर, गरम रक्ताचा, निधड्या छातीचा, जिगरबाज, इत्यादी व्याख्या त्यांनी सांगितल्या. या व्याख्या बरोबर आहेत का हा प्रश्न मुलींना विचारला असता त्यांनी यातील बहुतेक सर्व व्याख्या मान्य केल्या. यातील काही त्यांना आवडतातही. पण त्याचबरोबर त्यांनी हे पण सांगितले की पुरुष अहंकारी, रागीट आणि नियंत्रण ठेवणारे असतात जे त्यांना आवडत नाही. पण वस्तुस्थिती ही आहे की अहंकारी, रागीट आणि नियंत्रण ठेवणारे हे गुण मुलांनी मर्दानगीच्या सांगितलेल्या व्याख्येमधूनच येतात. अहंकारी, रागीट आणि नियंत्रण ठेवणारे मिळून एक खतरनाक रसायन बनते — मर्दानगी. पुरुषाला सत्ताधारी, आक्रमक आणि हिंसक रूपात प्रस्थापित करणारी, या मूल्यांना समाजमान्यता देणारी ती एक सामाजिक परिभाषा आहे जी पितृसत्तेने निर्माण केली आहे. पुरुषही 'पुरुष' म्हणून घडवला जातो असे म्हणताना मर्दानगी समजून घ्यायची तर पुरुषांची जडणघडण लहानपणापासून कशी होते हे पाहायला लागेल.

अगदी लहान असतानासुद्धा मुलाने फ्रॉक घालायचा म्हटले तर 'तू काय मुलगी आहेस का?' म्हणून चेष्टा केली जाते, कधी खेळताना मार खाऊन मुलगा रडत घरी आला तर 'रडतोस काय बायकांसारखा?' असे म्हटले जाते, कधी अपमान करायचा असेल तर 'बांगड्या भर बायकांसारख्या' असे सांगितले जाते — अशा अनेक वाक्यांनी आपण त्या लहानशा मुलाला पुरुष बनवण्याची सुरुवात करतो. बऱ्याच घरांमध्ये मोठ्या बहिणीला सोबत म्हणून लहान भावाला बरोबर पाठवले जाते; तेव्हापासूनच तो संरक्षकाच्या भूमिकेत जातो. घरामध्ये, नातेवाईकांमध्ये व समाजात तो प्रत्येक क्षणी पुरुषप्रधानता बघत असतो व त्याचेच अनुकरण करायला लागतो.

मर्दानगीचा एक महत्त्वपूर्ण पैलू हिंसा आहे. अनेक जण असे म्हणू शकतात की पुरुष स्वभावतःच हिंसक असतात. पण तसे नाहीये. जन्मतः हिंसक कुणीच नसतो. पुरुषांना हिंसक बनवण्यात समाजाचा मोठा वाटा आहे. लहानपणापासून मुलग्यांना आपण खेळणी म्हणून बंदुका, गदा, स्पायडरमॅन यांच्यासारख्या गोष्टी देतो. अनेकदा

जेवायला वाढायला उशीर झाला म्हणून ताट फेकून मारणारे किंवा येता जाता आईचा अपमान करणारे आणि आईवर हात उचलणारे वडील मुलाने लहान असल्यापासूनच पाहिलेले असतात. स्त्रियांचे स्थान बरोबरीचे नाही, त्यांच्यावर हात उगारला जाऊ शकतो हे मूल्य त्यांच्या मनात ठसवले जाते. कुटुंब ही मुलांना 'पुरुष' बनवण्याची मोठी प्रयोगशाळा आहे. आणि मग मोठे झाल्यावर मुली जसे आईचे अनुकरण करतात तसेच मुलगेही वडिलांचे अनुकरण करू लागतात, हिंसक बनतात. आणि मग ती हिंसा स्त्रियांपुरती मर्यादित राहत नाही तर पुरुषा–पुरुषांमध्येही पोहोचते. मर्दानगीमध्ये हिंसा निहित आहे.

फक्त पुरुषांमध्येच नाही तर समाजातही हिंसा पसरवण्यामध्ये प्रसारमाध्यमे आणि सिनेमे यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ह्या माध्यमांचा समाजावर तर परिणाम होतोच पण स्त्री–पुरुष संबंधांवरही मोठा परिणाम होत असतो. मुलींबरोबर कुठल्याही प्रकारे वागले तरी त्यांना ते आवडते; त्यांच्यावर जबरदस्ती केली तरी त्यांना ती आवडते; पत्नी किंवा प्रेमिकेवर बिनदिक्कत हात उचलता येतो; बाई 'माणूस' नाहीच तर वस्तू किंवा आयटम आहे; आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मुलगी जेव्हा नाही म्हणते तेव्हा खरे तर तिचा होकार असतो — सिनेमांमध्ये तर हे सर्व उघड उघड दाखवले जाते आणि हे सगळे घडत असतानाही शेवटी हिरोला हिरॉईन मिळते. अशी मूल्ये जर प्रसारमाध्यमे आणि सिनेमातून मिळत असतील तर मुलगे हिंसक का होणार नाहीत? प्रत्यक्ष आयुष्यात एखादी मुलगी मुलाला नाही म्हणू शकते. सिनेमातली मूल्ये आणि मर्दानगीचा अहंकार ह्या दोन्ही गोष्टींमुळे मुलगा हिंसक बनतो. ह्याचा शेवट मुलीला मारून टाकण्यामध्ये किंवा तोंडावर ॲसिड फेकण्यामध्ये होतो.

स्त्रियांवरील हिंसा आज एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत की भारतात 45% नवरे कधी ना कधी आपल्या बायकांवर हात उचलतात, दर 15 मिनिटाला एक बलात्कार होतो आणि एका दिवसात दोन स्त्रियांना कुठल्या ना कुठल्या कारणाने मारले जाते. हे जणू काय कमी आहे म्हणून आम्ही गेल्या 20 वर्षात 1 कोटी मुलींना संपवून टाकले आहे — जन्मालाच घातले नाही किंवा जन्मल्याबरोबर लगेच मारून टाकले.

गेल्या काही वर्षात 'मर्दानगी' शी जोडलेल्या हिंसेचा एक नवीनच पैलू समोर आला आहे ज्याचा आजच्या राजकारणाशी गहन संबंध आहे. पुरुषी सत्तेला आव्हान देणाऱ्या माणसांना धडा शिकवण्यासाठी खैरलांजी भगिनींवर आठ ग्रामपंचायत पदाधिकारी बलात्कार करून हत्या करतात, हे जातीयवादी हिंसक पुरुषी

मानसिकतेचे उदाहरण आहे. 'लव्ह जिहाद'सारखा बागुलबुवा उभा करणे असो की *'ऑनर किलिंग'*, हे सारे संस्कृतिरक्षणाच्या नावाखाली स्त्रियांच्या लैंगिकतेवर संपूर्ण वर्चस्व आणि नियंत्रण मिळविण्याचेच मार्ग आहेत.

जगभरात सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक पातळीवर जितक्या हिंसक गोष्टी घडतात त्या सगळ्याच्या मागे मर्दानगीचा पण हात आहे. 95% गुन्ह्यांमागे कुठल्या ना कुठल्या पुरुषाचा हात असतो. पैशांसाठी होणाऱ्या हिंसेपासून दहशतवाद, जाती–धर्माच्या नावावर होणारे अत्याचार ह्या सगळ्यामागे अन्य कारणांव्यतिरिक्त मर्दानगीही एक कारण आहे.

गेल्या 100–150 वर्षात स्त्रियांना हे कळून चुकले आहे की पितृसत्ता धोकादायक आहे. पुरुषांना का नाही समजले? आश्चर्याची गोष्ट आहे की पुरुषांनी एकत्र येऊन पितृसत्तेविरोधात उभे राहण्याचा विचार नाही केला. हां! व्यक्तिगत पातळीवर जे समजदार होते त्यांनी याविरोधात आवाज उठवला, जसे गौतम बुद्ध, मोहम्मद पैगंबर, रामसामी पेरियार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि महात्मा फुले. हे सगळे पुरुष होते पण त्यांनी पितृसत्तेचा विरोध केला. पण सामान्य पुरुषांनी ह्याच्या विरोधात आवाज उठवला नाही, पितृसत्तेच्या विरोधात चळवळही उभी केली नाही. कारण या व्यवस्थेतून त्यांना मिळत असलेले फायदे — कुलदिपक, वंशाचा दिवा, संपत्ती त्यालाच मिळणार, कुटुंबप्रमुख तोच, इ. — इतके पसंत आहेत की त्यातील वाईट गोष्टी त्यांना दिसत नाहीत.

आता रोजच्या आयुष्यात मर्दानगीमुळे पुरुषांचे काय नुकसान होत आहे ते पाहूया. वर उदाहरण दिलेच आहे की 7–8 वर्षाचा मुलगा, त्याला बहिणीबरोबर चौकीदारी करायला बाहेर पाठवले जाते. किंवा बहिण कुठे जाते, कोणाशी बोलते यावर नजर ठेवायला पाठवले जाते. पण हीच चौकीदारी त्याला नंतर आयुष्यभर करावी लागते. कुणाला स्टेशनवर सोडायला जा, तर कुणाला बसस्टँडवरून रात्री आणायला जा.

मुलांना त्यांच्या भावना व्यक्त करायला दिल्या जात नाहीत. 'मर्द को दर्द नही होता', 'असली मर्द रोता नही है' अशी अनेक वाक्ये आपण नेहमी ऐकत असतो. पुरुषांना एखाद्या गोष्टीचे वाईट वाटू शकत नाही का? त्यांना दुःख होत नसेल का? रडावेसे वाटत नसेल का? नक्कीच वाटत असेल पण पुरुष त्यांच्या या भावना व्यक्त करू शकत नाहीत. एवढेच नाही तर घरातील जवळची व्यक्ती वारली तरी त्याने रडता कामा नये असे आम्ही लहानपणापासूनच त्याच्यावर बिंबवले आहे. माणूस आहे तिथे भावना असणारच. पण पुरुषांना त्याचे प्रदर्शन करण्याची मुभा समाजाने

दिलेली नाही. त्याचे भावनिक खच्चीकरण केले जाते. तो हे म्हणू शकत नाही की मला भीती वाटते; मला हे काम जमत नाही. म्हणूनच पुरुष जेव्हा अयशस्वी होतो तेव्हा त्याच्यात नूनगंड निर्माण होतो, दारूमध्ये आपले अपयश विसरण्याचा प्रयत्न करतो, किंवा आत्महत्या करतो. गेल्या दोन दशकात शेतीच्या वाढत्या संकटामुळे तीन लाख पुरुष शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पण एकाही शेतकरी महिलेने आत्महत्या केलेली नाही.

त्याचबरोबर, आयुष्यातल्या अनेक छोट्या छोट्या आनंद देणाऱ्या गोष्टींनाही तो मुकतो. कपड्यांचेच उदाहरण द्यायचे झाले तर मुलींच्या कपड्यांमध्ये आणि कपड्यांच्या रंगांमध्ये प्रचंड विविधता आहे. पण पुरुषाला बिचाऱ्याला ठराविक रंगाचेच कपडे घालायला लागतात. तेच ते शर्ट–पँट आणि तेच ते फिकट निळ्या, पिवळ्या नाहीतर पांढऱ्या रंगाचे कपडे. मुलांना सांभाळण्यातला आनंद, स्वतः पदार्थ करून दुसऱ्याला खायला घालण्यातला आनंद, दुसऱ्याची सेवा करण्यातला आनंद हे सगळे आनंद पुरुषाकडून हिरावून घेतले आहेत. त्यांना काहीच येत नाही. ना शिवणकाम, ना भरतकाम, ना विणकाम. एकच गोष्ट येते ती म्हणजे पैसे कमावणे. त्यांना पैसे कमावण्याचे मशीन बनवून टाकले आहे.

पण ह्या सगळ्यापेक्षा पितृसत्तेने भयंकर वाईट गोष्ट केली आणि ती म्हणजे पुरुषांना माणूसपणापासून दूर नेले. 16 वर्षाचा मुलगा वयाने कितीतरी मोठ्या असलेल्या बाईवर बलात्कार करतो, रस्त्यातून, बसमधून जाताना कोणी अनोळखी स्त्रीच्या शरीरावरून हात फिरवतो, 45% पुरुष आपल्या पत्नीवर हात उचलतात — यांना माणूस म्हणावे का? जाती–धर्माच्या नावावर दुसऱ्या जातीतील किंवा धर्मातील मुलीवर बलात्कार करतात. आपल्याच शरीराचा हत्यार म्हणून वापर करतात. जगातली अर्धी लोकसंख्या जर माणुसकीपासून इतकी दूर गेलेली असेल तर 100 कोटी महिलांवर हिंसा होणारच. पुरुष खरेच असेच असतात का? नाही. पुरुषसत्ताक व्यवस्था त्यांना असे बनवते.

आज देशभरात केवळ महिलाच नाही तर पुरुषही स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेविरोधात आवाज उठवत आहेत, रस्त्यावर उतरत आहेत, आंदोलनात सामील होत आहेत — जसे आपण निर्भया हत्याकांडाच्या वेळी पाहिले. गरज आहे पुरुषांनी आपले 'पुरुषभान' जागवण्याची, आपली माणुसकी वाचवायची.

पुरुषांना हे समजून घ्यायला लागेल की जोपर्यंत स्त्री स्वतंत्र होणार नाही तोपर्यंत पुरुषही स्वतंत्र होऊ शकत नाही. पितृसत्तेविरुद्ध लढाई दोघांनाही अंतिमत: माणूसपणाकडे नेणारी आहे.

■ ■

10



# स्त्री चळवळीची दिशा

## आंतरराष्ट्रीय स्त्री मुक्ती चळवळ

स्त्री आणि पुरुष हे दोघेही समाजाचे महत्त्वाचे अंग आहेत. समाज चालवण्यासाठी दोघांचेही सारखेच महत्त्व आहे. मग एकाचा दर्जा वरचा आणि दुसऱ्याचा खालचा हे कसे झाले? हा विचार करण्यासारखा विषय आहे. स्त्रियांचा दर्जा सुरुवातीपासूनच पुरुषांपेक्षा कनिष्ठ आहे का? आणि पुढेही तसाच राहील का?

यातल्या काही प्रश्नांची उत्तरे इतिहासात सापडतात.

मानववंशशास्त्रज्ञांनी दर्शविले आहे की सुरुवातीच्या मानवी समाजात, आणि त्यानंतरच्या इतिहासाच्या 90% पेक्षा जास्त काळ (म्हणजे साधारण 2 लाख वर्षे), जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये — आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय — स्त्रिया आणि पुरुष फक्त समान नव्हते, तर स्त्रियांची समाजात महत्त्वाची भूमिका

होती. मानवी समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या पुनरुत्पादनाच्या क्षमतेमुळे स्त्रियांबद्दल समाजात आदर होता. या शिवाय महिलांनी शिकार आणि शेती या दोन्ही उत्पादनाच्या क्षेत्रात मोठी भूमिका बजावली होती.

मनुष्यप्राण्याच्या पृथ्वीवरील वास्तव्याच्या 90% काळ मानव समाज हा समतावादी समाज होता. उत्पादनाची साधने, म्हणजे कच्चा माल, उत्पादनासाठी वापरली जाणारी हत्यारे आणि जमीन, सामुदायिक मालकीची होती, आणि श्रमाचे फळ सर्वांमध्ये समान वाटले जायचे. समाज खरोखरीच सामूहिक पद्धतीने राहत असून, जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक व्यक्तीचे पोषण आणि संरक्षण समूह करत असे.

जसजसे उत्पादन वाढू लागले, तसतसे समूहातील काही लोकांनी त्यावर नियंत्रण स्थापित केले, आणि खाजगी मालमत्तेचा उदय झाला. समाजाची वर्गांमध्ये विभागणी व्हायला सुरुवात झाली. अर्थातच हे होण्यासाठी बराच कालावधी लागला असावा. त्याचबरोबर, समाजात आणखी एक मोठी विभागणी झाली, ती म्हणजे स्त्री आणि पुरुषांमधील विभागणी. उत्पादनाच्या आणि निर्वाहाच्या साधनांवर पुरुषांचे नियंत्रण आले व महिला घरामध्ये कैद झाल्या. परिवाराचे स्वरूप पुरुषसत्ताक बनले आणि स्त्रिया पित्याची/नवऱ्याची मालमत्ता बनल्या.

एकीकडे उत्पादनाच्या साधनांवर नियंत्रण ठेवणारा मालमत्तेतील वर्ग आणि दुसरीकडे ज्यांच्याकडे फार कमी किंवा कोणतीही मालमत्ता नाही आणि उपजीविकेसाठी आपले श्रम विकावे लागतील असे कामगार, किंवा अधिक सोप्या भाषेत सांगायचे तर एका बाजूला श्रीमंत आणि दुसऱ्या बाजूला गरीब असे दोन वर्ग अस्तित्वात आले — आणि त्यांचामाधे संघर्ष सुरू झाला. श्रीमंतांनी सत्ता आणि त्यांच्या संपत्तीवर त्यांचे नियंत्रण कायम ठेवण्याचा प्रयत्न केला, तर श्रमिकांची मागणी होती की मानवी श्रमाचे फळ सर्वांमध्ये समान वाटले गेले पाहिजे. तो संघर्ष आजतागायत सुरू आहे.

या संघर्षात महिलांचा मोलाचा वाटा आहे. जेव्हा जेव्हा जनआंदोलने तीव्र झाली, तेव्हा तेव्हा शोषितांच्या मुक्तीच्या मागणीबरोबरच महिलांनी स्त्री–पुरुष समानतेची ही मागणी केली.

स्त्री मुक्ती चळवळीची सुरुवात मध्ययुगीन सरंजामशाही काळात झाली. सरंजामशाही व्यवस्थेचे वैशिष्ट्य होते वेठबिगार, व्यापारावरील निर्बंध आणि मुक्त स्पर्धेचा अभाव. त्याच काळात भांडवलशाहीचा ही जन्म होत होता. जस जशी भांडवलशाही सरंजामी व्यवस्थेच्या खोलात पसरत गेली, कारागीर आणि व्यापारी यांसारख्या नवीन वर्गांचा जन्म झाला. त्यांनी सरंजामशाही व्यवस्थेविरुद्ध बंडाचे

नेतृत्व केले. या आंदोलनात महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता, आणि सरंजामशाही बरोबरच त्यांनी पितृसत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यास सुरुवात केली.

अखेरीस, दीर्घ आणि गुंतागुंतीच्या प्रक्रियेतून भांडवलशाही व्यवस्थेने 19व्या शतकात प्रथम युरोपमध्ये आणि नंतर जगभरात इतर ठिकाणी सरंजामशाही व्यवस्थेची जागा घेतली.

20व्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकांमध्ये, 19व्या शतकातील भांडवलशाहीचे वैशिष्ट्य असलेल्या छोट्या कंपन्यांचे मोठ्या कंपन्यांमध्ये रूपांतर झाले. भांडवलशाही, मक्तेदारी भांडवलशाहीत रूपांतरित झाली. हे परिवर्तन अमेरिका, युरोप आणि जपान या विकसित भांडवलशाही देशांमध्ये घडले. 20व्या शतकाच्या शेवटापर्यंत, या मोठ्या कॉर्पोरेशन्सनी त्यांचे कार्य जगभरात विस्तारले आणि जागतिक भांडवलशाही व्यवस्थेवर वर्चस्व गाजवले.

सरंजामशाही व्यवस्थेप्रमाणे भांडवलशाही ही देखील एक शोषक आणि असमान व्यवस्था आहे ज्यामध्ये भांडवलदार कामगारांचे शोषण करतात. भांडवलशाही व्यवस्थेमुळे जागतिक स्तरावर एका बाजूला प्रचंड प्रमाणात गरिबी आहे, आणि दुसऱ्या बाजूला, उत्पादनांच्या साधनांपैकी प्रचंड मोठा हिस्सा मूठभर कॉर्पोरेशन्सच्या ताब्यात आहे आणि मुठभर धनदांडग्यांच्या हातात जगातील बहुतांश संपत्तीची मालकी आहे.

या निर्दयी शोषण व्यवस्थेचा सर्वाधिक फटका महिलांना बसला आहे. भांडवलशाहीने आपला नफा वाढवण्यासाठी पुरुषसत्ताकतेचा वापर केला आहे. महिला कामगारांना त्याच कामासाठी कमी पगार देऊन आणि जास्त तास काम करण्यास भाग पाडून त्यांचे शोषण अधिक तीव्र केले आहे. जेव्हा जेव्हा भांडवलशाही संकटात सापडते तेव्हा सर्वात प्रथम स्त्रियाच नोकऱ्यांमधून बाहेर फेकल्या जातात.

पण त्याचबरोबर, भांडवलशाहीमध्ये उत्पादन वाढल्यामुळे स्त्रियांसाठी घराबाहेर रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतात. परिणामी, स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत मिळाली. तसेच स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे ही उघडली. अशाप्रकारे भांडवलशाहीने स्त्रियांची पितृसत्तेतून मुक्त होण्याची परिस्थिती तयार केली. आणि म्हणून युरोप, अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशांमध्ये 19व्या शतकात स्त्री मुक्ती चळवळ तीव्र झाली.

भांडवलशाहीचा जागतिक विस्तार, नोकरदार महिलांच्या संख्येत प्रचंड वाढ आणि भांडवलशाही अंतर्गत त्यांचे क्रूर शोषण — यामुळे स्त्री मुक्ती चळवळ जागतिक

चळवळ बनली. 1910 मध्ये, दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेने जगभरात महिलांच्या हक्कांसाठी एक दिवस साजरा करण्याचे आवाहन केले. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा जन्म झाला. दरवर्षी 8 मार्च रोजी हा दिवस साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय स्त्री मुक्ती चळवळीला हे ही समजले की पितृसत्ताकतेनी भांडवलशाहीशी सांगड घाललेली आहे ज्यामुळे पितृसत्ताक दडपशाहीविरुद्ध स्त्रियांचा संघर्ष आणि भांडवलशाही शोषणाविरुद्ध कष्टकरी जनतेचा संघर्ष एकत्र येणे आवश्यक आहे.

भांडवलशाही व्यवस्थेमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली आहे तसेच मोठ्या प्रमाणात संपत्तीही निर्माण झाली आहे. याचा फायदा जगातील लोकसंख्येच्या अगदी छोट्या हिश्शाला झाला आहे. पण त्याचबरोबर अशी शक्यताही निर्माण झाली आहे की जर कष्टकऱ्यांनी — पुरुष आणि महिला दोन्हींनी — एकत्र येऊन क्रांतिकारी लोकचळवळ उभारली, आणि लोकशाही पद्धतीने समाज बदलण्यात यशस्वी झाले, तर ते पर्यायी धोरणे राबवू शकतात, ज्यामध्ये ही संपत्ती सर्वांच्या फायद्यासाठी वापरू शकतात. आणि एक नवीन समाज निर्माण होऊ शकतो, ज्यात प्राधान्याने सर्व मानवांच्या मूलभूत गरजा पूर्ण होतील — चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, सकस आहार, उत्साहवर्धक शिक्षण, सभ्य निवारा, स्वच्छ प्रदूषणमुक्त वातावरण.

गेल्या अनेक दशकांत भांडवलशाही शोषणाविरुद्ध कष्टकरी जनतेचा संघर्ष जागतिक स्तरावर विस्तारला आहे. सर्वात आनंददायी हे आहे की दक्षिण अमेरिकेतील अनेक देशांमध्ये समाजवादी जनआंदोलने लोकशाही पद्धतीने सत्तेवर आली आहेत, आणि ती कॉर्पोरेशनच्या नफा वाढविण्याच्या दिशेने नव्हे तर सर्व लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या दिशेने धोरणे राबविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पिरॅमिडच्या तळाशी असल्याने, नफा-केंद्रित भांडवलशाही व्यवस्थेमुळे होणारी प्रचंड गरिबी आणि दुःखाचा सर्वात जास्त फटका महिलांना सहन करावा लागतो. आणि म्हणूनच, जग बदलण्याच्या संघर्षांमध्ये महिला आघाडीची भूमिका बजावत आहेत यात काहीच आश्चर्य नाही!

## भारतातील स्त्री मुक्ती चळवळीचा जन्म

भारतीय उपखंडातही प्रागैतिहासिक समाज हे समतावादी समाज होते. ते महिलांच्या उत्पादक श्रमाची कदर करत होते आणि स्त्रियांचा पुनरुत्पादनाच्या क्षमतेचा समाजात आदर होता.

*ऋग्वेदातील* स्तोत्रांच्या विश्लेषणात जन्म-आधारित भेद किंवा लिंग असमानतेचा कोणताही पुरावा मिळत नाही. ऋग्वेदिक समाज हा समतावादी होता. जन्माधारित भेद आणि स्त्री–पुरुष असमानता या दोन्हीचे पहिले संकेत ऋग्वेदोत्तर समाजाच्या साहित्यात दिसतात.

भारतात मध्ययुगीन सरंजामशाही व्यवस्थेने जातिव्यवस्थेचे रूप धारण केले. यासोबतच पितृसत्ता अधिक मजबूत झाली. जातिव्यवस्था जशी विकसित झाली तशी या दोन्ही श्रेणीबद्ध व्यवस्था एकमेकींशी अविभाज्यपणे गुंफल्या गेल्या. जातीय शुद्धता राखण्यासाठी पितृसत्ता — विशेषत: स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण — खूप महत्त्वाची आहे.

सरंजामशाही व्यवस्था ही शोषक व्यवस्था होती. सरंजामी व्यवस्थेविरुद्धच्या लोकांच्या उठावाने भारतातील भक्ती चळवळीचे रूप घेतले. त्याच बरोबर भक्ती चळवळीतील महिला संतांनी त्यांच्या गीते, कविता आणि जीवनपद्धतीतून पितृसत्तेला आव्हान देऊन भारतातील स्त्री मुक्ती चळवळीचा पाया घातला.

कधी ना कधी, भारतीय लोकांचा हा उठाव समाज परिवर्तन करण्यामधे यशस्वी झाला असता आणि अधिक समतावादी समाज निर्माण झाला असता. हा स्वदेशी विकास ब्रिटिश वसाहतवादी राजवटीने नष्ट केला. भारतीय राजांना युद्धात पराभूत केल्यानंतर, ब्रिटिशांनी पद्धतशीरपणे भारताची लूट करण्यास सुरुवात केली. वसाहतवादी राजवटीच्या विध्वंसामुळे भक्ती चळवळही खंडीत झाली. ब्रिटिशांनी वसाहतवादी लूट सुलभ करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था आणि समाजाची पुनर्रचना केल्याने जातिव्यवस्था आणि पितृसत्ता या दोन्हीची खोली आणि व्याप्ती वाढली.

19व्या शतकाच्या अखेरीस भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा जन्म झाला. 20व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात महात्मा गांधींनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व हाती घेतले. स्वातंत्र्याचा, 'स्वराज्याचा' गांधीजींचा समज, फक्त ब्रिटिश राजवटीपासूनचे राजकीय स्वातंत्र्य नव्हता, तर सर्व दडपशाहीविरूद्ध व्यक्तीचे स्वातंत्र्य हा होता. म्हणून त्यांनी दलित, आदिवासी आणि महिलांसह सर्वात गरीब आणि शोषित लोकांना फक्त स्वातंत्र्यलढ्यात आणण्याची रणनीती नाही आखली, तर त्यांना सक्षम बनवणे आणि त्यांच्या अंगभूत क्षमता विकसित करण्याचेही प्रयत्न केले. यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे रूपांतर जगातील सर्वात मोठ्या जनआंदोलनात झाले.

मिठाच्या सत्याग्रहापासून भारत छोडो आंदोलनापर्यंत, स्वातंत्र्यलढ्याच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला आणि वीरोचित बलिदान

दिले. स्वातंत्र्यलढ्यातील महिलांच्या प्रचंड सहभागाने भारतातील स्त्री मुक्ती चळवळीच्या पुनर्जन्माचा पाया घातला.

## भारतातील स्वातंत्र्योत्तर स्त्री मुक्ती चळवळ

स्वातंत्र्याच्या वेळी लोकतांत्रिक स्त्री मुक्ती चळवळ उभारणे फार कठीण होते. कारण दोन शतकांच्या औपनिवेशिक लूटमारीने देश पूर्णपणे उद्‌ध्वस्त केला होता आणि तो जगातील सर्वात गरीब आणि मागासलेल्या देशांपैकी एक बनला होता. परिणामी, शिक्षणाचा प्रसार खूपच कमी होता आणि महिलांचा त्यांच्या घराबाहेरील कामात सहभाग खूपच कमी होता. म्हणून त्या काळात केवळ मोजक्याच स्त्रियांना स्त्री मुक्तीचे स्वप्न पाहता आले, स्त्रियांच्या दुर्दशेबद्दल त्या निःसंकोचपणे बोलू आणि लिहू शकल्या.

नेहरूंच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताच्या नेत्यांनी मागासलेपणा आणि अन्यायाच्या वसाहतवादी वारशावर मात करण्याचे आणि नवा भारत निर्माण करण्याचे आव्हान स्वीकारले — एक असा भारत जो गरिबी आणि विषमतेपासून मुक्त असेल, जो लैंगिक भेदभावासह सर्व प्रकारच्या भेदभावपासून मुक्त असेल, जो वैविध्यपूर्ण आणि एकसंध असेल, ज्यात न्याय, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही असेल.

देशाला जो मार्ग घ्यायचा होता त्याची रूपरेषा संविधानात होती, ज्यामध्ये भारताच्या भविष्यासाठी आपल्या स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांची स्वप्ने साकारली होती.

नेहरूंचा कल समाजवादाकडे होता आणि त्यांना असा भारत घडवायचा होता जिथे सामाजिक न्याय आणि समतेसह आर्थिक विकास होईल. स्वातंत्र्यानंतर नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारतात राबवण्यात आलेल्या विकासाच्या मॉडेलला सर्वसामान्यपणे मिश्र आर्थिक व्यवस्था म्हटले जाते. यामध्ये अर्थव्यवस्थेवर सरकारचे बरेच नियंत्रण होते, आणि लघुउद्योगांना संरक्षण आणि प्रोत्साहन दिले गेले. पण नेहरूंची काहीही इच्छा असली तरी शेवटी नेहरू मॉडेलच्या मर्यादांमुळे आणि इतर अनेक कारणांमुळे भारतात भांडवलशाही विकासाचा पाया घातला गेला, विशेषतः नेहरूंच्या मृत्यूनंतर.

गेल्या सत्तर वर्षात भारतीय समाजात जसजशी भांडवलशाहीची मुळे खोलवर रुजवली गेली, तसतसे सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात लक्षणीय बदल होत गेले, आणि स्त्रियांची समाजातील परिस्थितीही बदलत गेली. आधुनिक औद्योगिक

अर्थव्यवस्थेच्या विकासामुळे, आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे, अर्थव्यवस्थेत उपलब्ध नोकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली, त्यामुळे घराच्या चार भिंतीत कैद आणि त्यालाच आपले विश्व मानणारी स्त्री घराबाहेर पडली.

यामुळे महिला आर्थिकदृष्ट्या अधिक स्वावलंबी झाल्या आहेत. आधुनिक शिक्षण आणि भांडवलशाही विकासामुळे सरंजामशाही, मध्ययुगीन मूल्ये कमजोर होत आहेत. परिणामी, मोठ्या संख्येने महिलांना माणूस म्हणून स्वतःची ओळख आणि समाजात स्वतःचे स्थान निर्माण करणे शक्य झाले आणि ते मिळवण्यासाठी त्या अथक प्रयत्न करत आहेत.

या बदलांमुळे भारतातील महिला चळवळीच्या वाढीसाठी आणि प्रसारासाठी परिस्थिती निर्माण झाली. देशाच्या विविध भागांमध्ये, सर्वात दुर्गम आणि सर्वात मागास भागांमध्येही, महिला लहान लहान गट बनवून आपल्या हक्क आणि स्वातंत्र्यासाठी पुढाकार घेत आहेत. देशभर व्याप्ती असलेल्या अनेक मोठ्या स्त्री संघटनाही आहेत. या संघटना स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराच्या मुद्यांवर सक्रियपणे काम करत आहेत.

यापैकी अनेक महिला गट पुरुषसत्ताकता आणि भांडवलशाही या दोन्हींशी लढण्याची गरज ओळखतात आणि श्रमिकांच्या संघटनांशी जोडून एकत्रित संघर्ष उभारत आहेत.

## भारतातील नवी आव्हाने

भारतीय समाजातील गेल्या सत्तर वर्षांत झालेल्या बदलांमुळे कार्यक्षम स्त्री चळवळी निर्माण झाल्या आहेत. पण त्याचवेळी ह्या बदलांमुळे स्त्री चळवळीसमोर अनेक नवीन आणि गंभीर आव्हानेही निर्माण झाली आहेत.

आपली स्वप्ने साकार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात महिला घराबाहेर पडू लागल्या आहेत आणि त्यांचा आत्मविश्वासही अधिक वाढला आहे. पण समाजात असलेल्या पुरुषसत्ताक मूल्यांमुळे मोठ्या प्रमाणात वैवाहिक संबंधही ताणले गेले आहेत, घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. आपला अपमान शांतपणे सहन करण्याऐवजी, एखादी स्त्री जर प्रतिकाराचा विचार करत असेल तर तिच्यापुढे पहिला प्रश्न असतो की मानसिक, आर्थिक आणि नैतिक आधारांसाठी कोणाकडे पाहायचे? तिला साथ आणि आसरा द्यायला ना सासर असतं ना माहेर. भारतात भांडवलशाही विकासाच्या मॉडेलच्या मर्यादांमुळे, सामाजिक सुरक्षा फारच कमी आहे. त्यामुळे अशा महिलांना सुरक्षा आणि मदत करणे हे स्त्री मुक्ती चळवळीचे

काम आहे.

भांडवलशाहीच्या वाढीमुळे समाजामध्ये वर्ग विभाजनाची वाढ होते. याचा महिला चळवळीवरही परिणाम होतो. मध्यमवर्गीय स्त्रिया अधिक शिक्षित, स्पष्टवक्त्या आणि आत्मविश्वासू असतात — आणि म्हणून त्या महिला चळवळीच्या नेत्या बनतात. महिला चळवळीने गरीब घटकातील महिलांना पुढे आणण्याची, त्यांच्या अंगभूत क्षमता विकसित करण्याची आणि त्यांच्यामधून नेते तयार करण्याची गरज आहे, अन्यथा महिला चळवळ श्रीमंत आणि गरीब मधे विभागली जाईल आणि त्याची एकजूट आणि ताकद कमकुवत होईल.

भारतातील भांडवलशाहीच्या विकासामुळे जातिव्यवस्थेचे विघटन झाले नाही; उलट, भांडवलशाहीने दलितांचे शोषण तीव्र करण्यासाठी जातीचा वापर केला आहे. जातीयवाद भांडवलदारांना कष्टकऱ्यांमध्ये विभाजन करण्यास मदत करतो आणि त्यांना भांडवलशाही व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी एकसंघ चळवळ उभारण्यापासून रोखतो. म्हणूनच भारतातील भांडवलशाहीची व्याख्या 'ब्राह्मणी भांडवलशाही' अशी केली जाते. जातीव्यवस्था ही महिलांच्या चळवळीलाही घातक आहे, उच्चवर्णीय आणि तथाकथित खालच्या जातीच्या महिलांमध्ये, विशेषतः दलित महिलांमध्ये, भेद निर्माण करते. यामुळेच उच्चवर्णीय महिला, स्त्रियांच्या चळवळीच्या नेत्या बनतात. महिला चळवळीत जातीय विभाजनाशी लढणे सोपे नाही. परंतु जोपर्यंत महिला चळवळ हे करू शकत नाही, सर्व जातीतील स्त्रियांमध्ये खरी एकता निर्माण करू शकत नाही, आणि सर्वात दलित–शोषित जातींमधून नेते तयार करू शकत नाही, तोपर्यंत जातीयवादी भांडवलशाही पितृसत्तेला आव्हान देण्यासाठी एकसंध आणि शक्तिशाली महिला चळवळ उभी करता येणार नाही.

अविकसित देशातील भांडवलशाही विकासाच्या मर्यादांमुळे, 1980 च्या दशकाच्या शेवटी, भारतीय अर्थव्यवस्था संकटात सापडली. आता भारतातील सत्ताधारी वर्गाने भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करण्याचा निर्णय घेतला. गेल्या तीन दशकात, म्हणजे 1991 पासून, जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या नावाखाली भारतीय राज्यकर्त्यांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात मुक्त प्रवेश दिला आहे आणि अर्थव्यवस्थेच्या सर्वात महत्त्वाच्या क्षेत्रांवरील नियंत्रणही त्यांना देत आहे. देश आता फक्त महाकाय परकीय कंपन्यांच्या आणि त्यांच्या भारतीय भागीदारांच्या नग्न नफेखोरीसाठीच चालत आहे. जागतिकीकरणामुळे शिक्षण, आरोग्य व इतर अत्यावश्यक सेवांवरील सरकारी खर्चात मोठी कपात झाली आहे; परिणामी, सामाजिक विषमता, बेरोजगारी आणि गरीबी प्रचंड प्रमाणात वाढली

आहे. या धोरणांचा सर्वाधिक फटका महिलांना बसला आहे.

आर्थिक स्वावलंबन ही स्त्रीस्वातंत्र्याची पहिली पायरी आहे, त्यासाठी स्त्रियांनी शिक्षण घेऊन नोकरी करणे आवश्यक आहे. पण जागतिकीकरणामुळे बेरोजगारीमध्ये झालेल्या प्रचंड वाढीचा सर्वाधिक फटका महिलांना बसला आहे, घराबाहेरील नोकऱ्यांमध्ये त्यांचा सहभाग झपाट्याने कमी झाला आहे आणि जे थोडेफार रोजगार उपलब्ध आहेत ते ही अत्यंत कमी पगाराचे आणि असंघटित क्षेत्रात आहेत. परिणामी स्त्रियांना आर्थिक स्वायत्तता मिळवणे दुरापास्त झाले आहे किंबहुना दोन वेळचे जेवण मिळविण्यासाठी देखील फार संघर्ष करावा लागतो आहे.

जागतिकीकरणाने स्त्रीला गुलाम बनवण्याचे नवनवीन प्रकार अस्तित्वात आणले आहेत. भारतीय बाजारपेठेत आज महाकाय कंपन्यांचे वर्चस्व आहे. त्यांच्या मालाचा खप वाढावा म्हणून ते वेगवेगळ्या क्लुप्त्यांचा वापर करतात, आणि त्यातील एक सामान्य तंत्र आहे जाहिरातींसाठी स्त्री शरीराचा वापर. स्त्रियांच्या शरीराच्या उत्तान जाहिराती हे अलीकडे स्त्रियांवरील वाढत्या हिंसाचाराचे एक महत्त्वाचे कारण आहे.

## फासीवादाचा उदय

1991 पासून नवउदार आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीमुळे देशाचे आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. त्यांच्या नफेखोरीला गती देण्यासाठी 2014च्या लोकसभा निवडणुकीत, मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांनी मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपला पाठिंबा दिला. त्यांनी उदारपणे निवडणूक प्रचारासाठी निधी दिला. भारताच्या निवडणूक इतिहासातील हा सर्वात महागडा निवडणूक प्रचार ठरला, आणि भाजपने निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली. पंतप्रधान झाल्यानंतर, त्यांच्या कॉर्पोरेट समर्थकांच्या इच्छेनुसार, मोदींनी निर्दयी वेगाने नवउदारवाद लागू केला. त्याच वेळी, त्यांच्या कॉर्पोरेट समर्थक आणि लोकविरोधी अजेंड्यापासून लोकांचे लक्ष वळवण्यासाठी, भाजप आणि त्याच्या अनेक पिल्लावळ संघटनांनी भारतात सांप्रदायिकता, जातीयता, आणि लिंगभेद वाढवण्यासाठी हल्ले सुरू केले.

ते बहुसंख्यांकांना खोट्या राष्ट्रवादाच्या नावाखाली संघटित करतात, त्यांच्यामध्ये भीती निर्माण करतात की राष्ट्राला 'इतरांपासून' धोका आहे, आणि त्यांना अल्पसंख्याकांवर तसेच सत्ताधारी पक्षाच्या विरोधकांवर हल्ले करायला प्रवृत्त करतात.

भाजपचा उदय आणि त्याचा फॅसिस्ट अजेंड्याचा नग्न पाठलाग यामुळे

भारताच्या संविधानात नमूद केलेल्या धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक संकल्पनेलाच धोका निर्माण झाला आहे.

भाजपचा समानतेवर विश्वास नाही. ते प्राचीन भारताच्या कायद्याच्या पुस्तकाने — *मनुस्मृतीने* — मंजूर केलेल्या सर्व पारंपरिक श्रेणींवर विश्वास ठेवतात. आणि म्हणून, सत्तेत आल्यापासून ते स्त्री–पुरुष असमानता अधिक तीव्र करण्याचा आणि स्त्री मुक्ती चळवळीने मिळवलेले सर्व हक्क आणि अधिकार मागे घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

## पुढील दिशा

म्हणूनच, आज स्त्री मुक्ती चळवळीचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे:

i) स्त्रियांना त्यांच्या सध्याच्या परिस्थितीची जाणीव करून देणे, त्यांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी संघर्ष करायला प्रोत्साहित करणे, आणि पुरुषांबरोबर आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक–राजकीय क्षेत्रांमध्ये समानता प्राप्त करण्यासाठी संघर्ष करायला संघटित करणे.

ii) जातीविरोधी कार्यक्रम घेणे आणि स्त्रियांमधील जातीय विभागणी समाप्त करण्याचे प्रयत्न करणे.

iii) वरील दोन्ही कामे ही महिला चळवळीची तात्कालिक कामे आहेत. पण हा रोजचा संघर्ष करत असताना स्त्रियांच्या चळवळीचे दीर्घकालीन ध्येय नजरेआड करून चालणार नाही. फॅसिझमला पराभूत करून लोकशाही शक्तींना सत्तेत आणल्याशिवाय स्त्री मुक्तीचा लढा पुढे जाऊ शकत नाही. म्हणूनच, आज स्त्री मुक्ती चळवळीचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे इतर फॅसिस्ट विरोधी शक्तींशी — सर्व फॅसिस्ट विरोधी राजकीय पक्षांसह — एकजूट करून भारतीय संविधानाचे व लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे रक्षण करण्यासाठी संघर्ष करणे.

वर चर्चा केल्याप्रमाणे, पितृसत्तेविरुद्धचा संघर्ष भांडवलशाहीविरुद्धच्या संघर्षाशी जवळून जोडलेला आहे. त्यामुळे दीर्घकाळात, लोकशाही शक्ती सत्तेवर आल्यानंतर, स्त्री मुक्तीच्या लढ्याला पुढे नेण्याबरोबरच, स्त्रियांच्या आंदोलनाला या समाजातील सर्व कष्टकरी, कामगार, दलित, अल्पसंख्य व इतर पीडितांच्या संघर्षाला जोडूनच सर्व प्रकारच्या अन्याय आणि शोषणाविरोधात लढा द्यावा लागेल. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केला गेलेला समाजवादी अजेंडा लागू करण्यासाठी लढा द्यावा लागेल:

सर्व नागरिकांना चांगल्या दर्जाचे शिक्षण, आरोग्य सेवा आणि पोषण प्रदान करणे, आणि सर्व नागरिकांना अर्थपूर्ण काम आणि योग्य वेतन प्रदान करणे जे त्यांना एक योग्य जीवनमान आणि विश्रांतीचा पूर्ण आनंद सुनिश्चित करते.

या समाजवादी धोरणांच्या अंमलबजावणीसाठी भांडवलशाही व्यवस्थेच्या कामकाजावर हळूहळू निर्बंध घालावे लागतील. शेवटी एक अशी व्यवस्था निर्माण करायला लागेल जी सर्व लोकांच्या गरजा भागवून सन्मान्य, समाधानी, सार्थक, सुरक्षित व जास्तीत जास्त सर्जनशील आयुष्य घडवणारी असेल.

■ ■

*ोंी ढ ै ि ु ों ं च्यनी*
*ओ िोंमन मृ ा ि ग्लिई ख़ों*
*ओ ि ग्लुाों िोरों ु न र ा*

*ि ु ड़ ै ि ु ों ं च्यनी*
*ओ ि क्ष्मत्य अंधा ि ग्लिई ख़ों*
*ओ ि ग्लुाों ओन ि ु न न व र ा*

*िों च्यैं ि ु ों ं च्यनी*
*ओ ै ु अंधो नु र ा ि ग्लिई ख़ों*
*ओ ि ग्लुाों ै ु न लन नु र ा*

*ै ु र ै ि ु ों ं च्यनी*
*ओ मनिा ि ग्लिई ख़ों*
*ओ ि ग्लुाों ड़ि ै सन र ा*

*न ृ ि ै ा*



# आमच्याबद्दल: अभिव्यक्ती

**मैत्रिणींनो!**

भारतातील महिलांच्या परिस्थितीत खूपच परिवर्तन झाले आहे. दिडशे वर्षापूर्वी मुलींना शिक्षण देणे वर्ज्य होते, लहान वयातच आईवडील मुलीचे लग्न लावून देत असत. महिलांना घराबाहेर पडून नोकरी करण्याचा अधिकारच नव्हता. आज मुलांच्या बरोबरीने मुली शाळा-कॉलेजांमध्ये येताना दिसतात. स्त्रिया निरनिराळ्या व्यवसायात आत्मविश्वासाने वावरताना दिसत आहेत. नोकऱ्या करत आहेत, व्यवसाय करत आहेत, राजकारणात भाग घेऊ लागल्या आहेत, पोलीस आणि संरक्षण खात्यात नोकऱ्या करत आहेत, विविध क्षेत्रात जबाबदारीच्या जागा त्या सांभाळत आहेत.

समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि त्यांच्यावर होत असलेये अन्याय यांच्याबद्दल समाजाची जाणीव वाढलेली आहे. स्त्रियांना विनयभंग, भेदभाव अशा अत्याचारांपासून संरक्षण मिळण्यासाठी अनेक नवे कायदे बनविण्यात आले आहेत. हुंडाबंदीचा विशेष कायदा बनवला आहे; हुंड्यासाठी हत्या झाल्यास सासरच्या कुटुंबातील व्यक्तींना कडक शिक्षा देणारे विशेष कायदे पारित झालेले आहेत; स्त्रियांची छेडछाड आणि बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांना जास्त कडक शिक्षांची तरतूद केली आहे; शारीरिक आणि मानसिक हिंसेला गुन्हा ठरवणारा कौटुंबिक हिंसाचाराचा नवा कायदा अस्तित्वात आला आहे; त्यानंतर या कायद्याची व्याप्ती वाढवण्यात आली आहे; कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणाविरुध्द विशेष कायदा करण्यात आला आहे; हिंदू स्त्रियांना वडिलोपार्जित मालमत्तेमध्ये काही अधिकार नसत ती स्थिती बदलून आता मुलींना वडिलोपार्जित मालमत्तेमध्ये मुलांप्रमाणेच समान हक्क देणारे कायदे करण्यात आलेले आहेत; इ.इ ...

एवढी प्रगती होऊनही समाजामध्ये स्त्रियांबाबत भेदभाव केला जातो. आजही, बहुतेक कुटुंबांमध्ये स्त्रियांचा दर्जा पुरुषांपेक्षा दुय्यमच आहे. अनेक मुली आज शिक्षण घ्यायला लागल्या आहेत, पण ते स्वावलंबी होण्यासाठी नव्हे तर लग्नासाठी उमेदवारी म्हणून असते. शिक्षण घेतल्यानंतर जर एखादी मुलगी नोकरी करत असेल, कुठल्याही चांगल्या पदावर काम करत असेल तरी लग्नानंतर तिने नोकरी करायची किंवा नाही याचा निर्णय तिचा नवरा आणि सासरचे लोक घेतात. कुटुंबाच्या मिळकतीमध्ये भर पडते म्हणून एखाद्या नवऱ्याने बायकोला नोकरी करण्यास परवानगी दिली, तरी कपडे धुण्यापासून, स्वयंपाक करणे, मुलांचे पालन-पोषण करणे ते घराची साफसफाई करण्यापर्यंतची सर्व घरकामे तिलाच करावी लागतात.

भारताच्या संविधानाप्रमाणे स्त्रिया आणि पुरुष समान असले तरीही स्वतंत्र्याच्या सत्तर वर्षांनंतरही स्त्रिया पुरुषांच्या अधीन राहिल्या आहेत, एवढेच नव्हे तर ह्या पुरुषसत्ताक समाजात त्यांच्यावर अतोनात अन्याय होत असतात. छेडछाड, लहान मुलींची खरेदी-विक्री, बालविवाह, हुंडाबळी, पत्नी म्हणून होणारे अपमान आणि अत्याचार, विधवा व परित्यक्तांना मिळणारी वर्तणूक, अशा अनेक रूपांमध्ये सतत सुरूच असतात. स्त्री–पुरुष भेदभावाचे 21व्या शतकातील अत्यंत क्रूर उदाहरण म्हणजे स्त्री लिंगी गर्भपात.

म्हणूनच, एका बाजूला देशातल्या विशेषतः शहरातल्या महिलांची परिस्थिती स्वातंत्रकाळाच्या तुलनेत जरी चांगली असली, तरी दुसऱ्या बाजूला, स्त्रिया प्रचंड प्रमाणात असमानतेच्या आणि हिंसेच्या बळी ठरत आहेत.

गेल्या दशकभरात भारतीय समाज एका नव्या संकटाचा सामना करत आहे. 2014 मध्ये भाजपने लोकसभा निवडणुकीत मोठा विजय मिळवला आणि केंद्रात सत्तेवर आला. त्यांना संविधानात नमूद केलेल्या आपल्या राज्यघटनाकारांच्या स्वप्नांपेक्षा पूर्णपणे वेगळा भारत घडवायचा आहे. लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता या सर्व मूलभूत घटनात्मक मूल्यांवर आघात होत आहेत.

भाजपचा समानतेवर विश्वास नाही. ते *मनुस्मृतीने* मंजूर केलेल्या सर्व पारंपारिक श्रेणींवर – लिंग आणि जातीय श्रेणींसह – विश्वास ठेवतात. त्यामुळे जातिभेद आणि लिंगभेद या दोन्ही गोष्टी अधिक तीव्र होत आहेत. गेल्या सात दशकांमध्ये स्त्री मुक्ती चळवळीने मिळवलेले सर्व हक्क आणि अधिकार मागे घेण्याचा प्रयत्न होत आहेत.

भाजप केवळ महाकाय कंपन्यांच्या नफेखोरीसाठी अर्थव्यवस्था चालवत आहे. एकीकडे तो गरिबांवरचा कर वाढवत आहे तर दुसरीकडे सरकारच्या सामाजिक

क्षेत्रातील खर्चात कपात करत आहे. परिणामी, देशात प्रचंड प्रमाणात गरिबी वाढली आहे. बेरोजगारीची स्थिती तीव्र झाली आहे. देशातल्या इतर सामाजिक प्रश्नांमध्येही वाढ झाली आहे. दलितांवरील अत्याचार वाढले आहेत आणि अल्पसंख्यांकावरील जुलूम ही वाढले आहेत. या सर्व संकटांचा सर्वात जास्त फटका स्त्रियांना बसतो. उदाः घराबाहेर काम करणाऱ्या महिलांची संख्या ऐतिहासिक नीचांकी झाली आहे.

**प्रिय भगिनींनो,**

असं असूनही गेल्या काही वर्षात छोटासा का होईना, स्त्रियांचा एक हिस्सा, 'बाईपणा'च्या चौकटी मोडताना दिसत आहे. व्यक्तिगत पातळीवर आज अनेक महिला पूर्वापार पद्धतीने जीवन जगण्यास नकार देत आहेत. समाजातल्या प्रत्येक संघर्षात शिरकाव करण्याचा प्रयत्न करत आहेत. आज आपल्याला पहिल्यापेक्षा जास्त अधिकार मिळाले आहेत, त्यासाठी आपल्या मैत्रिणींनी भूतकाळात खूप संघर्ष केला आहे. आपल्याला हा संघर्ष पुढे घेऊन जाणे आवश्यक आहे. नुसते कायदे करून किंवा कायदे कडक करून महिलांना सुरक्षितता मिळणार नाही. जोपर्यंत समाजामध्ये पितृसत्ताक व्यवस्था आहे तोपर्यंत स्त्रियांवर अन्याय, अत्याचार आणि हिंसा होतच राहणार.

आपल्या मानवी-हक्कांसाठी आपण उभे राहिल्यावर आपल्याला जाणवते की, आपण एकटे नसून आपल्याभोवती अनेक स्त्रिया आपले अस्तित्व टिकवण्यासाठी झगडत आहेत. स्त्री-मुक्तीसाठी प्रचार-मोहिमा राबवणारे, धरणे-मोर्चे काढणारे, सक्रियपणे सहभागी असणारे स्त्रियांचे अनेक गट आपल्या संपर्कात येतील. आपण त्यांच्याबद्दल पूर्वी ऐकले नव्हते, कारण आम्ही आमच्या घराबाहेर पडण्याची हिंमतच केली नव्हती!

अभिव्यक्ती हा असाच एक स्त्रियांचा, स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणारा गट आहे. आम्ही तुमच्यासारख्याच सामान्य मुली आणि स्त्रिया आहोत. स्त्रीस्वावलंबन, स्त्रीसबलीकरण व स्त्रीस्वातंत्र्य अशा विषयांबाबत लोकांमध्ये जाणीव वाढवण्यासाठी आम्ही विविध कार्यक्रम आयोजित करत असतो. त्यासाठी रस्ते-मोहिमा, परिसंवाद, माहितीपट-प्रदर्शन, गाणी व पथ-नाट्य, मोर्चे, नाटके, इ. वेगवेगळे कार्यक्रम करत असतो. स्त्री–पुरुष समानतेची संकल्पना आणि भारतीय राज्यघटनेतील तिचा समावेश बुद्धाच्या शिकवणीपासून ते भक्ती चळवळीच्या महिला संतांपर्यंत प्राचीन भारतीय संस्कृतीत रुजलेला आहे हे लोकांना समजावून सांगण्यासाठी आम्ही सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतो. संविधानाने आम्हाला दिलेल्या महिलांच्या

अधिकारांची लोकांना जाणीव करून देण्यासाठी आम्ही संविधान उत्सवाचे आयोजन करतो. महिलांच्या स्वातंत्र्यासाठी देशव्यापी आंदोलनातही आम्ही सक्रिय सहभाग घेतो, उदा.: हाथरस आणि कठुआ बलात्कार प्रकरणांविरुद्ध देशव्यापी निदर्शने, सॅनिटरी पॅडवर जीएसटी लादल्याबद्दल निषेध, तसेच स्त्रियांच्या अधिकारात वाढ करणारे नवे कायदे अंमलात आणण्याचे आंदोलन, इ.

स्त्रिया आणि पुरुष दोघेही आमचे लक्ष्य आहेत. स्त्रीस्वातंत्र्याबद्दल पुरुषांनाही संवेदनशील करणे गरजेचे आहे असे आम्हाला वाटते. कारण स्त्रीस्वातंत्र्याची लढाई ही फक्त स्त्रियांची नसून ती संवेदनशील पुरुषांच्या सक्रिय समर्थन आणि सहभागानेच साध्य होईल असा आमचा विश्वास आहे.

आमचा असाही विश्वास आहे की ज्या समाजात कष्टकरी आणि कामगार-वर्गांचे शोषण होते तिथे स्त्रीस्वातंत्र्य साध्य होणार नाही. म्हणूनच अभिव्यक्ती कष्टकरी, कामगार, दलित, आदिवासी, अल्पसंख्य आणि समाजातील सर्व पीडित घटकांच्या आंदोलनांबरोबर जोडून घेऊन काम करत आहे.

स्वप्ने पाहण्याचे धाडस केले की कृती करण्याचे धैर्य येते! दीडशे वर्षांपूर्वी सावित्रीबाई फुले यांनी जेव्हा दलित मुलींसाठी पहिली शाळा काढली, तेव्हा त्यांचे स्वप्न — जात, लिंगापलीकडे समाजातील सर्वांना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात — बहुतेकांना अशक्यप्राय वाटत होते. पण आज आपण त्या स्वप्नाच्या पूर्ततेत खूप पुढे आलो आहोत; लाखोंच्या संख्येने आज मुली आणि दलित शिक्षण घेत आहेत. म्हणूनच आपणही उच्च स्वप्ने पाहण्यचे धाडस करूया. नवीन, सुंदर, न्याय्य — जिथे स्त्री–पुरुष खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि समान असतील — अशा नवसमाज निर्मितीचे स्वप्न पाहण्याची वेळ आलेली आहे. आपल्यापैकी कोणीतरी पुढाकार घेऊन अशा समाजनिर्मितीचा पाया घातला पाहिजे. सुरुवात झाली तरच त्याचा शेवट होतो. देशभरात अनेक स्त्रिया आणि पुरुष असा पुढाकार घेताना दिसत आहेत; आपणही आपले लहान-लहान पुढाकार घ्यायला सुरुवात करून पुढे जाऊया. चला, आपण एकमेकांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करूया, आपली सुखदुःख आणि समस्या एकमेकांमध्ये समजून घेऊया आणि हातात हात घालून पुढे जाऊया. हळूहळू अधिकाधिक लोक आपल्याला येऊन मिळतील ...

या पुस्तिकेमध्ये व्यक्त केलेले विचार आपल्याला आवडले असतील, आपणाला आमच्याबद्दल जास्त माहिती हवी असेल आणि आमच्याबरोबर संवाद करून आमच्या कार्यात भाग घ्यायचा असेल तर आमच्याशी जरूर संपर्क साधावा. पुढील पानावर पत्ते दिले आहेत.

## अभिव्यक्ती

अभिव्यक्ती, c/o लोकायत, कॅनेरा बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप, पुणे–4

*(या पत्त्यावर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी 10 -12 या वेळेत अभिव्यक्तीची मीटिंग होते (फक्त महिलांसाठी), आणि दर रविवारी संध्या. 5 - 7 या वेळेत लोकायतची मीटिंग होते.)*

अलका जोशी – 90670 03838 मोनाली चं.अ. – 93701 95213

lokayat.india
abhivyakti.pune
KafilaOfficial
lokayat.india@gmail.com
lokayatpune @lokayat
www.lokayat.org.in


## आमची मराठी प्रकाशने

| | |
|---|---|
| ये दिल मांगे मौत (कोक–पेप्सी भारत छोडो) | ₹ 5 |
| देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे *(लेखक: प्रबोधनकार ठाकरे)* | ₹ 5 |
| हे मला माहीत हवं! | ₹ 5 |
| तरुणांनो, विचार कराल तर . . . | ₹ 5 |
| विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद | ₹ 5 |
| मी नास्तिक का आहे *(लेखक: शहीद भगतसिंग)* | ₹ 5 |
| सार्वजनिक विमा क्षेत्र लिलावात | ₹ 5 |
| कोळी आणि माशी *(लेखक: विल्हेल्म लिबनिश्ट)* | ₹ 5 |
| मुलगा म्हणजे? मुलगी म्हणजे? *(लेखिका: कमला भसीन)* | ₹ 10 |
| नोटाबंदी: काय कमावले? काय गमावले? | ₹ 10 |
| आर एस एस ला ओळखा *(लेखक: शम्सुल इस्लाम)* | ₹ 10 |
| शहीद भगतसिंगचे तरुणांना आवाहन | ₹ 15 |
| शिक्षणाची राखरांगोळी | ₹ 15 |
| सरकार खरंच गरीब आहे का? | ₹ 20 |
| आण्विक वेडेपणा | ₹ 20 |
| देशावर फॅसिझमचे संकट | ₹ 20 |
| बेरोजगारीचे संकट: कारणे आणि उपाय | ₹ 25 |
| उठ माणसा: गाणी संघर्षाची | ₹ 30 |
| जागतिकीकरण की नवी गुलामगिरी? | ₹ 150 |

***ही पुस्तिका लोकायत सोशल ॲक्शन ट्रस्टने अभिव्यक्तीसाठी प्रकाशित केले आहे.***

## या पुस्तिकेतून . . .

- भारतीय राज्यघटनेने स्त्री–पुरुष समानता दिलेली आहे. पण नुसते संविधानात लिहिल्याने समानता येत नाही.

- मुलींना अशाप्रकारे वाढवलं जाते की त्यांचे व्यक्तिमत्व ढब्बू, संकुचित, परावलंबी, अंतर्मुख, आत्मविश्वास नसलेले आणि मानसिकदृष्ट्या अपंग बनते.

- आजही लग्न हीच स्त्रीच्या आयुष्याची इतिकर्तव्यता आहे. मुलीच्या शिक्षणाचा उपयोग तिच्या विकासासाठी न होता लग्नासाठी उमेदवारी म्हणून असतो. लग्नाच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये तिची गुणवत्ता महत्त्वाची नसून अजूनही हुंडाच महत्त्वाचा असतो.

- स्त्रीच्या सौंदर्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन आजही फक्त शरीराशी जोडलेला आहे. बाहुलीसारखी सजली-सवरलेली, लाजरी-बुजरी, संकोचणारी स्त्रीच सुंदर समजली जाते. म्हणजे स्त्रीच्या बाह्य सौंदर्यालाच जास्त महत्त्व दिले जाते, आंतरिक सौंदर्याला काहीही महत्त्व नाही.

- अत्यंत रूढीप्रिय आणि पुराणमतवादी भारतीय समाजामध्ये मॉडेलिंगसारख्या कामाला अचानक मानाचे स्थान कसे काय मिळू लागले ?

- अनेक लोक—बायका आणि पुरुष—हेच सांगतात की बाईच बाईची शत्रू आहे. हे खरे आहे का ?

- जसे 'स्त्री जन्माला येत नाही, घडविली जाते' तसेच 'पुरुषही जन्माला येत नाही, घडविला जातो'. पितृसत्ताक व्यवस्था ही स्त्रीमध्ये स्त्रीत्वाची भावना जागृत करते तर पुरुषामध्ये पितृसत्तेला पोसण्याचे काम 'मर्दानगी' करते.

- स्त्रीमुक्तीला मानव मुक्तीपासून तोडून बघताच येणार नाही. स्त्रीमुक्तीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अशा एका नवसमाजाची गरज आहे जो न्याय्य असेल, समानता प्रस्थापित करणारा असेल. असा समाज निर्माण करण्यासाठी सर्व कष्टकरी, कामगार, दलित, अल्पसंख्यांक व इतर पीडितांच्या संघर्षाला जोडूनच स्त्रियांच्या आंदोलनाला सर्व प्रकारच्या अन्याय आणि शोषणाविरोधात लढा द्यावा लागेल.

अभिव्यक्ती | janata
जनता साप्ताहिक, मुंबई